

कुलगुरु कै. वि. गं. तथा
दादासाहेब केतकर



धनुर्धारी श्रीराम लक्ष्मण

विद्वान् सर्वत्र पूज्यते

स्थापना १२ मे १९०९



शिक्षणमहर्षी कै. डॉ. ग. श्री.
तथा अण्णासाहेब खैर


पुणे विद्यार्थी गृहाचे मासिक

# समाचार

**Pune Vidyarthi Griha's 'Samachar' Magazine February 2025 - Pages - 64**

संपादक : श्री. राजेंद्र विठ्ठल बोऱ्हाडे    कार्यकारी संपादक : श्री. सुभाष मल्लाप्पा जिर्गे

* पुणे * वर्ष ७६ * अंक ४ * किंमत रु. १०/- * वार्षिक वर्गणी रु. १००/-




सोमवार दि. २३ डिसेंबर २०२४ रोजी डॉ. काकासाहेब देवधर इंग्लिश स्कूल, म्हसरूळ, नाशिक प्राथमिक आणि माध्यमिक विभाग वार्षिक स्नेहसंमेलन आणि पारितोषिक वितरण कार्यक्रम प्रसंगी प्रमुख पाहुणे माजी विद्यार्थी आणि 'ग्रंथ तुमच्या दारी' उपक्रमाचे संस्थापक श्री. विनायक रानडे, यांचा सत्कार करताना कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे, समवेत डावीकडून संचालक श्री. अमोल जोशी, कार्यवाह श्री. संजय गुंजाळ, उपकार्याध्यक्ष एस. एम. जिर्गे, आणि कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ

## ✻ डॉ. काकासाहेब देवधर इंग्लिश स्कूल, म्हसरूळ शाखा, नाशिक ✻



दि. २३ डिसेंबर २०२४ रोजी पूर्व प्राथमिक विभाग वार्षिक स्नेहसंमेलन आणि पारितोषिक वितरण समारंभ प्रसंगी प्रमुख पाहुण्या लेखिका सौ. सुरेखा अशोक बोऱ्हाडे यांचा सत्कार करताना कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे, समवेत डावीकडून मुख्याध्यापिका सौ. मनीषा साठे, कार्यवाह श्री. संजय गुंजाळ, उपकार्याध्यक्ष श्री. एस. एम. जिर्गे, कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ, संचालक श्री. अमोल जोशी



## ✻ डॉ. काकासाहेब देशमुख विद्यालय, पंचवटी शाखा, नाशिक ✻

वार्षिक स्नेहसंमेलन आणि पारितोषिक वितरण समारंभ प्रसंगी प्रमुख पाहुणे संचालक श्री. अमोल जोशी यांच्या हस्ते बक्षीस स्वीकारताना इयत्ता दहावीचे विद्यार्थी, समवेत मुख्याध्यापक श्री. ज्ञानेश्वर निंबेकर, जेष्ठ शिक्षिका श्रीमती सुनंदा ठाकरे, शिक्षक प्रतिनिधी सौ. तेजश्री जोशी

## ✻ विद्याभवन हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, नेरूळ शाखा, नवी मुंबई✻



प्राथमिक इंग्रजी विभाग वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ प्रसंगी प्रा. पंडित तुकाराम देशमुख यांचे स्वागत करताना कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे



प्राथमिक मराठी विभाग वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ प्रसंगी विशेष अतिथी कवी श्री. साहेबरावजी ठाणगे यांचे स्वागत करताना कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे, समवेत डावीकडून अनुसंधान समिती सदस्य श्री. के. एन. शिरकांडे आणि कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ

संपादकीय

# महाराष्ट्राचा महामेरू

आपण जरी वर्तमानात रहात असलो तरी, भूतकाळ आणि भविष्यकाळाचे आपण साक्षीदार असतो. वर्तमानातला प्रत्येक क्षण हा मोठ्या झपाट्याने आणि अपरिहार्यपणे भूतकाळात गडप होत असतो आणि त्यामुळेच मानवी संस्कृतीच्या वाटचालीत भूतकाळाला म्हणजेच गतेतिहासाला महत्त्वपूर्ण स्थान असते. आपल्याकडे म्हटलेच जाते की, जे राष्ट्र आपल्या इतिहासाला विसरते त्या राष्ट्राला भविष्य नसते. या दृष्टीने राष्ट्र आणि समाज जीवनाच्या संवर्धनासाठी आणि प्रगतीसाठी इतिहासाचा अभ्यास अतिशय महत्त्वाचा ठरतो.

इतिहास हा काही केवळ सनावळ्या, शकावल्या किंवा जन्म आणि मृत्यू यांच्या नोंदीचा नसतो तर, तो दडलेला असतो त्या त्या काळातल्या लोकोत्तर व्यक्तिमत्त्वांच्या जीवनकार्यात. समाजजीवन आणि पर्यायाने व्यक्ती जीवनाचे उन्नयन करण्यासाठीच्या त्यांच्या प्रयत्नांच्या पराकाष्ठेत आणि त्यांच्या कर्तृत्वाच्या मिलाफातून साकारतो. अभिव्यक्त होत असतो. इतिहास या आपल्या गुणामुळे कधीच निर्जीव नसतो. केवळ भूतकालपट नसतो. इतिहास आपल्यापुढे मानवी संस्कृतीची स्थिती गती उलगडत असतो आणि हे कार्य तो मोठ्या विलक्षण अलिप्तपणे करत असतो.

काळ हा अतिशय गतिमान असतो. त्या बदलत्या काळानुसार मानवी जीवन जरी बदलत असले तरी, मानवी मनाचे मूळ स्वभावगुण आणि भावभावनांचे स्थायी रूप बदलत नसते. कालौघात बदलते ती त्यांची अभिव्यक्ती. त्यामुळेच ऐतिहासिक काळातल्या थोर व्यक्तिंच्या चरित्राचा अभ्यास हा वर्तमानात महत्त्वाचा ठरतो. त्यांची कर्तृत्व शक्ती, जिद्द, बुध्दिचातुर्य आदी गुणांच्या अभ्यासाने आपण वर्तमानाला आणि भविष्याला ओळखू शकतो. काही प्रमाणात दिशा देऊ शकतो. म्हणूनच इतिहासाचे अंधानुकरण न करता त्याच्या डोळस अभ्यासाने आपल्याला प्रगती साधता येते.

महाराष्ट्र देशाचे असेच एक कर्तृत्वसंपन्न व्यक्तिमत्त्व म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज. छत्रपतींनी थंडगार मातीच्या गोळ्याप्रमाणे असलेल्या आपल्या समाजमानसात चैतन्य निर्मिले. कर्तृत्व उमलवले. आपल्याला अस्मितेचे भान दिले. छत्रपतींच्या या लोकोत्तर कार्याचे वर्णन,

'तुझ्या भुकेला वरी नागली आणि कणी कोंडा
वहाण पायी, अंगी कांबळी उशा खाली धोंडा,
विळा कोयता धरी दिगंबर दख्खनचा हात,
इकडे कर्नाटक हासतसे तिकडे गुजरात,
आणि मराठी भाला घेई दख्खन कंगाल,
इकडे इस्तंबूल थरारे तिकडे बंगाल,'

असे केले जाते, त्यामुळेच आजही

' शिवरायाचे आठवावे रूप । शिवरायाचा आठवावा प्रताप । '

असेच म्हणावेसे वाटते.

आपल्या प्रजेला आपल्या कारकिर्दीतल्या येणाऱ्या स्थैर्याची आणि सुबत्तेची जाणीव करून देण्यासाठी राजांनी आपल्या पुण्याच्या जहागिरीतल्या जमिनीची नांगरणी सोन्याच्या नांगराने केली.

न्यायासनासमोर सर्व सामान म्हणून जरी पाटिलकी असली तरी, प्रजेला नाडणाऱ्या रांझ्याच्या पाटलांना राजांनी कठोर सजा दिली. प्रजेवर अन्याय करणाऱ्या आपल्या संभाजी मामा मोहिते यांनाही गिरफ्दार करण्यास महाराजांनी मागेपुढे पाहिले नाही.

अन्यायाचे निर्दलन करणे हा जसा छत्रपतींचा बाणा होता. त्याचप्रमाणे रयतेचे संरक्षण करणे हे त्यांचे ब्रीद होते. म्हणूनच हडकीची जागा बदलून त्यासाठी या मंडळींना राजांनी पुण्याच्या पूर्वेची जागा दिली आणि जनावरांच्या कातडी धुण्याने होणारे पाण्याचे प्रदूषण टाळले.

पुण्याजवळून वाहणाऱ्या आंबील ओढ्याला धरण बांधून राजांनी छोट्या छोट्या पाटांच्या सहाय्याने भूमी 'सुलजाम् सुफलाम्' केली. त्याचबरोबर राजांनी कोंढवे, शिवापुर येथेही धरणे बांधली. पर्यावरणाचे महत्त्व राजे जाणत असल्याने त्यांनी प्रजेला आंबा, चिंच, डाळिंबं वगैरे नाना तऱ्हेची झाडे लावण्यास प्रोत्साहित केले. व्यापाराला उत्तेजन दिले कारण 'साहुकार म्हणजे राज्याची शोभा' हे राजे जाणत होते.

समाज प्रगत झाला, समाजाच्या अन्न, वस्त्र आणि निवारा या मूलभूत गरजा भागल्या तरी, दुर्बलांच्या क्षमेला व संपन्नतेला अर्थ नसतो हे जाणून उत्तम सैन्यदलाची राजांनी बांधणी केली. 'ज्याचे आरमार त्याचा समुद्र' हे राजे जाणत असल्याने सैन्यदलांत राजांनी आरमाराचीही बांधणी केली.

'ठायी ठायी पांडव लेणी सह्याद्रीपोटी
किल्ले सत्तावीस बांधले सह्याद्रीपाठी,'

एक सुसंस्कृत आणि निर्भीड नागरीक घडवण्याचा प्रयत्न केला.

राजांची प्रत्येक गोष्ट आखीव, रेखीव आणि नेटकी होती. शत्रूचे बालबल, शत्रूची मानसिक स्थिती आणि आपल्याकडील उपलब्ध सामुग्री यांचा सांगोपांग अभ्यास करून अतिशय बारकाईने राजे युध्दमोहिम आखत असल्याने शाहिस्तेखान, अफजलखान, सिद्दीजोहर, इंग्रज आदी परकियांशी ते यशस्वीपणे दोन हात करू शकले. मोगली राज्यातल्या थेट सुरतेवरही स्वारी करू शकले. स्वराज्याला बळकटी देऊ शकले.

'वन्हि तो चेतवावा' हे राजे जाणत असल्याने देव, देश आणि धर्मासाठी बलिदान करण्यासही मागेपुढे न पाहणाऱ्या मावळ्यांची ते फौज उभारू शकले. 'आनंदवन भुवनी' साकारू शकले.

प्राप्त परिस्थितीचा बाऊ न करता जीवनात यशस्वी कसे व्हावे याचे बाळकडूच आपल्याला राजांच्या जीवनचरित्रात सापडते. 'राजा हा पृथ्वीचा उपभोगशून्य स्वामी असतो' याचे मूर्तिमंत उदाहरण म्हणजे राजे होते. वैयक्तिक आणि सामाजिक जीवनात 'प्रपंच आणि परमार्थाची' यशस्वी सांगड घालणाऱ्या, कर्तव्यनिष्ठेचे आणि ध्येयनिष्ठेचे प्रत्यक्ष प्रमाण असलेल्या श्री शिवरायांच्या जयंती निमित्त त्यांना मानाचा मुजरा.

दि. २६ जानेवारी २०२५
प्रजासत्ताक दिन

## शिशुनिकेतन मराठी माध्यम, पुणे

**संचालक : डॉ. राजेंद्र संपत कांबळे**
**प्र. मुख्याध्यापिका : सौ. अरुणा कांबळे**

### वार्षिक स्नेहसंमेलन आणि पारितोषिक वितरण समारंभ संपन्न

मंगळवार दि. २४ डिसेंबर २०२४ रोजी वार्षिक स्नेहसंमेलन आणि पारितोषिक वितरण समारंभ टिळक स्मारक मंदिर येथे सकाळी ९.०० ते दुपारी १२.०० या वेळेत संपन्न झाला. याप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून ज्येष्ठ ग्रामीण साहित्यिक आणि निवृत्त आयकर अधिकारी मा. श्री. बबन पोतदार व त्यांच्या सुविद्य पत्नी सौ. विजया पोतदार उपस्थित होत्या. तसेच कोषाध्यक्ष श्री. कृष्णाजी कुलकर्णी आणि विभाग संचालक डॉ. राजेंद्र कांबळे उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरूवात ईशस्तवन आणि 'या रे या सारे या' या भावपूर्ण गीताने झाली. भारतीय संविधानाला ७५ वर्ष पूर्ण झाल्याचे औचित्य साधून संविधानाचे वाचन सौ. राधिका दंडगे यांनी केले. याप्रसंगी शाळेत झालेल्या विविध कार्यक्रम, उपक्रमांची माहिती पीपीटीद्वारे उपस्थितांना देण्यात आली.

प्रमुख अतिथी मा. श्री. बबन पोतदार यांचे स्वागत संचालक डॉ. राजेंद्र कांबळे यांचे हस्ते शाल, श्रीफळ आणि मानचिन्ह देऊन करण्यात आली. तसेच सौ. विजया पोतदार यांचा सत्कार प्र. मुख्याध्यापिका सौ. अरुणा कांबळे यांनी केला.

प्रमुख अतिथी मा. श्री. बबन पोतदार यांचा परिचय सौ. अनुश्री लोखंडे यांनी करून दिला. प्रमुख अतिथी मा. श्री. बबन पोतदार यांनी आपल्या रसाळ भाषेत पालकांशी संवाद साधताना, आजच्या पिढीमध्ये असलेली उच्च ग्रहणक्षमता, आत्मविश्वास, स्वतःचे विचार प्रभवीपणे मांडण्याची कला अशा विविध गुणांना पालकांनी प्रोत्साहन द्यावे असे सांगितले.

प्रमुख अतिथी मा. श्री. बबन पोतदार आणि उपस्थित मान्यवरांच्या हस्ते विविध स्पर्धांमधील विजेत्यांना बक्षीसे वितरीत करण्यात आली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. धांदल यांनी केले. सौ. अनुश्री लोखंडे यांनी आभार प्रदर्शन केले.

यानंतर विविध गुणदर्शनाचा कार्यक्रम सादर करण्यात आला. यामध्ये विविध प्रकारची नृत्ये तसेच शिवजन्मापासून ते शिवराज्याभिषेकापर्यंतचे प्रसंग गीतामधून दाखविण्यात आले. पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली. ***

### * पंचवटी शाखा, नाशिक *



**श्री. जितेंद्र सोमनाथ कामत यांनी दि. ३० डिसेंबर २०२४ रोजी संस्थेस रु. १,००,००० /- ची देणगी दिली.**
**सौ. व श्री. जितेंद्र सोमनाथ कामत यांचे हस्ते देणगीचा धनादेश स्वीकारताना संस्था कर्मचारी श्री. मकरंद मुळे आणि श्री. सुनील पावसे**

# मुक्तांगण इंग्लिश मिडियम स्कूल, सदाशिव पेठ शाखा

**संचालक : डॉ. राजेंद्र सं. कांबळे**
**मुख्याध्यापिका : सौ. शिल्पा चितारे (प्राथमिक)**
**मुख्याध्यापिका : सौ. मधुमती कदम (माध्यमिक)**

### शैक्षणिक सहल

इ. ९वी आणि १०वीच्या विद्यार्थ्यांची शैक्षणिक सहल दिनांक १६डिसेंबर रोजी रायगड येथे नेण्यात आली.विद्यार्थी सकाळी सहा वाजता निघून संध्याकाळी वेळेवर शाळेत पोहोचले. विद्यार्थ्यांना रायगडाची माहिती सांगण्यासाठी एका गाईडची नेमणूक करण्यात आली होती. त्या गाईडनी छत्रपती शिवाजी महाराजांचा रायगड संदर्भातील उज्ज्वल इतिहास सांगितला. गडावरील बाजारपेठ, राण्यांचे महाल, छत्रपती शिवाजी महाराज यांच्या राज्याभिषेकाची जागा, त्यांची समाधी या सगळ्या गोष्टी विद्यार्थ्यांनी अभिमानाने पहिल्या. 'रोप वे' चा वापर करून गड चढणे आणि उतरणे याचा अनुभव रोमांचक होता. नववी दहावीचे वर्गशिक्षक, क्रीडा शिक्षिका आणि मुख्याध्यापिका यांसोबत हा ऐतिहासिक क्षण विद्यार्थ्यांनी अनुभवला.

### शैक्षणिक क्षेत्रभेट

इ. ९वीच्या विद्यार्थ्यांची शैक्षणिक क्षेत्रभेट दि. ३ जानेवारी २०२५ रोजी 'लेंड अ हॅण्ड' इंडिया अंतर्गत कारिगर स्कूल, स्कूल ऑफ अप्लाइड लर्निंग, गोखलेनगर येथे झाली. सदर क्षेत्रभेटीचे नियोजन निर्धार या सामाजिक कार्य करणाऱ्या संस्थेने केले होते. या शाळेचे वैशिष्ट्य म्हणजे व्यवसाय शिक्षणाचे महत्त्व मुलांना माहिती करून देणे. येथे इलेक्ट्रिक, इलेक्ट्रॉनिक, फूड प्रोसेसिंग, कारपेंटरी अशा विविध व्यवसायांची माहिती देणाऱ्या लॅब होत्या. विद्यार्थ्यांचे गट करून त्यांना येथे प्रत्येक व्यवसायाची माहिती देण्यात आली. विद्यार्थ्यांनी प्रत्यक्षिकाद्वारे याचा अनुभव घेतला. श्री. सचिन यांनी या व्यवसायांचा भविष्यात त्यांना काय उपयोग आहे याची माहिती दिली. विद्यार्थ्यांच्या शंकांचे निरसन केले. इ. ९वीच्या वर्गशिक्षिका, मुख्याध्यापिका, निर्धारच्या प्रमुख सौ. अश्विनी जोशी, पालक आणि शिक्षकांच्या सहकार्याने सदर क्षेत्रभेट यशस्वी झाली.

### वार्षिक स्नेह संमेलन आणि पारितोषिक वितरण

दि. १३ आणि १४ डिसेंबर २०२४ रोजी वार्षिक स्नेह संमेलन आणि पारितोषिक वितरण टिळक स्मारक मंदिर येथे संपन्न झाले. डॉ. पी. जी. कुलकर्णी ISS Ex Global Director of Bank of America, आणि शास्त्रज्ञ श्री. अरविंद अनंत नातू हे मान्यवर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. पाहुण्यांनी विद्यार्थ्यांनी भविष्यात कोणकोणत्या व्यावसायिक संधींचा लाभ घ्यावा हे सांगितले. पुणे विद्यार्थी गृहाचे संचालक मंडळ यावेळी उपस्थित होते. शिक्षक प्रतिनिधी स्वरूपा मोरे आणि नीता गर्ग यांनी या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका सौ. शिल्पा चितारे आणि माध्यमिक विभाग मुख्याध्यापिका सौ. मधुमती कदम यांनी शाळेच्या प्रगतीचा आढावा घेतला. या प्रसंगी प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते गुणवंत शिक्षिका, विद्यार्थ्यांना सन्मानित करण्यात आले. विद्यार्थ्यांनी विविध गुणदर्शन कार्यक्रमातून सामाजिक संदेश दिला. शाळेच्या कामकाजाविषयी माहिती देणारा माहितीपट यावेळी सादर केला गेला. हे यावेळच्या स्नेह संमेलनाचे विशेष आकर्षण ठरले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अश्विनी धांदल, निकिता कदम, सोनाली शिंदे, प्राजक्ता मुरमट्टी यांनी केले. वीणा मुसळे, गायत्री कुटाळे यांनी आभार प्रदर्शन केले. पालकांचे सहकार्य, शिक्षकांचे श्रम, मुख्याध्यापकांचे मार्गदर्शन यांमुळे स्नेहसंमेलन यशस्वी रित्या पार पडले.

***

# महाराष्ट्र विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, पुणे

**संचालक : डॉ. राजेंद्र सं. कांबळे**

**प्राचार्य : श्री. व्ही. पी. गावडे**

## स्नेहसंमेलन

मंगळवार दि. १० ते १६ डिसेंबर २०२४ या कालावधीत स्नेहसंमेलनानिमित्त क्रीडास्पर्धा व बौध्दिक स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धांमध्ये प्रशालेतील इ. ५वी ते १०वी च्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. मंगळवार दि. ३१ डिसेंबर २०२४ रोजी विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी या सर्वांना स्नेहभोजन देण्यात आले. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळावा म्हणून शुक्रवार दि. ३ जानेवारी २०२५ रोजी टिळक स्मारक मंदिर येथे वार्षिक स्नेहसंमेलन आणि पारितोषिक वितरण समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून अजिंक्य डी. वाय. पाटील विद्यापीठ, पुण्याचे उपाध्यक्ष डॉ. एकनाथ बी. खेडकर यांच्या शुभहस्ते क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले आणि सरस्वतीचे प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून पूजन आणि दीपप्रज्वलन करण्यात आले. कोषाध्यक्ष श्री. कृष्णाजी कुलकर्णी, संचालक डॉ. राजेंद्र कांबळे, संचालक श्री. रमेश कुलकर्णी, प्राचार्य व्ही. पी. गावडे, कनिष्ठ महाविद्यालयाचे शिक्षक प्रतिनिधी श्री. प्रमोद चंदनशिवे, माध्यमिक विभागाचे शिक्षक प्रतिनिधी श्री. राजेंद्र शिर्के या सर्वांनी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले आणि सरस्वतीच्या प्रतिमेचे पूजन केले. यानंतर ईशस्तवन सादर करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व उपस्थितांचे स्वागत प्राचार्य व्ही. पी. गावडे यांनी केले. अध्यापिका सौ. सविता जगताप यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. कोषाध्यक्ष श्री. कृष्णाजी कुलकर्णी यांच्या हस्ते प्रमुख पाहुणे डॉ. एकनाथ बी. खेडकर यांचा शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. कोषाध्यक्ष श्री. कृष्णाजी कुलकर्णी, संचालक डॉ. राजेंद्र कांबळे, संचालक श्री. रमेश कुलकर्णी, शिशुनिकेतनच्या मुख्याध्यापिका सौ. अरुणा कांबळे यांचा सत्कार प्राचार्य व्ही. पी. गावडे यांच्या हस्ते गुलाबापुष्प देऊन करण्यात आला. कनिष्ठ महाविद्यालयाचे शिक्षक प्रतिनिधी श्री. प्रमोद चंदनशिवे, माध्यमिक विभागाचे शिक्षक प्रतिनिधी श्री. राजेंद्र शिर्के, विद्यार्थी प्रतिनिधी कु. युवराज पवार, कु. आर्यन कुलकर्णी यांचा सत्कार प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते गुलाबपुष्प देऊन करण्यात आला.

आश्रमस्थ विद्यार्थी चि. युवराज पवार यास अष्टपैलू विद्यार्थी म्हणून भागवत ढाल, पुष्पगुच्छ व पुस्तक देऊन सत्कार करण्यात आला.

क्रीडा स्पर्धा व बौध्दिक स्पर्धेत यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांना प्रमुख पाहुणे डॉ. एकनाथ बी. खेडकर तसेच इतर मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र व पुस्तक देऊन गौरवण्यात आले. माध्यमिक विभागाच्या अध्यापिका सौ. प्राजक्ता चोपडे व कनिष्ठ महाविद्यालयाच्या अध्यापिका सौ. कीर्ती राठोड यांनी अहवाल वाचन केले. प्रमुख पाहुणे डॉ. एकनाथ बी. खेडकर यांनी आपले मनोगत व्यक्त केले. माध्यमिक विभागाचे अध्यापक श्री. निलेश चौदार व कनिष्ठ महाविद्यालयाच्या अध्यापिका सौ. रूपाली चौथाई यांनी गुणवत्ता यादीवाचन केले. कनिष्ठ महाविद्यालयाच्या अध्यापिका सौ. कीर्ती राठोड यांनी आभारप्रदर्शन केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अध्यापक श्री. ज्ञानेश्वर दाते यांनी केले. पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली.

प्रशालेतील इ. ५ वी ते इ. १२ वी च्या विद्यार्थ्यांनी विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर करून आपले कलागुण सादर केले. याप्रसंगी बी. एड. छात्र अध्यापक श्री. अक्षय मरसकोल्हे यांनीही नृत्य सादर केले.

## राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रमांतर्गत आरोग्य तपासणी

सोमवार दि. ६ जानेवारी २०२५ रोजी आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालय, भारत सरकारच्या राष्ट्रीय आरोग्य अभियानाचा एक भाग म्हणून औंध जिल्हा रूग्णालयामार्फत प्रशालेतील इ. ५ वी ते १० वी च्या

विद्यार्थ्यांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. डॉ. देवेंद्र खैरे, डॉ. वैभव पिसे, डॉ. गीतांजली शिंदे, परिचारिका सौ. प्रांजली रनवरे व सौ. जयश्री सोनवणे या सर्वांनी प्रशालेतील विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी केली. तसेच डॉ. देवेंद्र खैरे यांनी विद्यार्थ्यांना स्वतःचे आरोग्य चांगले कसे ठेवावे या बाबत मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अध्यापक श्री. संदीप यलगोंडा सातपुते यांनी केले. फलकलेखन सौ. माधुरी मोहनसिंग पाडवी यांनी केले. अध्यापक श्री. अक्षय सितकुरा मरसकोल्हे यांनी छायाचित्रण केले. अध्यापिका कु. राजश्री वसंत पाटील यांनी इयत्तेप्रमाणे वर्गातील विद्यार्थ्यांना क्रमाक्रमाने आरोग्य तपासणीसाठी आणले. अध्यापिका सौ. राजेश्वरी सुनील केंदळे यांनी आरोग्य तपासणीसाठी आलेल्या विद्यार्थ्यांची बैठक व्यवस्था पाहिली. आभार प्रदर्शन अध्यापिका सौ. दिप्तीनी गौतम इंगोले यांनी केले.

**शैक्षणिक गुणवत्ता संवर्धन अभियानांतर्गत शाळा तपासणी**

सोमवार दि. ६ जानेवारी २०२५ रोजी पुणे जिल्हा माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा, मुख्याध्यापक संघ, पुणे, पुणे जिल्हा परिषद माध्यमिक शिक्षण विभाग यांचे संयुक्त विद्यमाने शैक्षणिक गुणवत्ता संवर्धन अभियानांतर्गत शालेय तपासणी समिती प्रमुख आणि माजी मुख्याध्यापक श्री. हरिश्चंद्र गायकवाड, मुख्याध्यापक श्री. शिवाजी शिंदे मुख्याध्यापक श्री. हनुमंत भांडवलकर, मुख्याध्यापक श्री. आर. डी. भारमळ, मुख्याध्यापक श्री. अविनाश ताकवले, माजी मुख्याध्यापक श्री. विठ्ठल शिंदे, मुख्याध्यापिका सौ. सुनिता शिंदे, माजी मुख्याध्यापिका सौ. शोभा कमलाकर, माजी मुख्याध्यापिका सौ. सुरेखा सोनवणे, अध्यापक श्री. सुनील जोशी, मुख्याध्यापक श्री. सतीश वाघमारे या सर्व शालेय तपासणी समितीच्या टीमने प्रशालेची तपासणी केली. शालेय तपासणीस आलेल्या या सर्व टीमचे एन. सी. सी. छात्रांनी ढोल ताशांच्या गजरात मार्चिंग करत स्वागत केले. या टीमने भौतिक सुविधा तपासणी, प्रशासन विषयक, शैक्षणिक अध्ययन, अध्यापन प्रक्रिया, शालेय विभाग, गुणवत्ता संवर्धन, विशेष उपक्रम अशा ६ विभागांच्या फाईल्सची तपासणी करून तालुकास्तरावरील गुणांकन केले.

याप्रसंगी या समितीतील सर्व सदस्यांनी प्रशालेतील ऑफिस, एन. सी. सी. रूम, फिजिक्स लॅब, ई लर्निंग रूम, इंदुमती वाचनालय या सर्व ठिकाणी भेट देऊन तपासणी केली. याप्रसंगी या सर्वांनी इयत्ता ११वी कॉम्प्युटर सायन्सची विद्यार्थिनी कु. ऋचा सुतार हिने केलेला ३ डी शेपमधील भौमितिक आकृत्यांचा प्रकल्प तसेच इयत्ता ११ वी आयटी डिव्हिजन मधील कु. रिती दास आणि कु. तितली दास या विद्यार्थिनींनी केलेला नैसर्गिक शेतीवरील प्रकल्प पाहिला. तसेच या सर्वांनी प्रशालेच्या मिनी सायन्स सेंटरलाही भेट देऊन तेथील सर्व वस्तूंची पाहणी केली.

शाळा तपासणीनंतर या सर्व पदाधिकाऱ्यांनी प्रशालेतील सर्व शिक्षकांची सभा घेतली. या सभेचे प्रास्ताविक आणि स्वागत प्राचार्य व्ही. पी. गावडे यांनी केले. शाळा तपासणीसाठी आलेल्या सर्व पदाधिकाऱ्यांचा पुष्पगुच्छ, श्रीफळ, प्रशालेची स्मरणिका देऊन सत्कार करण्यात आला. याप्रसंगी माजी मुख्याध्यापक श्री. हरिश्चंद्र गायकवाड यांनी प्रशालेतील सर्व शिक्षकांना शैक्षणिकदृष्ट्या विद्यार्थ्यांची गुणवत्ता कशी वाढवावी व इतरही अनेक बाबींवर मार्गदर्शन केले. या प्रसंगी कनिष्ठ महाविद्यालयाच्या अध्यापिका सौ. राजश्री कसबे यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. या सभेचे सूत्रसंचालन अध्यापक श्री. ज्ञानेश्वर दाते यांनी केले. उपस्थितांचे आभार अध्यापिका सौ. कीर्ती राठोड यांनी मानले. या प्रसंगी फलकलेखन अध्यापक श्री. अक्षय मसरकोल्हे यांनी केले.

**स्वामी विवेकानंद जयंती - राष्ट्रीय युवा दिन, राजमाता जिजाऊ जयंती उत्साहात साजरी**

सोमवार दि. १३ जानेवारी २०२५ रोजी स्वामी विवेकानंद जयंती - राष्ट्रीय युवा दिन, राजमाता जिजाऊ

जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाचे आयोजन प्राचार्य व्ही. पी. गावडे आणि अध्यापक श्री. संदीप सातपुते यांनी केले. प्राचार्य व्ही. पी. गावडे यांचे हस्ते स्वामी विवेकानंद व राजमाता जिजाऊ यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. अध्यापक श्री. ज्ञानेश्वर दाते यांनीही स्वामी विवेकानंद व राजमाता जिजाऊ यांच्या प्रतिमेचे पूजन केले. अध्यापक श्री. गोकुळ भरत भगरे, श्री. अक्षय मरसकोल्हे, कु. श्रावणी देवकर, कु. प्रतिभा जगतबंधू मांजी, सौ. माधुरी पाडवी, सौ. दिप्तीनी इंगोले, सौ. राजेश्वरी केंदळे यांनी स्वागतगीत गायले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत अध्यापक श्री. संदीप सातपुते यांनी केले. अध्यापक श्री. संदीप सातपुते यांनी प्राचार्य व्ही. पी. गावडे आणि अध्यापक श्री. ज्ञानेश्वर दाते यांचा गुलाबपुष्प देऊन सत्कार केला. विद्यार्थी कु. मंदार तेलंग इ. ८ वी - स्वामी विवेकांनद आणि कु. चैतन्य पवार इ. ९ वी - स्वामी विवेकांनद आणि राजमाता जिजाऊ यांच्या कार्याची माहिती विद्यार्थ्यांना सांगितली. अध्यापक श्री. महेश घाडगे यांनी स्वामी विवेकांनद यांच्या कार्याची माहिती विद्यार्थ्यांना सांगितली. अध्यापिका सौ. माधुरी पाडवी यांनी राजमाता जिजाऊ व सौ. राजेश्वरी केंदळे यांनी राष्ट्रीय युवादिनाबद्दल मनोगत व्यक्त केले. प्राचार्य व्ही. पी. गावडे यांनी स्वामी विवेकांनद आणि अध्यापक श्री. ज्ञानेश्वर दाते यांनी स्वामी विवेकांनद आणि राजमाता जिजाऊ यांच्या कार्याची माहिती विद्यार्थ्यांना दिली. अध्यापिका कु. श्रावणी देवकर यांनी विद्यार्थ्यांकडून राष्ट्रीय युवा दिनानिमित्त विविध उपक्रम करवून घेतले. या कार्यक्रमाचे फलकलेखन अध्यापक श्री. अक्षय मरसकोल्हे यांनी केले. या प्रसंगी अध्यापिका कु. अंजली कोल्हे, कु. श्रावणी देवकर आणि कु. दुर्वा कळंबाटे यांनी सुंदर रांगोळी काढली होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अध्यापिका सौ. दिप्तीनी इंगोले यांनी केले. या कार्यक्रमास प्रशालेतील शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाची सांगता अध्यापिका कु. प्रतिभा मांजी यांच्या आभारप्रदर्शनाने झाली.

**पालक - शिक्षक सभा**

शनिवार दि. १८ जानेवारी २०२५ रोजी शैक्षणिक वर्ष २०२४ - २५ या वर्षातील दुसरी पालक - शिक्षक सभा आयोजित करण्यात आली होती. या सभेचे आयोजन प्राचार्य व्ही. पी. गावडे आणि पालक शिक्षक संघ समितीप्रमुख अध्यापक श्री. निलेश चौदार यांनी केले. ही पालक शिक्षक सभा प्रथम इ. ५ वी ते १० वी अशी सर्व वर्गशिक्षकांनी घेतली. यानंतर सर्व वर्गांची एकत्र सभा घेण्यात आली. या एकत्रित सभेचे प्रास्ताविक अध्यापक पालक शिक्षक संघ समितीप्रमुख अध्यापक श्री. निलेश चौदार यांनी केले. प्राचार्य व्ही. पी. गावडे यांनी विद्यार्थ्यांच्या हिताच्या दृष्टीने सर्वसमावेशक सूचना व इतर विविध विषयांवर चर्चा केली. शासन आदेशानुसार विद्यार्थ्यांचे अपार आयडी काढण्यासंदर्भात सूचना व त्याचे महत्त्वही पालक - शिक्षक सभेत सांगितले. या सभेचे सूत्रसंचालन अध्यापक श्री. निलेश चौदार यांनी केले. या प्रसंगी उत्कृष्ट फलक लेखन अध्यापक श्री. युवराज मिरखलकर यांनी केले. अध्यापिका सौ. सविता जगताप यांनी आभारप्रदर्शन केले. ***



**वार्षिक स्नेहसंमेलन आणि पारितोषिक वितरण समारंभ प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून अजिंक्य डी. वाय. पाटील विद्यापीठ, पुण्याचे उपाध्यक्ष डॉ. एकनाथ बी. खेडकर आणि प्राचार्य व्ही. पी. गावडे यांच्या हस्ते अष्टपैलू विद्यार्थी म्हणून भागवत ढाल स्वीकारताना आश्रमस्थ विद्यार्थी चि. युवराज पवार, समवेत कोषाध्यक्ष श्री. कृष्णाजी कुलकर्णी आणि संचालक डॉ. राजेंद्र कांबळे**

# मुक्तांगण इंग्लिश स्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, पुणे ९

**संचालक : श्री. आनंद कुलकर्णी**
**उपकार्याध्यक्ष : श्री. एस. एम. जिर्गे**
**प्राचार्या : सौ. सुप्रिया देशकुलकर्णी**
**मुख्याध्यापिका : सौ. रेखा बाली**

## पूर्व प्राथमिक विभाग

### बालदिन

गुरुवार दि. १४ नोव्हेंबर २०२४ रोजी बालदिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. सर्व विद्यार्थ्यांनी रंगीत कपडे परिधान केले होते. दोन्ही सत्रातील शिक्षकांनी विद्यार्थ्यांना पपेट शो द्वारे गोष्टी सांगितल्या.

### ओपन डे

शनिवार दि. १६ नोव्हेंबर २०२४ रोजी ओपन डे चे आयोजन केले होते. सकाळी ९.३० ते १०.३० या वेळेत शिशुगट व छोट्या गटाचा आणि सकाळी ११.०० ते १२.०० या वेळेत मोठ्या गटाचा 'ओपन डे' आयोजित करण्यात आला. होता. यावेळी शिक्षकांनी पालकांना उत्तर पत्रिकेचे वाटप केले. त्यांच्या शंकांचे निरसन केले. तसेच पुढे होणाऱ्या स्पर्धा व वार्षिक स्नेहसंमेलनाविषयी थोडक्यात माहिती दिली.

### चित्रकला व सुंदर हस्ताक्षर स्पर्धा

सोमवार दि. १८ नोव्हेंबर २०२४ रोजी छोट्या गटातील विद्यार्थ्यांसाठी चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांनी त्यांना दिलेल्या चित्रामध्ये सुंदर रंग भरले. या स्पर्धेसाठी सौ. गिरिजा वाशीकर यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले.

याच दिवशी मोठ्या गटातील विद्यार्थ्यांसाठी इंग्रजी सुंदर हस्ताक्षर स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. सौ. तेजस्विनी आठल्ये व सौ. ऐश्वर्या तेलकर यांनी या स्पर्धेचे परीक्षक म्हणून काम पाहिले.

### वक्तृत्व स्पर्धा

सोमवार दि. २५ नोव्हेंबर २०२४ रोजी वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन केले होते.

शिशुगटातील विद्यार्थ्यांनी इंग्रजी कविता गायली. छोट्या गटातील विद्यार्थ्यांसाठी माझा आवडता ऋतू व माझा आवडता खेळ यापैकी एका विषयावर स्पर्धा आयोजित केली होती. मोठ्या गटातील विद्यार्थ्यांसाठी माझा आवडता सण किंवा मोठे झाल्यावर मला काय बनायला आवडेल हे दोन विषय देण्यात आले होते.

सकाळच्या सत्रात सौ. मनीषा ललवाणी, सौ. रश्मी देव व सौ. संजीवनी पोळके यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले. दुपारच्या सत्रात सौ. सोनल काणे, सौ. रचना कापसे व सौ. अपेक्षा पवार यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले.

### मैदानी स्पर्धा

गुरुवार दि. २८ नोव्हेंबर व शुक्रवार दि. २९ नोव्हेंबर २०२४ रोजी मैदानी स्पर्धा घेण्यात आल्या.

शिशु गटासाठी धावणे, बॅग भरणे आणि बस पकडणे या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. छोट्या आणि मोठ्या गटासाठी धावणे आणि उड्या मारणे या स्पर्धांचे आयोजन केले होते. सर्व विद्यार्थ्यांनी या मैदानी स्पर्धांचा आनंद लुटला.

## प्राथमिक विभाग

### बाल संस्कार वर्ग सुरू

दि. १४ नोव्हेंबर २०२४ पासून मिनी के. जी. ते इ. १ ली च्या विद्यार्थ्यांसाठी बाल संस्कार वर्ग सुरू करण्यात आला.

### शैक्षणिक प्रदर्शन क्युरिअस २०२४ - २५

शनिवार दि. ३० नोव्हेंबर व १ डिसेंबर २०२४ रोजी शैक्षणिक प्रदर्शन 'क्युरिअस २०२४-२५' चे उद्घाटन प्रमुख पाहुणे डॉ. मकरंद जोशी, डायरेक्टर रिसर्च ॲण्ड डेव्हलपमेंट एस्टॅब्लिशमेंट (इंजिनिअर्स) यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी इ. २ री च्या कब आणि बुलबुलच्या विद्यार्थ्यांनी पाहुण्यांचे स्वागत केले.

विद्यार्थी व पालकांनी दिलेल्या उत्स्फूर्त प्रतिसादामुळे क्युरिअस २०२४ - २५ प्रदर्शन अतिशय उत्साहात पार पडले. विद्यार्थ्यांनी बनवलेले चलत प्रकल्प व त्याचबरोबर ते कसे बनवले व त्याचा उपयोग याची माहिती विद्यार्थ्यांनी त्यांच्या प्रकल्पास भेट देणाऱ्या पालकांना सांगितली.

याप्रसंगी उपकार्याध्यक्ष श्री. एस. एम. जिर्गे, संचालक श्री. आनंद कुलकर्णी, मुख्याध्यापिका सौ. रेखा बाली, विभाग प्रमुख सौ. जया शेट्टी, पर्यवेक्षिका सौ. स्वाती महाजन व सौ. मनीषा नाईक, शिक्षक प्रतिनिधी सौ. वैशाली डबीर उपस्थित होत्या.

### ॲबॅकस व वेदिक मॅथ्स वर्गांचे आयोजन

रविवार दि. ८ डिसेंबर २०२४ पासून इ. १ ली ते इ. ४ थी च्या विद्यार्थ्यांसाठी एकाग्रता व स्मरणशक्ती वाढवण्यासाठी तसेच गणितातील सोप्या क्लृप्त्या, गणिते सोडवण्यासाठी लागणारी कौशल्ये आत्मसात करण्यासाठी ॲबॅकस व वेदिक मॅथ्स यांचे वर्ग दर रविवारी सुरू करण्यात आले आहेत.

### स्केटिंग वर्गांचे आयोजन

मंगळवार दि. २६ नोव्हेंबर २०२४ पासून विनर्स स्केटिंग ॲकॅडेमी यांच्यातर्फे स्केटिंग या खेळाचे वर्ग आठवड्यातून तीन दिवस, असे सुरू करण्यात आले आहेत.

### वार्षिक क्रीडा दिन उत्साहात संपन्न

शनिवार दि. १४ डिसेंबर २०२४ रोजी वार्षिक क्रीडा दिनाचे आयोजन करण्यात आले होते. प्रमुख पाहुणे ग्रॅण्ड मास्टर चंद्रकांत भोसले, जागतिक उपाध्यक्ष आणि एशियन तायक्कांदो क्रीडा प्रमुख यांचे स्वागत इ. २ री तील कब आणि बुलबुलच्या विद्यार्थ्यांनी केले. प्राथमिक विभागातील बॅण्ड पथकाने मार्चपासच्या तालावर ग्रॅण्ड मास्टर चंद्रकांत भोसले यांचे व संस्थेच्या उपस्थित पदाधिकाऱ्यांचे स्वागत केले. यावर्षी प्रथमच प्राथमिक विभागाच्या संगीत शिक्षिका सौ. सुचेता परांजपे यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी सुश्राव्य गायन व वादन करून प्रमुख पाहुण्यांचे स्वागत केले.

कार्यक्रमाची सुरूवात ग्रॅण्ड मास्टर चंद्रकांत भोसले यांच्या हस्ते ध्वजारोहण व मशाल प्रज्वलनाने करण्यात आली. इ. १ ली ते इ. ६ वी च्या विद्यार्थी गटाने योगासन - मनोरे सादर करून कार्यक्रमात रंगत आणली.

याप्रसंगी शैक्षणिक वर्षात आंतरवर्गीय क्रीडा स्पर्धा व आंतरदेशीय स्पर्धांमध्ये विजेत्या विद्यार्थ्यांना ग्रॅण्ड मास्टर चंद्रकांत भोसले यांच्या हस्ते बक्षिसे व प्रशस्तीपत्रके देण्यात आली. या वर्षीचा उत्कृष्ट खेळाडूचा मान इ. ४ थी ड मधील कु. स्पृहा पवार या विद्यार्थिनीने मिळवला. या प्रसंगी ग्रॅण्ड मास्टर चंद्रकांत भोसले यांनी शाळेत सुरू असलेल्या विविध खेळांच्या वर्गांबद्दल समाधान व्यक्त करून तायक्कांदो खेळामध्ये विशेष प्राविण्य मिळवणाऱ्या विद्यार्थ्यास त्यांनी शिष्यवृत्ती जाहीर केली. याप्रसंगी उपकार्याध्यक्ष श्री. एस. एम. जिर्गे, संचालक श्री. आनंद कुलकर्णी, मुख्याध्यापिका सौ. रेखा बाली, विभाग प्रमुख सौ. जया शेट्टी, पर्यवेक्षिका सौ. स्वाती महाजन व सौ. मनीषा नाईक, शिक्षक प्रतिनिधी सौ. वैशाली डबीर उपस्थित होत्या.

## माध्यमिक विभाग

### वार्षिक प्रदर्शन

दि. २५ ते २७ नोव्हेंबर २०२४ रोजी वार्षिक प्रदर्शन आयोजित केले होते. या प्रदर्शनात भारतातील ग्रामीण जीवन, विज्ञानातील कल्पकता व राष्ट्राचे विकसित भारतात होणारे रूपांतर असे वेगवेगळे विषय होते. विद्यार्थ्यांनी ऐतिहासिक विषयांवरील विविध देखावे देखील तयार केले होते. लोक व आदिवासी कला असाही एक विभाग होता. या प्रदर्शनासाठी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. आर. एल. देवपूरकर हे उपस्थित होते. या प्रदर्शनास विद्यार्थ्यांचा उदंड आणि उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. इतिहास, कला, हस्तकला आणि विज्ञान या विद्यार्थी निर्मित प्रकल्पांमध्ये त्यांचे समर्पण, सर्जनशीलता व त्यांची नाविन्यपूर्णता दिसून आली. प्रमुख पाहुण्यांनी विद्यार्थी कलाकारांच्या मेहनतीचे कौतुक केले.

**विज्ञान ऑलिंपियाड**

दि. ३ डिसेंबर २०२४ रोजी इ. ७ वी ते ९वीच्या विद्यार्थ्यांसाठी विज्ञान ऑलिंपियाड परीक्षा घेण्यात आली.

**वार्षिक क्रीडादिन**

दि. १३ डिसेंबर २०२४ रोजी वार्षिक क्रीडादिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी उपकार्याध्यक्ष श्री. एस. एम. जिर्गे, संचालक श्री. आनंद कुलकर्णी, प्र. प्राचार्या सौ. सुप्रिया देशकुलकर्णी, शिक्षकवर्ग, इ. ७ वी ते इ. १२ वी चे विद्यार्थी आणि मान्यवर उपस्थित होते. प्रमुख पाहुणे प्रसिध्द गिर्यारोहक ॲड. उमेश झिरपे यांच्या हस्ते ध्वजारोहण करून कार्यक्रमास सुरूवात झाली. या प्रसंगी राज्यस्तरीय, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर विशेष कामगिरी केलेल्या खेळाडू विद्यार्थ्यांच्या हस्ते मशाल प्रज्वलित करण्यात आली. राज्यस्तरावर व राष्ट्रीय स्तरावर विजेत्या विद्यार्थ्यांसह विविध वैयक्तिक आणि सांघिक स्पर्धेतील विजेत्या स्पर्धकांना पारितोषिकांचे वितरण प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आले. या वर्षीचा सर्वोत्कृष्ट क्रीडास्पर्धेचा चषक बोस हाऊसच्या विद्यार्थ्यांना मिळाला.

गिर्यारोहणामुळे जीवनात काय, काय शिकता येते याचे मार्गदर्शन ॲड. उमेश झिरपे यांनी विद्यार्थ्यांना केले. क्रीडाशिक्षक श्री. हर्षद मोघे यांच्या मार्गदर्शनाखाली दि. २८ नोव्हेंबर २०२४ ते १० डिसेंबर २०२४ दरम्यान विविध क्रीडा उपक्रम घेण्यात आले.

**मराठी नाट्यवाचन स्पर्धा**

दि. २९ नोव्हेंबर २०२४ रोजी इंटरहाऊस मराठी नाट्यवाचन स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेचा विषय सामाजिक संदेश देणारे नाटक हा होता. यात बोस, टागोर, विवेकानंद व टिळक हाऊसच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. या स्पर्धेत विवेकानंद हाऊसला प्रथम क्रमांक प्राप्त झाला आणि बोस हाऊसला द्वितीय क्रमांक प्राप्त झाला. विवेकानंद हाऊसचा नाट्यवाचनाचा विषय 'व्यसनांपासून लांब रहा' व विद्यार्थी दशेत विद्यार्थ्यांसारखच वागा हा होता. या स्पर्धेसाठी शाळेच्या माजी शिक्षिका सौ. शर्मिला केळकर व कनिष्ठ महाविद्यालयाच्या शिक्षिका सौ. मंजिरी पाटणकर यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले.

**इंटरहाऊस शॉर्ट मॅगझिन स्पर्धा**

दि. १४ डिसेंबर २०२४ रोजी इ. ७ वी ते इ. १० वी च्या विद्यार्थ्यांसाठी इंटरहाऊस शॉर्ट मॅगझिन स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेत बोस हाऊसच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. वैविध्यपूर्ण विषय घेऊन विद्यार्थ्यांनी नाविन्यपूर्णरीतीने स्वहस्ताक्षरात शॉर्ट मॅगझिन्स तयार केली.

**समुपदेशनपर व्याख्यानाचे आयोजन**

दि. १० डिसेंबर २०२४ रोजी इ. १० वी च्या विद्यार्थ्यांसाठी बोर्ड परीक्षेची पूर्वतयारी कशी करावी या विषयावर शाळेच्या समुपदेशिका सौ. सावनी ओक यांचे समुपदेशनपर व्याख्यान आयोजित केले होते. सौ. सावनी ओक यांनी विद्यार्थ्यांना वेळेचे, तणावाचे व्यवस्थापन कसे करावे, विद्यार्थ्यांनी निरोगी जीवनशैली कशी आत्मसात करावी या विषयांवर मार्गदर्शन केले.

**करिअर मार्गदर्शनपर व्याख्यानाचे आयोजन**

दि. १६ डिसेंबर २०२४ राजी इ. १० वीच्या विद्यार्थ्यांसाठी अभिनव करिअर स्कोप या संस्थेच्या संचालिका सौ. रीना भुतडा यांचे करिअर मार्गदर्शनपर व्याख्यान आयोजित केले होते. सौ. रीना भुतडा यांनी इ. १० वी नंतर आणि इ. १२ वी नंतर करिअरच्या कोणकोणत्या संधी आहेत यावर मार्गदर्शन केले.

**डॉ. होमी भाभा बालवैज्ञानिक परीक्षा**

दि. २३ नोव्हेंबर २०२४ रोजी इ. ७ वी ते इ. ९वी च्या विद्यार्थ्यांसाठी डॉ. होमी भाभा बालवैज्ञानिक परीक्षा घेण्यात आली. या परीक्षेत इ. ६ वी चे १९ विद्यार्थी आणि इ. ९ वी चे ७ विद्यार्थी सहभागी झाले. यापैकी कु. आदित्य खंडागळे, इ. ९ वी ड हा विद्यार्थी सराव परीक्षेच्या दुसऱ्या पातळीसाठी पात्र ठरला.

## अभिनंदनीय

✻ आंतरराष्ट्रीय पर्वत दिनाच्या निमित्ताने गिरीप्रेमी संस्थेतर्फे घेण्यात आलेल्या ऑनलाइन चित्रकला स्पर्धेत विद्यार्थी कु. शौर्य कुलकर्णी इ. ८ वी अ याला प्रथम क्रमांकाचे पारितोषिक रोख रु. ५,०००/- प्राप्त झाले. तसेच कु. प्रकीर्ती पटेल इ. ७ वी ड या विद्यार्थिनीस उत्तेजनार्थ बक्षीस रोख रु. १,०००/- प्राप्त झाले.

✻ दि. २९, ३० नोव्हेंबर २०२४ रोजी बिनो रिओ कराटे दो असोसिएशन, बालेवाडी, पुणे येथे आयोजित केलेल्या राष्ट्रीय स्तरावरील कराटे स्पर्धेमध्ये विद्यार्थिनी कु. संजना गायकवाड इ. ९ वी ड हिला काटा या क्रीडाप्रकारात सुवर्णपदक मिळाले.

दि. १६ नोव्हेंबर २०२४ रोजी पुणे जिल्हा डॉजबॉल असोसिएशनतर्फे आयोजित १२ व्या कनिष्ठ स्तरावरील डॉजबॉल स्पर्धेच्या निवड प्रक्रियेमध्ये शाळेतील १५ विद्यार्थी सहभागी झाले होते. त्यापैकी खालील ७ विद्यार्थ्यांची निवड झाली.

| विद्यार्थ्याचे नाव | इयत्ता / तुकडी |
|---|---|
| कु. श्रेयस मोरे | ८ वी ड |
| कु. वेदांत शिंगारे | ९ वी इ |
| कु. ऋतुराज रासकर | ९ वी इ |
| कु. वेदांश कारकांडे | ९ वी इ |
| कु. श्रीमयी देवकर | १० वी ड |
| कु. यशश्री ढोबळे | १० वी क |
| कु. सिया पुजारी | १० वी क |

दि. १४ डिसेंबर २०२४ रोजी आयुका, पुणे येथे इ. ९ वी च्या ॲस्ट्रॉनॉमी क्लबच्या विद्यार्थ्यांकरिता प्रसिध्द खगोलशास्त्रज्ञ जेन कार्ल्टन यांचे चर्चासत्र आयोजित करण्यात आले होते.

## उच्च माध्यमिक विभाग

## अभिनंदनीय

✻ कनिष्ठ महाविद्यालयातील जीवशास्त्र विभागाच्या शिक्षिका संगीता लेले यांना सौ. विमलाबाई गरवारे शाळा व कनिष्ठ महाविद्यालय येथे दि. २९ नोव्हेंबर २०२४ रोजी सकाळी ८.०० ते ९.३० या वेळेत विद्यार्थ्यांच्या मार्गदर्शनासाठी आमंत्रित करण्यात आले होते. इ. १२ वी च्या विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढावा व बोर्डाची परीक्षा अत्यंत आत्मविश्वासपूर्वक व तणावमुक्त वातावरणात कशी देता येईल या संबंधी त्यांनी उत्तम मार्गदर्शन केले. शिक्षिका संगीता लेले यांचे संस्थेच्या वतीने हार्दिक अभिनंदन.

✻ कनिष्ठ महाविद्यालयातील भूगोल विभागाच्या शिक्षिका प्रमिला धावारे यांना कमला शैक्षणिक संस्थेचे प्रतिभा कनिष्ठ महाविद्यालय येथे व्याख्यानासाठी दि. ९ डिसेंबर २०२४ रोजी आमंत्रित करण्यात आले होते. तणावमुक्त व आत्मविश्वासपूर्वक वातावरणात पेपर कसा सोडवता येईल याबद्दल त्यांनी मार्गदर्शन केले. भूगोलाचा पेपर सोडवण्यासाठी काही विशिष्ट क्लृप्त्या कशा वापरता येतील या संबंधी देखील त्यांनी मार्गदर्शन केले. तसेच भूगोलाचा बोर्डाचा पेपर कसा असतो याविषयी सखोल मार्गदर्शन केले. शिक्षिका प्रमिला धावारे यांचे संस्थेच्या वतीने हार्दिक अभिनंदन.

## सर्वोत्कृष्ट विद्यार्थिनी म्हणून निवड

इ. १२ वी च्या तुकड्यांमधून सर्वोत्कृष्ट विद्यार्थिनी किंवा विद्यार्थी म्हणून एका विद्यार्थ्यास मान मिळतो. सन २०२४ या वर्षासाठी कु. श्रुती सूर्यकांत भिंताडे या इयत्ता १२ वी क च्या विद्यार्थिनीने हा मान मिळवला. मुलाखतीच्या माध्यमातून तिची निवड झाली आहे. कु. श्रुती सूर्यकांत भिंताडे हिचे संस्थेच्या वतीने हार्दिक अभिनंदन आणि पुढील वाटचालीस शुभेच्छा.

## व्यवसाय निवडीबाबत मार्गदर्शन व्याख्यान

इ. १२ वी ची परीक्षा दिल्यानंतर भावी आयुष्यात कशा प्रकारच्या संधी उपलब्ध असतील याबद्दलचे मार्गदर्शन करण्यासाठी दि. ६ डिसेंबर २०२४ रोजी एम. बी. पाटील शिक्षण संस्थेतील श्री. रामेश्वर गगरानी यांना आमंत्रित करण्यात आले होते.

श्री. रामेश्वर गगरानी यांनी वैद्यकीय, अभियांत्रिकी या क्षेत्रात कोणकोणत्या संधी आहेत या संबंधीचे उपयुक्त मार्गदर्शन केले. इयत्ता ११ वी च्या विद्यार्थ्यांनीही या व्याख्यानास उपस्थित होत्या. ✻✻✻

## विद्याभवन–घाटकोपर, मुंबई शाखा

**कार्याध्यक्ष : श्री. राजेंद्र वि. बोऱ्हाडे**

**विद्याभवन संकुल**

**आंतर शालेय टेबल टेनिस स्पर्धा**

विद्याभवन घाटकोपर संकुलातील अप्पासाहेब गरगटे सभागृहात दि. २० डिसेंबर २०२४ रोजी कुलगुरू दादासाहेब केतकर आंतरशालेय टेबल टेनिस स्पर्धा पार पाडली. सदर स्पर्धेत ज्युनिअर गट मुले/मुली, सीनियर गट मुले/मुली अशा एकूण ६७ स्पर्धकांनी भाग घेतला होता. स्पर्धेचे उद्घाटन माध्यमिक मराठी विभागाच्या मुख्याध्यापिका श्रीमती योगिनी पोतदार यांनी केले. माध्यमिक इंग्रजी विभागाचे मुख्याध्यापक श्री. सुनील पाटील, उपमुख्यध्यापिका श्रीमती श्रीलता नायर, श्रीमती ज्योती देसाई तसेच समन्वयिका श्रीमती सरला नरेंद्रन इ. मान्यवर स्पर्धेस उपस्थित होते. विजेत्या खेळाडूंचा सर्व मान्यवरांनी व स्पर्धेस लाभलेले राज्यस्तरीय खेळाडू श्री. ओजस घाडी व श्री. किरण परमार यांनी विजेत्यांना प्रमाणपत्र व ट्रॉफी देऊन गौरवीले. इंग्रजी माध्यमाच्या सहाय्यक शिक्षिका श्रीमती अस्मिता चौधरी यांनी या स्पर्धेस मोलाचे योगदान दिले.

**विद्याभवन मराठी माध्यमाच्या तुकडी अ, ब, क शैक्षणिक वर्ष २००३-०४ च्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेहसंमेलन सोहळा**

विद्याभवन सेमिनार हॉल येथे रविवार दि. १२ जानेवारी २०२५ रोजी पार पडला. २० वर्षानंतर गुरू शिष्यांच्या झालेल्या भेटीमुळे अनेकांचे डोळे पाणावले. सर्व विद्यार्थ्यांनी आपला परिचय दिला आणि जुन्या आठवणींना उजाळा देत आनंद लुटला. शिक्षकांविषयी आपली कृतज्ञता व्यक्त केली. आपण दिलेल्या संस्कारांची शिदोरी घेऊन वेगवेगळ्या क्षेत्रांमध्ये उच्च पदावर काम करणारे विद्यार्थी पाहून शिक्षकही धन्य झाले. या प्रसंगी माजी प्राचार्य श्री. कृष्णाजी ना. शिरकांडे तसेच माजी मुख्याध्यापक व शिक्षक, एकूण ७५ विद्यार्थी व विद्यार्थिनी उपस्थित होत्या.

## विद्याभवन पूर्व प्राथमिक सेमी इंग्रजी

**कार्याध्यक्ष : श्री. राजेंद्र वि. बोऱ्हाडे**

**समन्वयिका : श्रीमती शुभांगी मच्छिंद्र जाधव**

**नाताळ सण**

दि. २४ डिसेंबर २०२४ रोजी नाताळ सणानिमित्त विद्यार्थ्यांसाठी ख्रिसमस पार्टीचे आयोजन करण्यात आले होते. यादिवशी सर्व विद्यार्थी सान्ताची टोपी घालून शाळेत आले होते. छोटा शिशु वर्गातील एका विद्यार्थ्याने सान्ताची वेशभूषा केली होती. सर्व विद्यार्थ्यांनी छोट्या सान्ता बरोबर फोटो काढले. नंतर विद्यार्थ्यांना नाना - नानी उद्यानात फिरवून आणले व मुलांसोबत त्याच उद्यानात 'जिंगल बेल' या गाण्यावर रील सुद्धा बनवली. शिक्षकांनी मुलांकडून ख्रिसमस ॲक्टिव्हिटी म्हणून सान्ताचे चित्र रंगवून घेतले. सर्व मुलांना ख्रिसमस केक देण्यात आला. नाताळ आणि नवीन वर्षाच्या शुभेच्छा देऊन ख्रिसमस साजरा करण्यात आला.

## विद्याभवन पूर्व प्राथमिक इंग्रजी

**कार्याध्यक्ष : श्री. राजेंद्र वि. बोऱ्हाडे**

**पर्यवेक्षिका : सौ. पूजा फरिया (इंग्रजी माध्यम)**

**नाताळ सण**

विभागातील विद्यार्थ्यांनी दि. २३ आणि २४ डिसेंबर साजरा करण्यासाठी हेडगेवार उद्यानाला भेट दिली. तेथे विद्यार्थ्यांनी गाणी गाऊन झोपाळ्यावर व स्लाइडवर खेळण्याचा, तसेच विद्यार्थ्यांनी शाळेच्या हॉलमध्ये संगीत खुर्ची खेळण्याचा मनसोक्त आनंद घेतला. त्यांनी हा दिवस मोठ्या उत्साहाने साजरा केला. कार्यक्रमाच्या शेवटी स्वादिष्ट चोकोबार केकचे वाटप करण्यात आले.

## विद्याभवन प्राथमिक मराठी

**कार्याध्यक्ष : श्री. राजेंद्र वि. बोऱ्हाडे**
**मुख्याध्यापक : श्री. गणेश सुदाम कणसे**

### आंतरशालेय कथाकथन स्पर्धा

बृहन्मुंबई महानगरपालिका शिक्षण विभाग एन वॉर्ड अंतर्गत मंगळवार दि. १० डिसेंबर २०२४ रोजी घेण्यात आलेल्या कथाकथन स्पर्धेत विभागातील विद्यार्थ्यांनी चार पैकी तीन गटात घवघवीत यश मिळवले. यशस्वी विद्यार्थी खालील प्रमाणे

| क्रमांक | स्पर्धकाचे नाव | इयत्ता |
|---|---|---|
| द्वितीय | कु. आर्या स्वप्नील मुंढे | २री |
| | कु. नेहल अनिल शिंदे | ३री |
| तृतीय | कु. वृत्तिका रामचंद्र नाईक | ४थी |

### वार्षिक क्रीडा पारितोषिक वितरण समारंभ

विद्याभवन प्राथमिक मराठी शाळेचा वार्षिक क्रिडा स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ शनिवार दि. २१ डिसेंबर २०२४ रोजी संपन्न झाला.

पारितोषिक वितरण प्रसंगी मुख्याध्यापक श्री. गणेश कणसे, इंग्रजी प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती अनघा सावंत, शाळा व्यवस्थापक समिती, पालक-शिक्षक संघ, बाल हक्क सुरक्षा समिती, बाल सखी सावित्री समितीचे पालक प्रतिनिधी उपस्थित होते.

इयत्ता १ली ते ४थी च्या विद्यार्थ्यांनी ईश स्तवन व स्वागत गीत गायनाने उपस्थितांचे स्वागत केले. मुख्याध्यापक श्री. गणेश सुदाम कणसे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. इयत्ता १ली ते ४थी च्या विजयी स्पर्धकांना मुख्याध्यापक श्री. गणेश सुदाम कणसे व सर्व समित्यांचे पालक प्रतिनिधी यांच्या हस्ते मेडल व प्रमाणपत्र दऊन गौरविण्यात आले. तसेच लंगडी सांघिक खेळाच्या अंतिम विजयी संघाला ट्रॉफी व प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती शिल्पकला सावंत यांनी केले. श्री. डाफळे यांनी विजयी स्पर्धकांच्या नावाचे वाचन केले. मुख्याध्यापक श्री. गणेश सुदाम कणसे यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. शेवटी वंदेमातरम् या राष्ट्रीय गीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

### आंतरशालेय क्रीडा स्पर्धा

बृहन्मुंबई महानगरपालिका शिक्षण विभाग आयोजित एन वॉर्ड अंतर्गत शुक्रवार दि. २० डिसेंबर २०२४ रोजी घेण्यात आलेल्या क्रीडा स्पर्धेत विद्याभवन शाळेच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश मिळवले. यशस्वी विद्यार्थी खालील प्रमाणे.

**धावणे स्पर्धा - इयत्ता पहिली**

| | | |
|---|---|---|
| मुलगे | कु. रजनीकांत संजय सरगर | द्वितीय |
| मुली | कु. प्रांजल बाळू बिराजदार | द्वितीय |

**धावणे स्पर्धा - इयत्ता दुसरी**

| | | |
|---|---|---|
| मुलगे | कु. सार्थक सीताराम शिंदे | तृतीय |
| मुली | कु. अनवी अजित शिंदे | तृतीय |

**लंगड दौड स्पर्धा - इयत्ता तिसरी**

| | | |
|---|---|---|
| मुलगे | कु. श्रवण सुनील झोरे | प्रथम |

**लंगड दौड स्पर्धा - इयत्ता चौथी**

| | | |
|---|---|---|
| मुलगे | कु. अर्णव सुधीर करकरे | पाचवा |
| मुली | कु. काव्या दिनेश गुरव | पाचवा |

### सेवक स्पर्धा

बृहन्मुंबई महानगरपालिका खाजगी अनुदानित प्राथमिक शाळा आयोजित एन वॉर्ड अंतर्गत शुक्रवार दि. २० डिसेंबर २०२४ रोजी घेण्यात आलेल्या सेवकांसाठीच्या स्पर्धेत विद्याभवन प्राथमिक शाळेतील सेविक श्रीमती अनुराधा आनंदराव आणचेकर यांचा तृतीय क्रमांक आला.

### सेवापूर्ती समारंभ

विद्याभवन प्राथमिक मराठी शाळेतील शिक्षिका श्रीमती श्वेता अनिल खोत या नियत वयोमानानुसार दि. ३१ डिसेंबर २०२४ रोजी सेवानिवृत्त झाल्या. विद्याभवन प्राथमिक मराठी शाळेत त्या २०१८ साली रुजू झाल्या. त्या अगोदर त्यांनी बाल संस्कार शाळा

प्रतिक्षा नगर येथे २९ वर्षे सेवा केली. एकूण ३६ वर्षांच्या सेवेनंतर त्या सेवानिवृत्त झाल्या. सेवापूर्ती समारंभाला सर्व विभागांचे मुख्याध्यापक, पर्यवेक्षक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. संस्थेतर्फे त्यांना शाल, श्रीफळ व सन्मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले.

## विद्याभवन माध्यमिक मराठी व कनिष्ठ महाविद्यालय

**कार्याध्यक्ष : श्री. राजेंद्र वि. बोऱ्हाडे**

**मुख्याध्यापिका : श्रीमती योगिनी राजेंद्र पोतदार**

### आंतरशालेय स्पर्धा

शिक्षण महर्षी, समाजरत्न आबासाहेब दादासाहेब बंडगर यांच्या १५व्या स्मृतिदिनानिमित्त विविध आंतरशालेय स्पर्धा सरस्वती विद्यानिकेतन घाटकोपर येथे सोमवार व मंगळवार दि. ९ व १० डिसेंबर २०२४ रोजी घेण्यात आल्या. सदर स्पर्धेत विद्याभवन हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयातील पुढील विद्यार्थी पारितोषिक प्राप्त ठरला.

### जाहिरात पोस्टर स्पर्धा - मोठा गट

| क्रमांक | विद्यार्थ्याचे नाव | इ / तु |
|---|---|---|
| उत्तेजनार्थ | कु. जय उमेश जामसूदकर | ७वी अ |

### शिक्षक उद्बोधन

बुधवार दि. १८ डिसेंबर २०२४ रोजी विद्याभवन प्रशालेतील गणित विषयाचे अध्यापन करणाऱ्या शिक्षकांसाठी गणित विषयातील तज्ज्ञ मार्गदर्शक श्री. शरद दळवी यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.

गणित विषयातील कठीण संबोध सोप्या पध्दतीने विद्यार्थ्यांना समजवण्यासाठी शैक्षणिक साधनांचा वापर कसा करावा हे त्यांनी प्रात्यक्षिकाद्वारे सांगितले. तसेच स्कॉलरशिपच्या विद्यार्थ्यांसाठी आवश्यक अशा नाविन्यपूर्ण सोप्या क्लृप्त्या ही सांगितल्या.

मंगळवार दि. २३ डिसेंबर २०२४ रोजी विद्याभवन प्रशालेत विज्ञान व भूगोल विषयाचे अध्यापन करणाऱ्या शिक्षकांसाठी माऊली आर्ट्चे श्री. शरद कदम यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.

विज्ञान व भूगोल विषयातील संकल्पना विद्यार्थ्यांना स्पष्ट करून सांगण्यासाठी शैक्षणिक साधनांचा (Working Model) वापर कसा करावा हे त्यांनी प्रात्याक्षिकद्वारे समजावून सांगितले.

### उद्बोधन व्याख्यान

दि. २३ डिसेंबर २०२४ रोजी प्रशालेच्या अप्पासाहेब गरगटे सभागृहात प्रशालेतील शिक्षिका श्रीमती मीनल भोळे यांचे इ. १०वी च्या विद्यार्थ्यांसाठी मराठी या विषयाचे गुणवत्ता वाढीसाठी मार्गदर्शनपर व्याख्यान आयोजित केले होते.

### नवभारत साक्षरता

शुक्रवार दि. ३ जानेवारी २०२५ रोजी नवभारत साक्षरता कार्यक्रम अंतर्गत तालुकास्तरीय उल्हास मेळाव्यात आपल्या विद्याभवन हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयास आपत्तीचे प्रकार व स्वरूप या विषयावर एन वॉर्ड मधून स्टॉल मांडण्याची संधी मिळाली. प्रशालेतील शिक्षक श्री. विजय पाटील यांनी प्रोजेक्ट सादर केला.

शिक्षण उपनिरीक्षक (उत्तर विभाग) श्री. कंठे साहेब व विषय साधन व्यक्ती श्रीमती सुवर्णा सावंत, श्री. उदयकुमार शिंदे यांनी स्टॉलला भेट दिली. सदर कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी मार्गदर्शन केले.

### वार्षिक चित्रकला स्पर्धा

दि. २१ डिसेंबर २०२४ रोजी विद्याभवन माध्यमिक विभागात सहा. शिक्षक श्री. अर्जुन मस्के यांच्या मार्गदर्शनाखाली इ. ५वी ते १०वी च्या विद्यार्थ्यांची गटानुसार वार्षिक चित्रकला स्पर्धा घेण्यात आली.

**स्पर्धेचा निकाल खालीलप्रमाणे**

**गट : ५वी - ६वी**

| क्रमांक | स्पर्धकाचे नाव | इ/तु |
|---|---|---|
| प्रथम | कु. अवंतिका सुधीर वरे | ६वी/अ |
| द्वितीय | कु. स्वरा अजित शिंदे | ६वी/ब |
| तृतीय | १. कु. युगंधरा तुषार तोत्रे | ६वी/क |
| | २. कु. शुभ्रा पावनोजी गावडे | ६वी/क |
| उत्तेजनार्थ | १. कु. आराध्या सचिन काळे | ५वी/ब |
| | २. कु. सिद्धी नवनाथ पांगारे | ५वी/क |
| | ३. कु. प्रज्ञेश पंकज जाधव | ६वी/अ |
| | ४. कु. गार्गी सचिन गवळी | ६वी/ब |
| | ५. कु. श्रेया नामदेव कुटे | ६वी/ब |

**गट : इ. ७वी - ८वी**

| | | |
|---|---|---|
| प्रथम | कु. सुमेघा सुनील शेजवळ | ८वी/क |
| द्वितीय | कु. आर्या विलास सावंत | ८वी/ब |
| तृतीय | कु. जान्हवी सुनील शिवगण | ७वी/अ |
| उत्तेजनार्थ | कु. जय उमेश जामसूहकर | ७वी/अ |
| | कु. सानवी लक्ष्मण आव्हाड | ७वी/ब |
| | कु. मयुरी निलेश तोरणे | ७वी/ब |
| | कु. सिया कृष्णा शिंदे | ७वी/क |
| | कु. आर्या अमोल हांडे | ८वी/ब |

**गट : इ. ९वी - १०वी**

| | | |
|---|---|---|
| प्रथम | कु. मयांक सिद्धेश्वर भागवत | ९वी/अ |
| द्वितीय | कु. वृषाली नरेंद्र वास्टर | १०वी/क |
| तृतीय | कु. आयुष भिवा बोंडगे | ९वी/ब |
| उत्तेजनार्थ | १. कु. आनंद किशोर खंडागळे | ९वी/क |
| | २. कु. गणेश आबा उबाळे | ९वी/अ |
| | ३. कु. श्रावणी संदीप साठे | ९वी/क |
| | ४. कु. शांभवी अशोक राणे | ९वी/ब |
| | ५. कु. आदर्श अनंत मोरे | ९वी/अ |

**अभिनंदन वार्ता**

कला संचालनालय महाराष्ट्र राज्य यांच्या तर्फे घेण्यात येणाऱ्या एलेमेंट्री ग्रेड परीक्षा २०२४-२५ मध्ये शाळेचा निकाल ९८.४८% लागला एकूण ६६ विद्यार्थी परीक्षेला प्रविष्ट झाले होते. विद्यार्थ्यांनी पुढील प्रमाणे श्रेणी प्राप्त केली.

अ श्रेणी - २२ विद्यार्थी

ब श्रेणी - १४ विद्यार्थी

क श्रेणी - २९ विद्यार्थी

**ॲनिमिया मुक्त भारत**

शनिवार दि. ४ जानेवारी २०२५ रोजी भारत विकास परिषद व विद्याभवन प्रशाला यांच्या संयुक्त विद्यमाने ॲनिमिया मुक्त भारत या अभियानातर्गत इ. ७वी / ८वी मराठी व इंग्रजी माध्यमाच्या विद्यार्थिनींची तपासणी करण्यात आली. त्याचबरोबर महिला शिक्षिका व शिक्षकेतर महिला कर्मचारी यांचीही तपासणी करण्यात आली व त्यानंतर हिमोग्लोबिन वाढीसाठी चणे व गूळ यांचे वाटप करण्यात आले.

**निसर्ग मंडळ आयोजित बक्षिस समारंभ**

बुधवार दि. १५ जानेवारी २०२५ रोजी निसर्गमंडळ आयोजित हळदीकुंकू व बक्षीस समारंभ संपन्न झाला. या कार्यक्रमासाठी मराठी माध्यमाच्या मुख्याध्यापिका श्रीमती यागिनी पोतदार, उपमुख्याध्यापिका श्रीमती ज्योती देसाई, इंग्रजी विभागाचे मुख्याध्यापक श्री. सुनील पाटील, उपमुख्याध्यापिका श्रीमती श्रीलता नायर व समन्वयिका श्रीमती सरला नरेंद्रन हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.

बक्षिसपात्र विद्यार्थ्यांना उपस्थित पाहुणे व सहकारी शिक्षक यांच्या हस्ते बक्षिसे देण्यात आली. तसेच उपस्थित पाहुणे व शिक्षकांना विद्यार्थ्यांनी बनविलेले कागदी पुष्पगुच्छ व रुमाल देऊन हळदीकुंकू समारंभ साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. संस्कृती सरगर व कु. तमन्ना सय्यद यांनी केले. वार्षिक अहवाल वाचन कु. सानवी आव्हाड हिने केले. बक्षिसपात्र विद्यार्थ्यांची यादी वाचन कु. आसावरी पाटील या विद्यार्थिनीने केले.

कार्यक्रमाची सांगता कु. संस्कृती सरगर हिच्या आभार प्रदर्शनाने झाली. कार्यक्रमाचे नियोजन श्रीमती नंदिनी साके व श्री. अर्जुन मस्के यांनी केले.

**जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शन**

शिक्षण निरीक्षक बृहन्मुंबई उत्तर विभाग आयोजित ५२वे जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनांतर्गत विद्याभवन हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयातील पुढील शिक्षक व विद्यार्थिनी यांनी घवघवीत यश प्राप्त केले.

**वक्तृत्व स्पर्धा**

द्वितीय क्रमांक - कु. दुर्गा महेश पाटील - इ. १०वी.

**शिक्षकनिर्मिती शैक्षणिक साधन**

उत्तेजनार्थ - शिक्षक श्री. रुपेश नथुराम मांडवेकर

## विद्याभवन नं. २ माध्यमिक इंग्रजी

**कार्याध्यक्ष : श्री. राजेंद्र वि. बोऱ्हाडे**

**मुख्याध्यापक : श्री. सुनील भालचंद्र पाटील**

**वार्षिक क्रीडा पारितोषिक वितरण समारंभ**

विद्याभवन हायस्कूल नं. २ चा वार्षिक क्रीडा पारितोषिक समारंभ सोमवार दि. २३ डिसेंबर २०२४ रोजी प्रशालेच्या क्रीडांगणावर पार पडला. सदर कार्यक्रमासाठी श्री. अनुर पवार, राष्ट्रीय कराटे खेळाडू व मार्गदर्शन हे प्रमुख पाहुणे म्हणून लाभले होते. सदर कार्यक्रमाला मुख्याध्यापक श्री. सुनील पाटील, माध्यमिक मराठी विभागाच्या मुख्याध्यापिका सौ. योगिनी पोतदार, समन्वयिका सौ. सरला नरेंद्रन तसेच सर्व पदाधिकारी, पालक प्रतिनिधी, शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.

या कार्यक्रमात वार्षिक क्रीडा स्पर्धेत विजयी झालेल्या खेळाडूंना ट्रॉफी, मेडल व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. मुख्याध्यापक श्री. सुनील पाटील यांनी विद्याभवन हायस्कूल नं. २ च्या क्रीडा क्षेत्रातील विविध दैदिप्यमान घडामोडींचा आढावा घेतला. यशस्वी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. पराभूत विद्यार्थ्यांनी खचून न जाता जोमाने प्रयत्न करण्याचा सल्ला दिला. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे श्री. अनुर पवार यांनी देखील खेळाचे महत्त्व तसेच खेळ हा आपल्या जीवनात किती महत्त्वाचा आहे याबाबत आपले मत व्यक्त केले. विजेत्या सर्व खेळाडूंचे अभिनंदन करून विद्यार्थ्यांना पुढील काळासाठी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन क्रीडा शिक्षिका सौ. अस्मिता चौधरी यांनी केले. वंदेमातरम या गीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

**विद्याभवन हायस्कूल नं.२ चे एलिमेंटरी परीक्षेत उज्ज्वल यश**

कला संचलनालय महाराष्ट्र राज्य यांच्या तर्फे घेण्यात येणाऱ्या एलिमेंटरी ग्रेड परीक्षा २०२४-२५ चा निकाल दि. १३ जानेवारी २०२५ रोजी जाहीर झाला.

पुणे विद्यार्थी गृहाचे विद्याभवन हायस्कूल नं. २, घाटकोपर या शाळेचा निकाल ९८.९१% लागला. परीक्षेला एकूण ९३ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते. या विद्यार्थ्यांनी पुढील प्रमाणे ग्रेड प्राप्त केली.

अ श्रेणी - १७ विद्यार्थी
ब श्रेणी - २२ विद्यार्थी
क श्रेणी - ५३ विद्यार्थी

या सर्व विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शक शिक्षक श्री. संदीप तावडे व श्री. सुहास गरदडे यांचे हार्दिक अभिनंदन!

**जिल्हास्तरीय स्पर्धेत विद्याभवन हायस्कूल नं.२ची यशस्वी कामगिरी**

एन वॉर्ड स्तरावरील सहशालेय उपक्रमांतर्गत जिल्हास्तरावर विविध सहशालेय स्पर्धा घेण्यात आल्या होत्या. सदर स्पर्धेत विद्याभवन हायस्कूल नं. २ च्या खालील विद्यार्थ्यांनी जिल्हास्तरावर पारितोषिके पटकावली.

| स्पर्धा | विद्यार्थ्याचे नाव | इयत्ता | क्रमांक |
|---|---|---|---|
| चित्रकला | कु. तनिष्का कांबळे | १०वी | प्रथम |
| वक्तृत्व | कु. अनन्या पाटील | ९वी | तृतीय |
| एकपात्री अभिनय | कु. तनिष्का साबळे | ९वी | उत्तेजनार्थ |

***

## * विद्याभवन हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, घाटकोपर शाखा, मुंबई *




प्राथमिक मराठी विभागातील आंतरशालेय कथाकथन स्पर्धेमधील यशस्वी विद्यार्थिनी




बृहन्मुंबई महानगरपालिका शिक्षण विभाग एन वॉर्ड अंतर्गत कथाकथन स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थिनींन समवेत मुख्याध्यापक श्री. गणेश सुदाम कणसे आणि श्रीमती शीतल सतीश आंबि




आंतरशालेय क्रीडा स्पर्धांमध्ये पारितोषिक प्राप्त विद्यार्थ्यांसमवेत मुख्याध्यापक श्री. गणेश सुदाम कणसे



नाताळ सण साजरा करताना पूर्व प्राथमिक सेमी इंग्रजी विभागातील विद्यार्थी व शिक्षकवर्ग

## ⁕ विद्याभवन हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, घाटकोपर शाखा, मुंबई ⁕



बृहन्मुंबई महानगरपालिका शिक्षण विभाग एन वॉर्ड अंतर्गत सेवक स्पर्धेत श्रीमती अनघा आनंदराव आणचेकर यांनी तृतीय क्रमांक प्राप्त केला.



श्रीमती श्वेता अनिल खोत यांचा सेवा निवृत्तीनिमित्त सन्मान करताना मुख्याध्यापक श्री. गणेश कणसे, मुख्याध्यापिका श्रीमती योगिनी पोतदार, समन्वयक श्रीमती जाधव व श्रीमती सरला नरेंद्रन



ॲनिमिया मुक्त भारत अभियानांतर्गत प्रशालेतील विद्यार्थिनींची हिमोग्लोबिनची तपासणी करताना



वार्षिक चित्रकला स्पर्धेत सहभागी माध्यमिक मराठी विभागातील इ. ५वी ते ९वी चे विद्यार्थी

## ※ विद्याभवन हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, घाटकोपर शाखा, मुंबई ※



निसर्ग मंडळ आयोजित बक्षीस समारंभात विद्यार्थिनी कु. स्वरा अजित शिंदे
व विद्यार्थी कु. तन्मय दीपक नेमलेकर यांना बक्षीस देताना मुख्याध्यापिका श्रीमती योगिनी पोतदार



शिक्षण निरीक्षक बृहन्मुंबई उत्तर विभाग आयोजित ५२ व्या जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनात शिक्षक निर्मित शैक्षणिक साहित्य या स्पर्धेत उत्तेजनार्थ पारितोषिक स्वीकारताना शिक्षक श्री. रुपेश नथुराम मांडवेकर




वार्षिक क्रीडा पारितोषिक वितरण प्रसंगी प्रमुख पाहुणे श्री. अनुर पवार व बास्केटबॉल प्रशिक्षक श्री. सोनेश झोरे यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना पारितोषिके देऊन गौरवण्यात आले

## ✻ विद्याभवन हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, घाटकोपर शाखा, मुंबई ✻



शिक्षण निरीक्षक बृहन्मुंबई उत्तर विभाग आयोजित
५२ व्या जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनांतर्गत वक्तृत्व स्पर्धेत
द्वितीय क्रमांक मिळवणारी विद्यार्थिनी
कु. दुर्गा महेश पाटील इयत्ता १०वी अ



टेबल टेनिस स्पर्धेतील विजेत्या खेळाडूंना ट्रॉफी व प्रमाणपत्र देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले या प्रसंगी उपस्थित मुख्याध्यापक श्री. सुनील पाटील, मुख्याध्यापिका श्रीमती योगिनी पोतदार, उपमुख्याध्यापिका श्रीमती ज्योती देसाई, श्रीमती श्रीलता नायर, समन्वयिका श्रीमती सरला नरेंद्रन आदी मान्यवर



विद्याभवन मराठी माध्यम सन २००३ - ०४ च्या माजी विद्यार्थी स्नेहसंमेलन प्रसंगी उपस्थित
माजी विद्यार्थी - विद्यार्थिनींसमवेत माजी प्राचार्य श्री. के. एन. शिरकांडे आणि शिक्षक

# नेरूळ शाखा, नवी मुंबई

## विद्याभवन प्राथमिक इंग्रजी शाळा

### नेरूळ शाखा, नवी मुंबई

**कुलसचिव : श्री. दिनेश मिसाळ**

**प्र. मुख्याध्यापिका : सौ. मनीषा मुळीक**

### युवा मास्टर स्ट्रोक नवनीत चित्रकला स्पर्धा

दि. २६ नोव्हेंबर २०२४ रोजी युवा मास्टर स्ट्रोक या नवनीत प्रकाशनातर्फे आयोजित करण्यात आलेल्या चित्रकला स्पर्धेत प्राथमिक इंग्रजी विभागाच्या पुढील विद्यार्थ्यांनी सुयश संपादन केले. त्यांना चित्रकला संच बक्षीस स्वरूपात देण्यात आला. या स्पर्धेत एकूण २८७ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.

| विद्यार्थ्याचे नाव | इयत्ता | गट |
|---|---|---|
| कु. आकांक्षा प्रमोद यादव | ३ री | अ |
| कु. आराध्या दिनेश बोचरे | ३ री | अ |
| कु. श्रावणी रविंद्र दाभोळे | २ री | अ |
| कु. याज्ञी प्रवीण दायने | २ री | अ |
| कु. परी दिलीप भद्रा | १ ली | अ |
| कु. सय्यद गुडूसाब इलाही | ४ थी | ब |
| कु. सायली सुनील भद्रीगे | ४ थी | ब |

### चिन्मय मिशन गीता पठण स्पर्धा

दि. १ डिसेंबर २०२४ रोजी चिन्मय मिशन, मुंबई यांच्यातर्फे खारघर येथे आयोजित करण्यात आलेल्या गीता पठण स्पर्धेमध्ये पुढील विद्यार्थ्यांनी यश संपादित केले. या विद्यार्थ्यांना सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देण्यात आले.

| विद्यार्थ्याचे नाव | इयत्ता | गट | क्रमांक |
|---|---|---|---|
| कु. तनुष देवेंद्र पाटील | ३ री | क | तृतीय |
| कु. दुर्वा रोहन इंगवले | १ ली | ब | तृतीय |

**सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेच्या वतीने हार्दिक अभिनंदन आणि पुढील वाटचालीस शुभेच्छा !**

### बालसभा

दि. ९ डिसेंबर २०२४ रोजी प्राथमिक इंग्रजी विभागाच्या जल हाऊसची बालसभा आयोजित करण्यात आली होती. या कार्यक्रमास कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ, मुख्याध्यापिका श्रीमती मनीषा मुळीक, शिक्षकवृंद आणि विद्यार्थी उपस्थित होते. नटराजाच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमास सुरुवात झाली. या बालसभेत विद्यार्थ्यांनी छत्रपती शिवराय, श्रीगणेशा, लल्लाटी भंडार अशा अनेक मराठी व हिंदी चित्रपटातील गाण्यांवर नृत्याचे सादरीकरण केले. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन व विद्यार्थ्यांचे कौतुक करताना कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ यांनी सांगितले की, आपल्या भारत देशाच्या महिला व पुरुष क्रिकेट संघाचा युनिफॉर्म जल हाऊस प्रमाणेच आकाशी निळ्या रंगाचा आहे. सर्व विद्यार्थ्यांनी अतिशय सुंदर प्रकारे नृत्ये सादर केली आहेत. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. संकेत थळे यांनी केले तर आभार श्रीमती प्रतिभा कुमकर यांनी मानले.

### शैक्षणिक सहल

दि. १० डिसेंबर २०२४ रोजी विद्यार्थ्यांची शैक्षणिक सहल सगुणाबाग येथे नेण्यात आली. या सहलीमध्ये एकूण १९८ विद्यार्थी, शिक्षकवृंद व शिक्षकेतर कर्मचारी सहभागी झाले होते. विद्यार्थ्यांनी सहलीमध्ये विविध प्रकारची झाडे, वेगवेगळे बांबूचे प्रकार, मधुमक्षिका पालन कसे करतात, सुगंधित तेले कशी बनवितात, मासेपालन कसे करतात, याची माहिती घेतली. अजगर (पायथन) ईमू, शहामृग, सरडे, ससे, वेगवेगळ्या प्रकारचे पक्षी विद्यार्थ्यांनी जवळून बघितले व त्यांच्याबद्दल माहिती घेतली. बांबूपासून वेगवेगळ्या वस्तू बनवणे, मातीपासून मडके बनवणे, गांडूळ खत बनवणे, गोबर गॅस प्लँट या सर्व नैसर्गिक बाबी विद्यार्थ्यांनी निरीक्षणातून अभ्यासल्या व सहभोजनाचा आनंद घेऊन विद्यार्थी रात्री ८ वाजता शाळेत परतले.

## विद्याभवन माध्यमिक इंग्रजी

**संचालक : श्री. दिनेश मिसाळ**

**पर्यवेक्षक : श्रीमती श्रीजा नायर**

### केंद्रस्तरीय विज्ञान प्रदर्शनात सुयश

दि. ३ डिसेंबर २०२४ रोजी नवी मुंबई महानगरपालिका शिक्षण विभागातर्फे घेण्यात आलेल्या केंद्रस्तरीय विज्ञान प्रदर्शनात कु. लेखा पाटील (इ. ९ वी) या विद्यार्थिनीने (९वी व १०वी) गटातून संसाधन व्यवस्थापन या प्रयोगासाठी उत्तेजनार्थ क्रमांक पटकावला. सहशिक्षक श्री. मनोज मयेकर यांनी तिला मार्गदर्शन केले.

### अभिनंदनीय वार्ता

शिक्षक आघाडी कोकण विभागातर्फे दि. १ डिसेंबर २०२४ रोजी एम्. एच्. हायस्कूल, ठाणे येथे ॲड. मा. आ. निरंजन डावखरे, आ. ज्ञानेश्वर म्हात्रे यांच्या उपस्थितीत पुरस्कार वितरण सोहळा पार पडला. यामध्ये विद्याभवन संकुलातील माध्यमिक इंग्रजी विभागातील कलाशिक्षक श्री. रमेश शंकर राऊत यांना वसंत स्मृती आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. त्यांच्या कला विभागातील शैक्षणिक कार्याची नोंद घेऊन त्यांना सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

### वार्षिक क्रीडा महोत्सव

दि. ४ डिसेंबर ते ६ डिसेंबर २०२४ या कालावधीत माध्यमिक इंग्रजी विभागाने क्रीडा महोत्सवाचे आयोजन केले होते. श्री. अनिल घुगे, क्रीडा अधिकारी, मुंबई शहर, श्री. प्रसाद माने, प्राध्यापक (के.बी.पी. हायस्कूल, वाशी) या प्रमुख अतिथींच्या हस्ते क्रीडा ज्योत प्रज्वलीत करून महोत्सवाचे उद्घाटन करण्यात आले. याप्रसंगी क्रीडा अधिकारी अनिल घुगे यांनी खेळांचे महत्त्व विशद केले. श्री. प्रसाद माने यांनी आट्यापाट्या या खेळाविषयी माहिती दिली. दिवसेंदिवस या खेळामध्ये सहभागी होणाऱ्या स्पर्धक संघांचा वाढता आलेख नमूद केला. कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ यांनी खेळामध्ये सकारात्मकता असावी असे सांगून विद्यार्थ्यांनी दररोज एक तास तरी मैदानी खेळ खेळावेत, असे आवाहन केले. या उद्घाटन प्रसंगी ज्येष्ठ नागरिक संघाचे उपाध्यक्ष श्री. रणजित दीक्षित, श्री. सुनील आचरेकर, मुख्याध्यापिका श्रीमती श्रीजा नायर, समन्वयक पांडुरंग मुळीक, विद्यार्थी व शिक्षकवृंद उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन इ. ९वीच्या विद्यार्थीनी कु. गौरी आहेर व कु. आर्या नाक्ती यांनी केले तर आभार प्रदर्शन विद्यार्थी कु. स्वराज जगदाळे याने केले. कबड्डी, डॉजबॉल, व्हॉलीबॉल, थ्रोबॉल, लंगडी अशा सांघिक खेळांचा तर धावणे, दोरी उड्या, गोळा फेक अशा वैयक्तिक खेळांचा समावेश क्रीडा महोत्सवात करण्यात आला होता. अतिशय उत्साहपूर्ण वातावरणात क्रीडा महोत्सव पार पडला.

### आंतरशालेय वक्तृत्व स्पर्धा सुयश

स्वामी विवेकानंद जन्मदिनानिमित्त रामकृष्ण मठ आणि रामकृष्ण मिशन आयोजित आंतरशालेय वक्तृत्व स्पर्धा दि. ७ डिसेंबर २०२४ रोजी लोकमान्य टिळक कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, कोपरखैराणे येथे घेण्यात आली. या स्पर्धेत इ. ८वी ते इ. १० वी या गटात यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रे देऊन गौरविण्यात आले. विजेत्या विद्यार्थ्यांची नावे पुढीलप्रमाणे

| विद्यार्थ्यांचे नाव | भाषा | क्रमांक |
|---|---|---|
| कु. सुहानी कांबळे | मराठी | प्रथम |
| कु. गार्गी कांबळे | मराठी | द्वितीय |
| कु. आस्था तिवारी | हिंदी | तृतीय |

**सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे व शिक्षकांचे संस्थेच्या व शाळेच्या वतीने हार्दिक अभिनंदन आणि पुढील वाटचालीस शुभेच्छा !**

# विद्याभवन पूर्व प्राथमिक इंग्रजी शाळा

## नेरूळ शाखा, नवी मुंबई

**कुलसचिव : श्री. दिनेश मिसाळ**
**पर्यवेक्षिका : सौ. अस्मिता सलगर**

### वेशभूषा स्पर्धा

दि. २५ व २६ नोव्हेंबर २०२४ रोजी वेशभूषा स्पर्धा संपन्न झाली. सदर वेशभूषा स्पर्धेसाठी नर्सरी - फळे, छोटा शिशु - आपले मदतनीस, मोठा शिशु - पौराणिक पात्र हे विषय होते. सदर वेशभूषा स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून श्रीमती अमृता झोडपे, श्रीमती राखी लोणकर व श्रीमती प्रीती दाभाडे या उपस्थित होत्या. मान्यवरांच्या हस्ते सर्व बक्षिसपात्र विद्यार्थी व सहभागी विद्यार्थी यांना प्रमाणपत्र देण्यात आले. कार्यक्रमास मुख्याध्यापिका श्रीमती सुवर्णा मिसाळ व अनेक पालक सुद्धा उपस्थित होते. सर्व विद्यार्थ्यांनी छान अभिनय व सुंदर वेशभूषा केल्या.

### गीता पाठांतर स्पर्धा

दि. १ डिसेंबर २०२४ रोजी चिन्मय मिशन, खारघर, नवी मुंबई यांच्या वतीने आंतरशालेय गीता पाठांतर स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. नवी मुंबईतील १० शाळांमधील विद्यार्थी या स्पर्धेत सहभागी झाले होते. पूर्व-प्राथमिक इंग्रजी विभागातील एकूण ४ विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत सहभाग घेऊन यश प्राप्त केले. विजेत्या विद्यार्थ्यांची नावे पुढीलप्रमाणे

| विद्यार्थ्याचे नाव | इयत्ता | क्रमांक |
|---|---|---|
| कु. अनन्या मेंदाडकर | सि. के. जी. / ब | तृतीय |
| कु. महेश गिरी | सि. के. जी. / ब | तृतीय |
| कु. मनिषा गिरी | ज्यु.के. जी. / ब | उत्तेजनार्थ |
| कु. ओवी पवार | ज्यु. के. जी./अ | उत्तेजनार्थ |

**सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेच्या वतीने हार्दिक अभिनंदन आणि पुढील वाटचालीस शुभेच्छा !**

# विद्याभवन प्राथमिक मराठी शाळा

## नेरूळ शाखा, नवी मुंबई

**कुलसचिव : श्री. दिनेश मिसाळ**
**मुख्याध्यापिका : सौ. सुवर्णा दिनेश मिसाळ**

### शैक्षणिक सहल

दि. १३ डिसेंबर २०२४ रोजी इ. १ली ते ७वीच्या विद्यार्थ्यांसाठी सगुणाबाग, कर्जत येथे शैक्षणिक सहलीचे आयोजन करण्यात आले. सगुणाबाग एक निसर्गरम्य असे पर्यटनासाठी वसवलेले गाव. या गावात गेल्यावर विद्यार्थ्यांनी ग्रामीण जीवनातील विविध गोष्टींचा अनुभव घेतला. बैलगाडीची सफर, तलावातून बोटिंग, कुंभार काम, शेती काम इ. कामांविषयी माहिती घेतली. गांडूळ खत व त्याची निर्मिती, गोबर गॅस निर्मिती, ड्रॅगन फळांचे उत्पादन, सुगंधी अत्तर बनविणे, मधमाशांच्या पोळ्यातून मध काढणे, शोभिवंत वस्तू बनविणे इ. व्यवसायांबद्दल अधिक माहिती जाणून घेतली. मल्लखांबाचे विविध प्रकार व जादूचे प्रयोग पाहून विद्यार्थ्यांचा आनंद द्विगुणीत झाला. दुपारी जेवणानंतर विद्यार्थ्यांनी उल्हास नदीत पोहण्याचा मनसोक्त आनंद घेतला. त्यानंतर संध्याकाळी चहा, वडापाव, आईस्क्रिमचा आनंद घेतला. घरी परतताना बसमध्ये गाणी, नृत्य, अंताक्षरी अशी धमाल मस्ती करत संध्याकाळी ७:३० वा विद्यार्थी शाळेत परतले.

### आरोग्यविषयक व्याख्यान

दि. १४ डिसेंबर २०२४ रोजी विद्याभवन शालेय सभागृहात रोटरी क्लब, नवी मुंबई सी-साईड यांच्यावतीने पालकांसाठी मुलींच्या आरोग्याविषयी गर्भाशियाचा कॅन्सर व जागरुकता या विषयावर मार्गदर्शनपर व्याख्यान आयोजित करण्यात आले. रोटरी क्लब, नवी मुंबई सी-साईडचे अध्यक्ष श्री. सुनील शाह, उपाध्यक्ष श्री. रवी प्रकाश, मेडिकल प्रोजेक्टच्या प्रमुख श्रीमती संगिता घोष, डॉ. जितेंद्र खांडगे, एमजीएम

हॉस्पिटल बेलापूर येथील स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ. अश्विनी देशमुख तसेच प्रकाश राजन इ. मान्यवर, माता पालक व शिक्षक या कार्यक्रमासाठी उपस्थित होते. कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ यांच्या हस्ते सर्व मान्यवरांना पुस्तकरूपी भेट देऊन त्यांचे स्वागत व सत्कार करण्यात आला. त्यानंतर डॉक्टर श्रीमती अश्विनी देशमुख यांनी गर्भाशयाचा कॅन्सर या विषयावर माहिती सांगितली, चित्रफीत दाखवून गर्भाशयाचा कॅन्सर होण्याची कारणे व त्याची लक्षणे सांगितली. गर्भाशयाचा कॅन्सर होऊ नये म्हणून कोणती काळजी घ्यावी हे सांगताना सर्व्हावॅक लस या लसी विषयी माहिती दिली. साधारण ९ ते १४ वयोगटातील मुलींना ही लस द्यावी त्यामुळे गर्भाशयाचा कॅन्सर होण्याचा धोका टळेल. शाळेत ही लस मोफत दिली जाणार आहे. स्त्रियांनी स्वत:च्या आरोग्याची काळजी घेतली पाहिजे, असे सांगून लसीचे महत्त्व पटवून दिले. पालकांच्या अनेक शंकांचे निरसन केले. कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ यांनीही पालकांशी संवाद साधला. सर्व्हावॅक ही लस मोफत देणारी नवी मुंबई विभागात विद्याभवन ही एकमेव खाजगी शाळा आहे. रोटरी क्लबतर्फे शाळेतील विद्यार्थिनींसाठी ही लस मोफत दिली जाणार आहे. पालकांनी त्याचा लाभ घ्यावा असे सांगून त्यांनी रोटरी क्लबच्या या स्तुत्य व समाजोपयोगी उपक्रमाचे आभार मानले.

### गीता जयंती

दि. ११ डिसेंबर २०२४ रोजी गीता जयंती साजरी करण्यात आली. गीता जयंती निमित्त पुणे विद्यार्थी गृह माजी विद्यार्थी मंडळ, मुंबई विभागातर्फे घेण्यात आलेल्या आंतरशालेय गीता पाठांतर व गीता वक्तृत्व स्पर्धेतील विजयी स्पर्धकांचा बक्षिस वितरण समारंभ साजरा करण्यात आला. या कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी म्हणून मराठी विज्ञान पत्रिकेचे संपादक डॉ. किशोर कुलकर्णी उपस्थित होते. कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ, मुख्याध्यापिका श्रीमती सुवर्णा मिसाळ, श्रीमती मनीषा मुळीक, विद्यार्थी, पालक व शिक्षक या कार्यक्रमासाठी उपस्थित होते. श्रीमती कविता विनय तेंडुलकर यांनी अतिथींचा परिचय व कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ यांच्या शुभहस्ते प्रमुख अतिथींचे शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ व पुस्तकरूपी भेट देऊन स्वागत करण्यात आले. डॉ. किशोर कुलकर्णी यांनी मुलांना समजेल अशा सोप्या भाषेत गीतेचे महत्त्व कथन केले. विद्यार्थी दशेत विद्यार्थ्यांचे कर्म सांगितले. 'गीता समजून घ्या, चिंतन करा, आरोग्याची काळजी घ्या, अडचणींचा सामना करा, शारीरिक व्यायाम करा, प्राणायाम आणि ध्यानधारणा करा. त्याने मनाला शांतता लाभेल. विद्यार्थ्याने शेवटपर्यंत विद्यार्थी राहिले पाहिजे' असे सांगून विजेत्या स्पर्धकांचे अभिनंदन केले. कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ यांनीही विद्यार्थ्यांना भगवद्गीता ही महर्षी वेद व्यास मुनींनी लिहिली आणि ती श्रीकृष्णाने अर्जुनाला कुरुक्षेत्रावर सांगितली. गीता महर्षी डॉ. अण्णासाहेब खैर यांनी गीता का लिहिली हे सांगितले. गीतेमध्ये १८ अध्याय असून ७०० श्लोक आहेत. कठीण परिस्थितीला सामोरे कसे जावे हे समजण्यासाठी गीता वक्तृत्व स्पर्धा घेण्यात येतात. प्रत्येकाच्या घरात आणि हातात गीता असावी असे सांगून गीता जयंतीच्या शुभेच्छा दिल्या. त्यानंतर प्रमुख अतिथींच्या हस्ते गीता पाठांतर, गीता वक्तृत्व व सदाचार चिंतनी वक्तृत्व स्पर्धेतील विजेत्या स्पर्धकांना पारितोषिके देऊन गौरविण्यात आले.

**सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शक शिक्षकांचे संस्थेच्या वतीने हार्दिक अभिनंदन आणि पुढील वाटचालीस शुभेच्छा !**

***

# विद्याप्रशाला हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय

## तळेगाव अंजनेरी शाखा, नाशिक

**संचालक : श्री. अमोल म. जोशी**

**मुख्याध्यापक : श्री. शरद कोठावदे**

### नाताळ

दि. २६ डिसेंबर २०२४ रोजी नाताळ सणानिमित्त आयोजित कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक श्री. शरद कोठावदे होते. कु. जानवी बोडके, कु. जयश्री लोथे व कु. ज्ञानेश्वरी पगार या विद्यार्थिनींनी आपल्या भाषणातून नाताळ सणाबाबत माहिती सांगितली. श्री. सुखदेव निंबेकर यांनी नाताळ सणाची पार्श्वभूमी व येशू ख्रिस्तांच्या जीवनाविषयी माहिती विद्यार्थ्यांना दिली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सौ. स्वाती भावसार यांनी केले. सूत्रसंचालन सौ. सुषमा अमृतकर केले. उपस्थितांचे आभार श्रीमती रक्षा शिवदे यांनी मानले.

### क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती

दि. ३ जानेवारी २०२४ रोजी विद्यालयात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंती निमित्त पर्यवेक्षक श्री. संजय जोशी व सावित्रीबाई फुले यांची वेशभूषा केलेल्या दुर्वा निंबेकर या विद्यार्थिनीच्या हस्ते प्रतिमा पूजन करण्यात आले. यावेळी विद्यार्थिनींनी समयोचित भाषणे केली. कु. खुशी शिंदे या विद्यार्थिनीने कविता सादर केली. श्री. सुकदेव निंबेकर यांनी सावित्रीबाई फुले यांच्या जीवनाविषयी विद्यार्थ्यांना सखोल माहिती दिली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन सौ. सुषमा अमृतकर यांनी केले. आभार श्रीमती प्रतिभा ठाकूर यांनी मानले.

### स्वामी विवेकानंद व राजमाता जिजाऊ जयंती

दि. १२ जानेवारी २०२४ रोजी विद्यालयात स्वामी विवेकानंद आणि राजमाता जिजाऊ यांची जंती उत्साहात साजरी करण्यात आली. मुख्याध्यापक श्री. शरद कोठावदे व राजमाता जिजाऊ यांची वेशभूषा केलेल्या कु. देवयानी पगार या विद्यार्थिनीच्या हस्ते प्रतिमा पूजन करण्यात आले. यावेळी कु. साक्षी पगार या विद्यार्थिनीने जिजाऊंच्या जीवनाविषयी गारद सादर केली. यावेळी विद्यार्थिनींनी समयोचित भाषणे केली. जिजाऊंच्या व स्वामी विवेकानंद यांच्या जीवन कार्याविषयी श्रीमती सोनाली तुंगार यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. मुख्याधापक श्री. शरद कोठावदे यांनी आपल्या अध्यक्षीय मनोगतात जिजाऊंचे व स्वामी विवेकानंद यांचे गुण अंगीकारण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री. प्रकाश गवळी यांनी तर सूत्रसंचालन सौ. सुषमा अमृतकर यांनी केले. आभार श्री. मंथन वाळुंज यांनी मानले.

### मकर संक्रांत

दि. १५ जानेवारी २०२५ रोजी मकर संक्रांत मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. अनेक विद्यार्थ्यांनी तसेच श्रीमती संगिता कुंवर यांनी संक्रांत या सणाची माहिती सांगितली. पर्यवेक्षक श्री. संजय जोशी यांनी भौगोलिक माहिती देत सणाचे महत्त्व सांगितले. प्रास्ताविक सौ. स्वाती भावसार यांनी केले. सौ. सुषमा अमृतकर यांनी सूत्रसंचालन केले. श्री. सुकदेव निंबेकर यांनी आभार मानले

### अभिनंदनीय

* दि. २९ डिसेंबर २०२४ रोजी लातूर जिल्ह्यातील उदगीर या ठिकाणी झालेल्या राज्यस्तरीय लंगडी स्पर्धेत १९ वर्षाखालील आपल्या विद्यालयाच्या मुलींच्या संघाने लातूर संघाचा एक डाव दोन गुणांनी दणदणीत पराभव करून तृतीय क्रमांक प्राप्त केला.

* दि. १२ जानेवारी २०२५ रोजी आंध्र प्रदेशातील विजयवाडा येथे झालेल्या लंगडी फेडरेशन ऑफ इंडिया तर्फे आयोजित चौदाव्या ज्युनिअर राष्ट्रीय लंगडी स्पर्धेत महाराष्ट्र संघाने तिसरा क्रमांक प्राप्त केला. या संघात आपल्या विद्यालयाचे इ. १०वीचे विद्यार्थी कु. ओमकार महाले व कु. पवन खताळे यांनी प्रतिनिधित्व केले.

या दोनही स्पर्धांमधील यशस्वी खेळाडू, त्यांचे मार्गदर्शक ज्येष्ठ क्रीडा शिक्षक व पर्यवेक्षक श्री. संजय जोशी व क्रीडा शिक्षक श्री. संजय गीते यांचे संचालक श्री. अमोल जोशी, प्राचार्य श्री. शरद कोठावदे यांचेतर्फे हार्दिक अभिनंदन आणि पुढील वाटचालीस शुभेच्छा !

***

# कै. माधवराव बळवंत उर्फ काकासाहेब देशमुख विद्यालय, पंचवटी, नाशिक

**संचालक : श्री. अमोल म. जोशी**
**मुख्याध्यापक : श्री. ज्ञानेश्वर निंबेकर**

### मार्गदर्शनपर व्याख्यान

दि. १२ डिसेंबर २०२४ रोजी विद्यालयात एन.टी.टी. पॉलिटेक्निक कॉलेज ऑफ नाशिकच्या वतीने इ. १०वीच्या विद्यार्थ्यांसाठी व्यवसाय मार्गदर्शन या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. प्रमुख अतिथी प्राध्यापक श्री. ऋषिकेश जाधव आणि प्राध्यापक श्री. अभिषेक भायनंग यांचे मुख्याध्यापक श्री. ज्ञानेश्वर निंबेकर यांनी स्वागत आणि सत्कार केला. प्रमुख अतिथी श्री. ऋषिकेश जाधव यांनी इ. १०वी नंतर कोणता अभ्यासक्रम निवडावा? विविध शाखा आणि भविष्यातील संधी या विषयावर अभ्यासपूर्ण माहिती सांगितली. विद्यार्थ्यांच्या विविध शंकांचे निरसन केले. श्रीमती सुनंदा ठाकरे यांनी उपस्थितांचे आभार मानले. या कार्यक्रमास इ. १०वीचे सर्व विद्यार्थी उपस्थित होते.

### राष्ट्रीय गणित दिन

दि. २३ डिसेंबर २०२४ रोजी विद्यालयात राष्ट्रीय गणित दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्ष मुख्याध्यापक श्री. ज्ञानेश्वर निंबेकर आणि सर्व शिक्षक वृंदांनी थोर गणिततज्ज्ञ श्रीनिवास रामानुजम यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन केले. शिक्षक श्री. गौरव झुरडे यांनी थोर गणिततज्ज्ञ श्रीनिवास रामानुजम यांचे बालपण, शिक्षण आणि गणित विषयातील संशोधनाविषयी माहिती सांगितली. विद्यार्थी चि. राहुल चौधरी इ. ९ वी या विद्यार्थ्याने श्रीनिवास रामानुजम यांचा गणिताचा ध्यास याविषयी माहिती सांगितली. चि. महेश राऊत इ. ६वी या विद्यार्थ्याने गणितातील विविध ट्रिक्स सांगितल्या. कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री. ज्ञानेश्वर निंबेकर यांनी जीवनातील गणिताचे महत्त्व सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती अर्चना केकाण यांनी केले. सौ. अस्मिता बावधनकर यांनी आभार मानले.

### विज्ञान मेळावा

दि. २७ डिसेंबर २०२४ रोजी विद्यालयात विज्ञान मेळावा उत्साहात संपन्न झाला. विज्ञान मेळाव्याचे प्रमुख अतिथी मा. श्री. देसले, सदस्य विज्ञान अध्यापक संघ यांनी फित कापून विज्ञान मेळाव्याचे उद्घाटन केले. प्रमुख अतिथी श्री. देसले आणि मुख्याध्यापक श्री. ज्ञानेश्वर निंबेकर यांच्या हस्ते सरस्वतीच्या प्रतिमेचे पूजन केले. मुख्याध्यापक श्री. ज्ञानेश्वर निंबेकर यांनी प्रमुख अतिथींचे स्वागत आणि सत्कार केला. या विज्ञान प्रदर्शनात हायड्रोलिक प्रेशर, सौर ऊर्जा, पवन ऊर्जा, इंधन बचत, ऊर्जा बचत इत्यादी विषयांवर टाकाऊ वस्तूंचा वापर करून विविध साधने आणि प्रकल्प तयार केले. या विज्ञान मेळाव्याचे निरीक्षण करून प्रमुख अतिथी श्री. देसले यांनी प्रकल्प तयार करणाऱ्या विद्यार्थ्यांचे आणि मार्गदर्शक शिक्षकांचे अभिनंदन केले. या प्रकल्पाचे आयोजन, नियोजन, कार्यवाही विज्ञान शिक्षक सौ. अस्मिता बावधनकर श्री. गौरव झुरडे आणि श्रीमती अर्चना केकान यांनी केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती अर्चना केकान यांनी केले. सौ. अस्मिता बावधनकर यांनी आभार मानले.

### क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती

दि. ३ जानेवारी २०२५ रोजी विद्यालयात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती साजरी करण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्ष मुख्याध्यापक श्री. ज्ञानेश्वर निंबेकर आणि सर्व शिक्षक वृंदांनी सावित्रीबाई फुले यांचे प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. विद्यालयातील शिक्षिका श्रीमती केकान अर्चना यांनी सावित्रीबाई फुले यांचे बालपण, शिक्षण, शैक्षणिक व साहित्यिक कार्याविषयी माहिती सांगितली. कार्यक्रमाचे अध्यक्ष मुख्याध्यापक श्री. ज्ञानेश्वर निंबेकर यांनी ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांचे जीवनातील प्रेरणादायी प्रसंग कथन केले. आणि स्त्री शिक्षणाचे

कार्याविषयी माहिती सांगितली या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. तेजश्री जोशी यांनी केले. श्री. तुकाराम मंडले यांनी आभार मानले.

### मार्गदर्शनपर व्याख्यान

दि. ३ जानेवारी २०२५ विद्यालयात इ. ९वी-१०वीच्या विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शनपर व्याख्यान घेण्यात आले. व्याख्याते श्री. विजयकुमार कर्नाटकी यांनी आपल्या व्याख्यानातून गणित विषयातील विविध क्लृप्त्या सांगितल्या. रंजक आणि मजेदार पद्धतीने गणित विषयाचा अभ्यास कसा करावा याविषयी माहिती दिली. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक श्री. ज्ञानेश्वर निंबेकर यांनी केले. सौ अस्मिता बावधनकर यांनी आभार मानले.

### शैक्षणिक साहित्य वाटप

दि. ४ जानेवारी २०२५ रोजी विद्यालयात सद् धम्म हॉलिडे, भोसले टूर्स कंपनी कडून विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करण्यात आले. ग्रामीण तसेच आदिवासी पाडा भागातील जीवनशैली, विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीबद्दल मुख्याध्यापक श्री. ज्ञानेश्वर निंबेकर यांनी आपल्या प्रास्ताविकात मनोगत व्यक्त केले. सद् धम्म हॉलिडे, भोसले टूर्स कंपनी चे संस्थापक शामराव भोसले यांनी विद्यार्थ्यांनी खूप शिकले पाहिजे, ज्ञान घेतले पाहिजे, गुरूजनांचा आदर ठेवला पाहिजे. तर मोठे झाल्यावर प्रगतीची शिखरे गाठता येतील. सद् धम्म हॉलिडे, भोसले टूर्स कंपनी माध्यमातून तुम्हाला सहकार्य केले जाईल असे संचालक श्री. अभिजित भोसले यांनी सांगितले. यावेळी सद् धम्म हॉलिडे, भोसले टूर्स कंपनी मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांना वह्या, पेन शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती सविता चव्हाण यांनी केले. श्रीमती तेजश्री जोशी यांनी आभार मानले. या प्रसंगी विद्यालयाचे शिक्षक - शिक्षकेतर वृंद, श्री. भालचंद्र कुलकर्णी, तसेच सम्राट सोनवणे, अशोक गवळे, जयंत निकम, शंकर सोळंके, आनंद पवार, तेजस साळवे, गणेश पाईकराव, अविनाश साळवे, कार्तिक निकम, अमोल मानकर, सिद्धांत मोरे, शिवम पवार उपस्थित होते.

### स्वामी विवेकानंद जयंती

दि. १२ जानेवारी २०२५ रोजी विद्यालयात स्वामी विवेकानंद जयंती साजरी करण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्ष मुख्याध्यापक श्री. ज्ञानेश्वर निंबेकर आणि सर्व शिक्षक वृंदांनी स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन केले. शिक्षक श्री. तुकाराम मंडले यांनी स्वामी विवेकानंद यांचे बालपण, शिक्षण, सामाजिक व अध्यात्मिक कार्याविषयी माहिती सांगितली. कार्यक्रमाचे अध्यक्ष मुख्याध्यापक श्री. ज्ञानेश्वर निंबेकर यांनी स्वामी विवेकानंद यांचे जीवनातील विविध प्रेरणादायी प्रसंग कथन केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती अर्चना केकान यांनी केले. शिक्षक श्री. गौरव झुरडे यांनी आभार मानले.

### तिळगूळ समारंभ

विद्यालयात तिळगूळ समारंभ उत्साहात संपन्न झाला. कार्यक्रमाच्या प्रमुख अतिथी योगशिक्षक, रनर, सायकलिस्ट सौ. नलिनी मधुकर कड यांचे स्वागत व सत्कार संचालक श्री. अमोल जोशी यांच्या हस्ते करण्यात आला. मुख्याध्यापक श्री. ज्ञानेश्वर निंबेकर यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. शिक्षिका श्रीमती सुनंदा ठाकरे यांनी संक्रांत या सणाचे धार्मिक, अध्यात्मिक, भौगोलिक महत्त्व सांगितले. आपल्या मनोगतातून सौ. नलिनी मधुकर कड यांनी सर्व विद्यार्थ्यांना सद्गुणांचे महत्त्व सांगितले, ओंकार साधना, मेडिटेशन घेतले. जीवनातील योग साधनेचे महत्त्व सांगितले. नाशिक ते आयोध्या चौदाशे साठ किलोमीटर सायकल साहसवारीचा प्रवास अत्यंत रंजक पद्धतीने सांगितला. विद्यार्थ्यांनी जीवन जगत असताना आपण खरेपणाने वागावे, कोणतेही ध्येय साध्य करायचे असल्यास प्रयत्नांमध्ये सातत्य असावे. कधीही कुणाला हरवण्यासाठी पुढे जाऊ नका, असे सांगितले.

दि. ११ ते २२ डिसेंबर २०२४ दरम्यान झालेली नाशिक ते अयोध्या ही सायकल साहस मोहिम

यशस्वीपणे पूर्ण केल्याबद्दल विद्यालयाच्या वतीने सौ. नलिनी मधुकर कड यांचा सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती अर्चना केकाण यांनी केले.

**समूहगीत गायन कार्यक्रम**

दि. २४ जानेवारी २०२५रोजी नाशिक शहरातील 'झेप सांस्कृतिक कला व क्रीडा मंडळ' आयोजित भारतीय प्रजासत्ताक दिनाचा अमृत महोत्सव 'जागवू या मुलांचा देशाभिमान' हा कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून शालेय शिक्षण मंत्री मा. श्री. दादासाहेब भुसे उपस्थित होते. या कार्यक्रमात विद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. या कार्यक्रमात एकूण ३१००० विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन गीतगायन केले. ए.पी.पी. विद्यालय पंचवटी नाशिक येथे समूहगीतगायन कार्यक्रम संपन्न झाला .

**प्रजासत्ताक दिन उत्साहात संपन्न**

दि. २६ जानेवारी २०२५ रोजी ७६ वा प्रजासत्ताक दिन उत्साहात संपन्न झाला. कार्यक्रमाचे अध्यक्ष संचालक श्री. अमोल जोशी यांचे शुभहस्ते ध्वजारोहण करण्यात आले. या प्रसंगी अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालय आणि जी. के. पाटे वाणी व्यवस्थापन महाविद्यालयाचे विभाग प्रमुख डॉ. पी. जी. शेटे आणि त्यांचे सहकारी प्राध्यापक उपस्थित होते. मुख्याध्यापक श्री. ज्ञानेश्वर निंबेकर यांनी कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री. अमोल जोशी यांचे स्वागत आणि सत्कार केला. शिक्षक श्री. गौरव झुरडे यांनी भारतीय संविधानाचे अभिवाचन केले. आणि इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांना 'कॉपीमुक्त अभियान गैरमार्गाशी लढा' प्रतिज्ञा दिली. इ. ९वी-१०वी च्या विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर नृत्याचे सादरीकरण केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष संचालक श्री. अमोल जोशी यांनी 'अनमोल रतन' या हस्तलिखित अंकाचे प्रकाशन केले. हस्तलिखित लेखन करणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांचे कौतुक केले. सर्वांना प्रजासत्ताक दिनाच्या शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमास मुख्याध्यापक, सर्व शिक्षक, संस्था कर्मचारी, सर्व विद्यार्थी आणि माजी विद्यार्थी उपस्थित होते. सौ. तेजश्री जोशी यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. श्री तुकाराम मंडले यांनी आभार मानले. सर्व विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप करण्यात आले .

प्रजासत्ताक दिनानिमित्त विद्यालय परिसर - नाग चौक - शनी चौक - विद्यालय या मार्गे प्रभात फेरी काढण्यात आली. या प्रभात फेरीत बेटी बचाओ, पर्यावरण, व्यसनमुक्ती, पाणीबचत या विषयांवर घोषणा देऊन जनजागृती करण्यात आली. या प्रभात फेरीत मुख्याध्यापक श्री. ज्ञानेश्वर निंबेकर, सर्व शिक्षक वृंद, संस्था कर्मचारी आणि सर्व विद्यार्थी उपस्थित होते. विद्यालयात सांस्कृतिक कार्यक्रम संपन्न झाले विद्यार्थ्यांनी थोर स्वातंत्र्य सेनानी यांच्या जीवनावर अभ्यासपूर्ण भाषणं केली. देशभक्तीपर गीत गायन आणि नृत्य सादर केले. प्रजासत्ताकदिनानिमित्त चित्रकला व निबंध स्पर्धा घेण्यात आल्या. विविध स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग घेतला.

**अभिनंदनीय**

❋ नवनीत तर्फे आयोजित युवा मास्टर स्ट्रोक या चित्रकला स्पर्धेत विद्यार्थ्यांनी दिलेल्या विषयांवर सुंदर चित्रे काढून रंगभरण केले. या स्पर्धेत पारितोषिक प्राप्त विद्यार्थी पुढील प्रमाणे

| **गट** | **विद्यार्थ्याचे नाव** | **इयत्ता** |
|---|---|---|
| छोटा | कु. नयन वसंत महाले | सहावी |
| | कु. देवेंद्र सोमनाथ भोये | सहावी |
| | कु. रोहन रघुनाथ भोये | सहावी |
| | कु. हर्षद अशोक चौधरी | सहावी |
| मोठा | कु. राहुल होनाजी खंबाईत | सातवी |
| | कु. मानव रमेश मनसुख | दहावी |
| | कु. गौरव सोमनाथ चौधरी | आठवी |
| | कु. पवन संदीप जाधव | दहावी |
| | कु. कुणाल अनिल लहांगे | दहावी |
| | कु. हर्षद गुलाब पवार | दहावी |

❋ दि. २६ जानेवारी २०२५ रोजी श्री यशवंतराव महाराज देव मामलेदार यांचे पुण्यतिथीनिमित्त देव

मामलेदार मंदिर गोदा घाट येथे चित्रकला, सुंदर हस्ताक्षर आणि निबंध स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. या स्पर्धांमध्ये विद्यालयातील विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग घेतला. पुढील विद्यार्थ्यांनी सुयश प्राप्त केले .

**चित्रकला स्पर्धा**

| विद्यार्थ्याचे नाव | इयत्ता | |
|---|---|---|
| कु. रुपेश शांताराम जाधव | आठवी | |

**हस्ताक्षर स्पर्धा**

| | | |
|---|---|---|
| कु. समीर तुळशीदास राऊत | नववी | प्रथम |
| कु. मिलिंद कांतीलाल भोळे | दहावी | तृतीय |
| कु. कुणाल गिरीधर तलवारे | सातवी | उत्तेजनार्थ |
| कु. ओमकार सुधाकर गवळी | दहावी | --''-- |
| कु. मानव सुरेश तुंगार | सातवी | --''-- |

**निबंध स्पर्धा**

| | | |
|---|---|---|
| कु. साहिल संतोष पाटील | नववी | उत्तेजनार्थ |
| कु. ईशान उत्तम गवळी | दहावी | --''-- |
| कु. मानस विष्णू मानभाव | आठवी | --''-- |
| कु. दर्शन किरण जमधडे | दहावी | --''-- |

**सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेच्या वतीने हार्दिक अभिनंदन आणि पुढील वाटचालीस शुभेच्छा!**

**वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ**

दि. २८ जानेवारी २०२५ रोजी वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ उत्साहात संपन्न झाला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष संचालक श्री. अमोल जोशी, मुख्याध्यापक श्री. ज्ञानेश्वर निंबेकर, जेष्ठ शिक्षिका श्रीमती सुनंदा ठाकरे, शिक्षक प्रतिनिधी सौ. तेजश्री जोशी यांचे शुभहस्ते दीपप्रज्वलन आणि सरस्वतीपूजन करण्यात आले. मुख्याध्यापक श्री. ज्ञानेश्वर निंबेकर यांचे हस्ते संचालक श्री. अमोल जोशी यांचे स्वागत आणि सत्कार करण्यात आला. विद्यार्थी चि. शुभम खांडवी इ. १० वी याने वार्षिक अहवाल वाचन केले.

संचालक श्री. अमोल जोशी यांचे हस्ते बक्षीसपात्र विद्यार्थ्यांना पारितोषिक व सन्मानचिन्ह देवून गौरविण्यात आले. त्यांनी विद्यार्थ्यांना जीवनातील परोपकाराचे महत्त्व विविध प्रेरणादायी प्रसंगातून सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. तेजश्री जोशी यांनी केले. तुकाराम मंडले यांनी आभार मानले.✲✲✲

**✲ कै. माधवराव बळवंत उर्फ काकासाहेब देशमुख विद्यालय, पंचवटी, नाशिक ✲**



तिळगूळ समारंभ प्रसंगी प्रमुख अतिथी सौ. नलिनी मधुकर कड यांचा सत्कार करताना संचालक श्री. अमोल जोशी, समवेत मुख्याध्यापक श्री. ज्ञानेश्वर निंबेकर आणि ज्येष्ठ शिक्षिका श्रीमती सुनंदा ठाकरे



दि. २६ जानेवारी २०२५ रोजी प्रजासत्ताक दिनानिमित्त ध्वजारोहण करताना संचालक श्री. अमोल जोशी, समवेत मुख्याध्यापक श्री. ज्ञानेश्वर निंबेकर

# डॉ. काकासाहेब देवधर इंग्लिश स्कूल,म्हसरूळ–नाशिक

**कार्यवाह : श्री. संजय गुंजाळ**
**मुख्याध्यापिका : सौ. मनीषा साठे**

## पूर्व प्राथमिक विभाग

### नारंगी दिवस साजरा

नारंगी रंग दिवस साजरा करण्यात आला. सर्व लहान विद्यार्थ्यांनी नारंगी रंगाच्या छटा असलेले पोशाख परिधान केले होते. उत्साह, आशा आणि समृद्धीचे प्रतिक असलेल्या नारंगी रंगाबद्दल विद्यार्थ्यांना विविध गोष्टी शिकण्यास मिळाल्या. विद्यार्थ्यांनी नारंगी रंग असलेल्या वस्तू, रिबीन, मऊ खेळणी तसेच गाजर, झेंडू, विविध प्रकारचे खेळणी इ. वस्तू आणल्या होत्या. या रंगाशी संबंधित मनोरंजनात्मक तसेच विविध असे उपक्रम विद्यार्थ्यांनी केले.

### वार्षिक क्रीडा महोत्सव संपन्न

दि. २ ते ६ डिसेंबर २०२४ दरम्यान वार्षिक क्रीडा महोत्सव साजरा झाला. यामध्ये काही शर्यती घेण्यात आल्या. नर्सरीसाठी धावण्याची शर्यत, उडी मारणे शर्यत, वस्तू गोळा करणे, लहान गटात धावण्याची शर्यंत, लिंबू चमचा शर्यत, पुस्तक संतुलन शर्यत, मोठ्या गटात धावण्याची शर्यत, बेडूक उडी, अडथळा शर्यत इ. शर्यती आयोजित करण्यात आल्या होत्या. सर्व विद्यार्थ्यांनी वार्षिक क्रीडा स्पर्धेत उत्साहाने सहभाग घेतला. मुख्याध्यापिका सौ. मनीषा साठे यांनी विद्यार्थ्यांना प्रोत्साहन आणि मार्गदर्शन दिले.

### वार्षिक स्नेहसंमेलन समारंभ संपन्न

दि. २३ डिसेंबर २०२४ रोजी कर्मवीर दादासाहेब गायकवाड सभागृह येथे पूर्व प्राथमिक विभागाचा वार्षिक सोहळा पार पडला. या कार्यक्रमाने पालक, शिक्षक, पाहुणे आणि सर्व उपस्थित सदस्यांना भुरळ घातली. या कार्यक्रमात चिमुकल्या विद्यार्थ्यांची प्रतिभा आणि सर्जनशील कौशल्ये दिसून आली. कार्यक्रमाची सुरूवात प्रमुख पाहुण्यांच्या स्वागताने झाली. याप्रसंगी लेखिका सौ. सुरेखा अशोक बोऱ्हाडे, कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे, उपकार्याध्यक्ष श्री. एस. एम. जिर्गे, कार्यवाह श्री. संजय गुंजाळ, कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ, संचालक श्री. अमोल जोशी, पालक, विद्यार्थी आणि कर्मचारी उपस्थित होते.

मुख्याध्यापिका सौ. मनीषा साठे यांनी मुलांच्या विकासात सतत पाठिंबा आणि सहभागासाठी पालकांचे आभार मानले. तसेच वार्षिक अहवालही सादर केला. चिमुकल्यांनी आकर्षक वेशभूषा परिधान करून विविध गाणी, नृत्ये आणि नाटक सदर करून प्रेक्षकांना भुरळ घातली. या वर्षीचा स्नेह संमेलनाचा विषय 'द जंगल बुक' हा होता. नृत्य सादरीकरणाव्यतिरिक्त मोठ्या गटाच्या विद्यार्थ्यांनी जंगल आणि जंगलातील जीव वाचवण्याचा संदेश देणारे विशेष नाटक सदर केले. तरुण विद्यार्थ्यांनी त्यांच्या समर्पणाचे आणि उत्साहाचे कौतुक करून आभार मानून कार्यक्रमाची सांगता झाली.***

## * नम्र विनंती *

**देणगीदार व हितचिंतक यांनी संस्थेच्या बँक खात्यावर ऑनलाईन देणगी रक्कम पाठविल्यानंतर कृपया संस्थेच्या ई-मेल आयडीवर किंवा संस्थेच्या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधून, देणगी देणाऱ्याचे पूर्ण नाव, पत्ता व देणगी देण्याचे निमित्त आणि विनियोग इ. माहिती कळवावी. तसेच पॅन कार्डची प्रत पाठवावी. बँकेत देणगी रक्कम जमा झाल्यावर फक्त रक्कम समजते. बाकी सविस्तर माहिती कळत नाही.**

**ई-मेल : pvgheadoffice@gmail.com**
**दूरध्वनी क्रमांक : ०२०-२४४७०९२७ / २४४७०५७३**
**मोबाईल क्रमांक : ९६९९८७६२०३**

**राजेंद्र बोऱ्हाडे**
**कार्याध्यक्ष**

# डॉ. काकासाहेब देवधर इंग्लिश स्कूल, म्हसरूळ–नाशिक

**कार्यवाह : श्री. संजय गुंजाळ**
**मुख्याध्यापिका : सौ. प्रतिमा वैद्य**

## प्राथमिक विभाग

### जागतिक अपंगदिन

दि. ३ डिसेंबर २०२४ रोजी जागतिक अपंगदिन साजरा करण्यात आला. शिक्षक श्री. देवेंद्र कुलकर्णी यांनी जागतिक दिनाची माहिती विद्यार्थ्यांना दिली.

### महापरिनिर्वाण दिन

दि. ६ डिसेंबर २०२४ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुण्यतिथी म्हणजेच महापरिनिर्वाण दिन साजरा करण्यात आला. मुख्याध्यापिका सौ. प्रतिमा वैद्य यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमेचे पुष्पहार घालून पूजन केले. शिक्षिका सौ. सविता ननावरे यांनी त्यांच्या महान कार्याची माहिती सांगितली.

### सशस्त्र सेना ध्वजदिन

दि. ७ डिसेंबर २०२४ रोजी सशस्त्र सेना ध्वजदिन साजरा करण्यात आला. शिक्षिका सौ. रुपाली खरोटे यांनी ध्वजदिनाची माहिती सांगितली.

### मानवी हक्कदिन

मानवाला स्वतंत्र जीवन जगण्याचा तसेच विचार मांडण्याचा अधिकार आहे, त्याकारणास्तव १० डिसेंबर २०२४ मानवी हक्कदिन म्हणून साजरा करण्यात येतो. शिक्षिका कु. दर्शना सोनवणे यांनी मानवी हक्कदिनाची माहिती सांगितली.

### अभिनंदनीय

* महात्मा गांधी राजभाषा हिंदी प्रचार संस्था यांच्यामार्फत घेण्यात आलेल्या अखिल भारतीय राजभाषा हिंदी परीक्षेत विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन केले. विद्यार्थिनी कु. रिद्धी आहेर, इ. ६ वी हिला राष्ट्रीय राष्ट्रभाषा हिंदी प्रतिभा पुरस्कार मिळाला. इ. ५वी ते इ. ७वी चे एकूण ३३ विद्यार्थी परीक्षेस प्रविष्ट होते. त्यापैकी २३ विद्यार्थी प्रथम आणि ९ विद्यार्थी द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण झाले.

* इ. ६वीच्या विद्यार्थ्यांची डॉ. होमी भाभा बालवैज्ञानिक ही परीक्षा नोव्हेंबर महिन्यात घेण्यात आली. या परीक्षेस बसलेल्या १८ विद्यार्थ्यांपैकी १७ विद्यार्थी परिक्षेत उत्तीर्ण झाले. कु. सक्षम विष्णू महाले हा विद्यार्थी प्रात्यक्षिक परीक्षेसाठी पात्र ठरला.

* रत्नसागर पब्लिकेशन Endangerd Treasures या शीर्षकांतर्गत वन्यजीव संरक्षण व जैवविविधता जपण्याबाबत विद्यार्थ्यांमध्ये जागृती करण्यासाठी स्वरचित कविता स्पर्धा आयोजित केली होती. या स्पर्धेमध्ये विद्यार्थ्यांनी चांगल्या संख्येने सहभाग नोंदवला. काही विद्यार्थ्यांच्या कविता रत्नसागर प्रकाशनाच्या रौप्य महोत्सवी आवृत्तीमध्ये प्रकाशित केल्या. शाळेचा भारतात ५ वा क्रमांक आला.

| विद्यार्थ्यांची नावे | इयत्ता | कवितेचे विषय |
|---|---|---|
| कु. गार्गी कोडे | ६ वी | डायनासोर |
| कु. अनुज साळवे | ६ वी | झेब्रा |
| कु. स्पंदना म्हसदे | ६ वी | ब्ल्यू व्हेल |
| कु. सर्वज्ञ शिराळ | ७ वी | काकापो |
| कु. सिद्धी मैंद | ७ वी | डोडो |
| कु. श्रेया वैश्य | ७ वी | पोपट |

### स्नेहसंमेलन व वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ

दि. २३ डिसेंबर २०२४ रोजी वार्षिक स्नेहसंमेलन आणि पारितोषिक वितरण संपन्न झाले. कार्यक्रमाची सुरूवात सरस्वती वंदनेने झाली. प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते दीप प्रज्वलन झाले. विद्यार्थ्यांच्या स्वागत गीताने सांस्कृतिक कार्यक्रमास सुरूवात झाली.

कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून माजी विद्यार्थी श्री. विनायक रानडे उपस्थित होते. त्यांनी कुसुमाग्रज प्रतिष्ठान च्या वतीने 'ग्रंथ तुमच्या दारी' ही संकल्पना सुरू केली आहे. प्रमुख पाहुण्यांनी अतिशय सुंदर संदेश दिला तो असा की, 'विद्यार्थ्यांनी सरस्वती पूजन करावे. म्हणजेच ज्ञानार्जन करावे. त्याने लक्ष्मी आपोआप प्राप्त

होते'. कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे यांनी शाल व श्रीफळ देऊन श्री. विनायक रानडे यांचे स्वागत केले. श्री. विनायक रानडे यांच्या हस्ते स्पर्धा परिक्षेतील व क्रीडा स्पर्धेतील विद्यार्थ्यांना पारितोषिके देऊन गौरविण्यात आले. याप्रसंगी उपकार्याध्यक्ष श्री. एस. एम. जिर्गे, कार्यवाह श्री. संजय गुंजाळ, कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ, संचालक श्री. अमोल जोशी, पी टी ए चे सभासद श्री. गणेश नवले, मुख्याध्यापिका सौ. प्रतिमा वैद्य, माध्यमिक व उच्च माध्यमिक विभागाच्या मुख्याध्यापिका श्रीमती भारती पाटील पूर्व प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका सौ मनीषा साठे उपस्थित होत्या.

शाळेचा वार्षिक अहवाल कु. ओम चव्हाण व कु. समृद्धी मोराडे या विद्यार्थी प्रतिनिधींनी सादर केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. वैशाली मुंदाणकर आणि सौ. रत्ना गोसावी यांनी केले. इ. १ली ते इ. ७वीसाठी स्नेहसंमेलनाची 'नवरस' ही संकल्पना होती. विद्यार्थ्यांनी विविध नृत्यप्रकार सादर करून उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. ***

# डॉ. काकासाहेब देवधर इंग्लिश स्कूल,म्हसरूळ-नाशिक

**कार्यवाह : श्री. संजय गुंजाळ**

**मुख्याध्यापिका : श्रीमती भारती पाटील**

## माध्यमिक व उच्च माध्यमिक विभाग

### वार्षिक स्नेह संमेलन

दि. २३ डिसेंबर २०२४ रोजी वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात पार पडले. या कार्यक्रमात बॉलीवुडच्या सुवर्णकाळापासून ते आजपर्यंतच्या प्रवासावर प्रकाश टाकण्यात आला.

कार्यक्रमाची सुरूवात सरस्वती पूजन आणि दीप प्रज्वलनाने झाली. त्यानंतर प्रार्थना सादर करण्यात आली. 'ग्रंथ तुमच्या दारी' उपक्रमाचे संस्थापक श्री. विनायक रानडे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे यांनी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान भूषवले. उपाध्यक्ष श्री. एस. एम. जिर्गे, कार्यवाह श्री. संजय गुंजाळ, कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ, संचालक श्री. अमोल जोशी यांसारख्या मान्यवरांचीही कार्यक्रमास उपस्थिती होती. प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका सौ. प्रतिमा वैद्य, पूर्वप्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका सौ. मनीषा साठे आणि पालक शिक्षक संघाच्या सदस्यांनी कार्यक्रमाची शोभा वाढवली.

इ. १०वीच्या विद्यार्थ्यांनी कार्यक्रमाचा वार्षिक अहवाल सादर केला. कु. आदित्य सोनवणे आणि कु. तनिष्का उंबरकर यांनी शाळेच्या शैक्षणिक आणि सांस्कृतिक क्षेत्रातील सुयशाची माहिती दिली. पारितोषिक वितरण समारंभामध्ये विद्यार्थ्यांच्या प्रयत्नांचे आणि यशाचे कौतुक करण्यात आले.

सांस्कृतिक कार्यक्रम हा कार्यक्रमाचा विशेष आकर्षणाचा भाग ठरला. यामध्ये विद्यार्थ्यांनी आपापल्या कलागुणांचे उत्कृष्ट सादरीकरण केले. विद्यार्थिनी कु. अस्मी भालेराव आणि कु. तनुश्री जोशी यांनी गाण्यांचे भावपूर्ण सादरीकरणातून बॉलीवुडच्या गानकोकिळा लता मंगेशकर यांच्या आठवणींना हृदयस्पर्शी उजाळा देण्यात आला. या शिवाय शिक्षकांनी 'पीप इन द क्लासरुम' हे नाटक सादर केले. या नाटकाद्वारे शिक्षकांनी मूल्यशिक्षणावर प्रकाश टाकला. प्रमुख पाहुणे श्री. विनायक रानडे यांनी प्रोत्साहनपर भाषण केले. विद्यार्थ्यांनी प्रभावी पद्धतीने अध्ययन करावे, यावर मार्गदर्शन केले. कसे बोलावे आणि वागावे याबद्दल मार्गदर्शन केले. तसेच विद्यार्थ्यांनी नम्र राहण्याचे महत्त्व अधोरेखित केले.

मुख्याध्यापिका श्रीमती भारती पाटील यांच्या नेतृत्वाखाली आयोजित हा कार्यक्रम शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या सहकार्याने यशस्वीपणे पार पडला. ***

# कॉलेज ऑफ इंजिनिअरींग व टेक्नॉलॉजी आणि जी.के.पाटे (वाणी) व्यवस्थापन महाविद्यालय, पुणे

**संचालक : श्री. सुनील रेडेकर**

**संचालक : प्रा. राजेंद्र गो. कडुसकर**

**प्र. प्राचार्य : डॉ. मनोज तारांबळे**

## इ ॲण्ड टी सी इंजिनिअरिंग विभाग

दि. २२ डिसेंबर २०२४ रोजी हेल्थकेअर श्रेणीमध्ये PHN तंत्रज्ञानाद्वारे आयोजित केलेल्या AI-Botics हॅकाथॉनमध्ये BE E&TC च्या ट्रायजेन रोबोटिक्सला प्रथम स्थान मिळवून रु २५,०००/- रोख पारितोषिक जिंकले. ''रूग्णालयाच्या वातावरणात महिलांच्या सुरक्षिततेसाठी रोबोटिक्ससह LLMs चे एकत्रीकरण'' हा त्यांचा प्रकल्प होता.

**टीम सदस्य** : कु. श्रुती कुंभार, कु. रुचा रानडे, कु. आर्या जोशी

### एनएसएस हिवाळी शिबीर

महाविद्यालय आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय सेवा योजना (NSS) च्या विशेष हिवाळी शिबिराचे २०२४-२५ सत्रासाठीचे आयोजन दि. २२ ते २८ डिसेंबर २०२४ या कालावधीत पुणे जिल्ह्यातील भोर तालुक्यातील उंबरे गावात करण्यात आले होते. या शिबिराचे नेतृत्व NSS अधिकारी प्रा. आनंद नजन आणि प्रा. उदय सरोदे यांनी केले. तसेच या शिबिरात प्रा. अमित कुमार, प्रा. गणेश, प्रा. सौ. रश्मी पाकणकर, श्री. राहुल बडकस, सौ. रीमा कांबळे आणि श्री. महादेव खुटवड यांनी सहभाग घेतला.

### माजी विद्यार्थी मेळावा

शनिवार दि. २८ डिसेंबर २०२४ रोजी सकाळी १० ते २ या वेळेत महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थ्यांचा मेळावा आयोजित करण्यात आला होता. ११६ माजी विद्यार्थ्यांनी आपापल्या विभागांना भेट देऊन प्राध्यापक, कर्मचारी सदस्यांशी संवाद साधला. प्रा. वैदेही सोवनी, अध्यक्षा यांनी माजी विद्यार्थी संघटनेच्या नियामक मंडळाच्या नियमांबाबत प्रबोधन करून माजी विद्यार्थ्यांना संबोधित केले. या कार्यक्रमासाठी विभागप्रमुख डॉ. प्रसन्न शेटे यांनी मार्गदर्शन केले.

नॅशनल स्किल डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन (NSDC) आणि ASPIRE Knowledge and Skills ने TE E&TC विद्यार्थ्यांसाठी ''VLSI डिझाईन इंजिनियर'' वर कौशल्य विकास प्रशिक्षण आणि इंटर्नशिप कार्यक्रम सुरू केला. प्रा. पी. एस. देशपांडे आणि प्रा. व्ही. यू. गोंगाणे हे व्हीएलएसआय डिझाईन अभियंता इंटर्नशिप कोर्सचे समन्वयक होते. या प्रशिक्षण आणि इंटर्नशिप कार्यक्रमासाठी ६० विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे. दि. २ जानेवारी २०२५ रोजी उद्घाटन कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. ASPIRE चे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजय गांधी हे या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे होते.

### औद्योगिक भेटी

दि. ६ आणि ८ जानेवारी २०२५ रोजी विभागातील ४२ विद्यार्थी आणि पाच कर्मचारी यांना बंगळुरू येथील उ. राव सॅटेलाईट सेंटर (ISRO) आणि ऊटी येथील रेडिओ ॲस्ट्रोनॉमी सेंटर (TIFR) येथे औद्योगिक भेट देण्याची संधी मिळाली. ISRO मध्ये विद्यार्थ्यांनी उपग्रहांची प्रत्यक्ष मॉडेल्स पाहिली आणि त्यांच्या स्पाडेक्स मोहिमेची माहिती मिळवली. ही माहिती त्यांच्या भेटीनंतर दुसऱ्या दिवशी यशस्वीरीत्या प्रक्षेपित करण्यात आली. या मोहिमेतील महत्त्वाच्या डॉकिंग प्रणालीची वरिष्ठ शास्त्रज्ञांनी सखोल माहिती दिली. RAC मध्ये विद्यार्थ्यांनी रेडिओ ॲंटेना पाहिले आणि खगोलीय रेडिओ लहरी कशा पकडल्या जातात याचे प्रात्यक्षिक अनुभवले.

### अतिथी व्याख्यानाचे आयोजन

दि. १३ जानेवारी २०२५ रोजी सकाळी १०:३० वाजता वर्ग क्रमांक १०७ मध्ये अतिथी डॉ. सुहास काकडे, सहायक प्राध्यापक, सरदार पटेल इन्स्टिट्यूट

ऑफ टेक्नॉलॉजी, मुंबई यांचे व्याख्यान आयोजित केले होते. डॉ. काकडे यांनी आयआयटी, मुंबई येथून हॅप्टिक्समध्ये पीएच.डी. पूर्ण केली. ४G आणि ५G कम्युनिकेशनच्या क्षेत्रातील विद्यार्थ्यांना कम्युनिकेशन HAPTICS या क्षेत्राची ओळख करून देण्यासाठी या सत्राचे आयोजन करण्यात आले होते. SE E&TC चे ९४ विद्यार्थी (SE १ विभाग - ४६ विद्यार्थी आणि SE २ विभाग - ४८ विद्यार्थी) सत्रात सहभागी झाले होते. तसेच विभागप्रमुख डॉ. प्रसन्न शेटे यांनी पाहुण्यांचे स्वागत केले.

दि. १४ जानेवारी २०२५ रोजी B.E (E&TC) ७८ पैकी टॉप १३ विद्यार्थी SPPU, पुणे येथे AVISHKAR-२५ मध्ये पोडियम फेरीसाठी पात्र ठरले आहेत.

### इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग विभाग

**AICTE - ATAL पुरस्कृत फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्राम संपन्न**

AICTE Training and Learning (ATAL) Academy यांच्या सहयोगाने एक आठवड्याचा फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्राम (FDP) दि. ९ ते १४ डिसेंबर २०२४ या कालावधीत उच्च शिक्षण महाविद्यालयातील शिक्षकांसाठी ''Sustainable Developments through Renewable Energy, SDGs and Smart Cities'' या विषयावर आयोजित केला होता. सदर कार्यक्रमासाठी AICTE कडून महाविद्यालयाला रुपये ३,५०,०००/- इतके अर्थसहाय्य प्राप्त झाले.

शैक्षणिक आणि उद्योग क्षेत्रातील मान्यवर व्यक्ती शिक्षणतज्ज्ञ डॉ. शांतनू बंदोपाध्याय, आयआयटी, बॉम्बे, डॉ. गोविंद एन. कुलकर्णी, संचालक, पीसीसीओई, पुणे, डॉ. नितीन चतुर्वेदी, आयआयटी पाटणा, उद्योग क्षेत्रातील वक्ते डॉ. मनोज राठी, संचालक, RCFSSPL नाशिक, डॉ. राजेंद्र शर्मा संचालक, एस.पी.इ.एल. टेक्नॉलॉजीज प्रा. लि. पुणे, डॉ. सुशील रामदासी उपसंचालक, ARAI पुणे, डॉ. डी. जे. शेंडगे, उपाध्यक्ष, H2E पॉवर सिस्टम, पुणे, डॉ. रवींद्र उटगीकर, विलो इंडिया यांची एकूण ११ प्रभावी सत्रे आयोजित केली होती.

या कार्यक्रमांतर्गत सर्व सहभागींसाठी PMPML येथे इलेक्ट्रिक बस चार्जिंग स्टेशनसाठी औद्योगिक भेटीचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमासाठी समन्वयक म्हणून डॉ. मंगेश ठाकरे तर सहाय्यक समन्वयक म्हणून डॉ. मंदार भवाळकर यांनी काम पाहिले. प्रा. उदय सरोदे, प्रा. प्रीती खत्री, प्रा. उज्ज्वला ठकार, प्रा. राधा रांजेकर आणि प्रा. सुरेश यमल्ला यांनी या कार्यक्रमाचे संयोजन केले. कार्यक्रमात २२ उच्च शिक्षण महाविद्यालयातील एकूण ३७ प्राध्याकांनी व संशोधक विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष सहभाग घेतला व प्रशस्तीपत्र मिळविले.

### इन्फर्मेशन टेक्नॉलॉजी विभाग

आयटी विभाग IQAC आणि ITSA यांच्या संयुक्त विद्यमाने Expert Session on Effective Research Paper Writing using AI या विषयावर दि. २४ जानेवारी २०२५ रोजी प्रमुख वक्ते डॉ. अनुराधा येणकिकर (सहाय्यक प्राध्यापक, व्हीआयटी पुणे, पोस्ट-डॉक फेलो, पीएचडी (सीएसई), संशोधक, शिक्षक, एआय-एमएल-डीएल-जेनएआय, संशोधन अनुदान प्राप्तकर्ता) यांनी विद्यार्थ्यांना मौलिक मार्गदर्शन केले.

### आर्टिफिशियल इंटेलिजन्स आणि डेटा सायन्स विभाग

माहे डिसेंबर २०२४ मध्ये विभाग प्रमुख डॉ. मीनाक्षी अत्रे व इॲण्डटीसी शाखेचे विभाग प्रमुख, डॉ. प्रसन्न शेटे यांनी आयआयसी तर्फे प्राध्यापकांसाठी Gen AI विषयावर E2E Networks च्या श्री गुरुचरण महाजन यांचे सेशन आयोजित केले होते.

**अभिनंदनीय**

* प्रो. पायल तायडे यांनी डिसेंबर २०२४ मध्ये कम्युनिकेशन या विषयामध्ये Ph. D. पूर्ण केली. प्रो. पायल तायडे यांचे संस्थेच्यावतीने हार्दिक अभिनंदन

आणि पुढील वाटचालीस शुभेच्छा !

✻ प्रो. शुभांगी सोळंके यांना कॉम्प्युटर नेटवर्क अँड सेफ्टी डोमेन मध्ये पेटेंट मिळाले. तसेच त्यांनी आणि Cloud Architecture आणि AI in Banking and Health Care चे सर्टिफिकेशन कोर्सेस पूर्ण केले.

✻ प्रो. श्रुती देशपांडे यांनी Analytics Vidhya चे आणि AI in Banking and Health Care मध्ये सर्टिफिकेट मिळवले.

✻ प्रो मधुरा परांजपे, प्रो. स्वप्ना शिंगाडे आणि प्रो. पल्लवी बंगाळे यांनीही AI in Banking and Health Care मध्ये सर्टिफिकेट मिळवले.

✻ प्रो. विजया कानडे यांनी तृतीय वर्षातील विद्यार्थ्यांना इंटर्नशिपचे मार्गदर्शन केले आणि वेगवेगळ्या स्टार्ट-अप मध्ये त्यांना इंटर्नशिप मिळवण्यास मदत केली. डिपार्टमेंटने आयोजित केलेल्या इंटर्नशिप ओरिएंटेशन प्रोग्रॅम मधून श्री. राजन बत्रा यांनी डिपार्टमेंटच्या २ विद्यार्थ्यांना ESYANET मध्ये स्टायपेंडसहित इंटर्नशिपची संधी दिली. तसेच पुण्यातील नामांकित कॉलेज ऑफ मिलिटरी इंजिनिअरिंग मध्येदेखील २ विद्यार्थ्यांना इंटर्नशिपची संधी मिळाली आहे. या व्यतिरिक्त अनेक चांगल्या कंपन्यामध्ये एआयडीएस विभागाची ४० विद्यार्थी इंटर्नशिप करत आहेत.

दरवर्षी, मासातो सम्पेई, डायरेक्टर, एशिया टू जपान आणि श्रुती चन्नागिरी, डायरेक्टर, Hirameki Solutions हे Japanese डेलिगेट्स महाविद्यालयाला भेट देतात. या वर्षीसुद्धा ही मिटिंग यशस्वीरीत्या पार पडली आणि Autonomy च्या दृष्टीने अनेक संधींची चर्चा झाली. आपल्या महाविद्यालयाचे सुमारे ४५ विद्यार्थी आणि विद्यार्थिनी २०१७ पासून जपानमध्ये वेगवेगळ्या कंपन्यांमध्ये काम करत आहेत.

Nvdia या कंपनीच्या ब्रँड अम्बॅसेडर म्हणून काम करत असलेल्या डॉ. मीनाक्षी अत्रे यांनी Innoplexus मध्ये Fundamentals of Deep Learning विषयाचे कॉर्पोरेट ट्रेनिंग घेतले. त्याचबरोबर त्यांनी SIES (Nerul) College of Arts, Science and Commerce संस्थेमध्ये GenAI Tools for Education Assessment and Evaluation या विषयावर एक दिवसीय कार्यशाळा घेतली.

**मेकॅनिकल इंजिनिअरिंग विभाग**

**सावित्रीबाई फुले जयंती**

दि. ३ जानेवारी २०२५ रोजी महाविद्यालयात सावित्रीबाई फुले जयंती साजरी केली गेली. संचालक प्रा. राजेंद्र कडुसकर व प्र. प्राचार्य डॉ. मनोज तारांबळे यांनी सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहिली. तसेच आपल्या मनोगतातून सावित्रीबाई फुले यांचे चरित्र व त्यांच्या कार्याबद्दल उपस्थितांना माहिती दिली. या प्रसंगी सर्व विभागप्रमुख, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी हे उपस्थित होते. श्री. युवराज सावंत यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

✻✻✻

**निधन वार्ता**



नानकलाल खत्री

✻ संस्थेचे अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान महाविद्यालय, पुणे ९ येथील प्रा. प्रीती खत्री यांचे वडील श्री. नानकलाल नारायणलाल खत्री यांचे दि. १९ डिसेंबर २०२४ रोजी वयाच्या ८६ व्या वर्षी दुःखद निधन झाले.



विवेक गोसावी

✻ संस्थेच्या महाराष्ट्र मुद्रण तंत्र संस्थेचे माजी विद्यार्थी व बालभारतीचे नियंत्रक श्री. विवेक गोसावी यांचे दि. ९ जानेवारी २०२५ रोजी वयाच्या ५२ व्या वर्षी दीर्घ आजाराने दुःखद निधन झाले.

**ईश्वर त्यांचे आत्म्यास शांती देवो !** ✻✻✻

# शिक्षणशास्त्र व संशोधन महाविद्यालय, म्हसरूळ, नाशिक

**कार्यवाह : श्री. संजय नि. गुंजाळ**

**प्राचार्य : डॉ. सुरेश पाटील**

## भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन साजरा

दि. ६ डिसेंबर २०२४ रोजी महाविद्यालयात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा महापरिनिर्वाण दिन साजरा करण्यात आला. प्राचार्य डॉ. सुरेश पाटील यांच्या हस्ते महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी प्रा. दिलीप अहिरे यांनी सर्वांचे स्वागत करून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनातील काही महत्त्वाचे प्रसंग सांगत मनोगत व्यक्त केले. यावेळी माजी शिक्षक श्री. दादासाहेब पठाडे, माजी प्रा. के. एस. चव्हाण, प्रा. डॉ. अरविंद जिंजर, प्रा. मनीषा पाटील, प्रा. डॉ. रबाब भगत, प्रा. रोहिणी भालेराव, प्रा. अनिता बोडके, सौ. अर्चना जोशी, श्री. सखाराम गायकवाड आदी उपस्थित होते.

## प्राचार्य डॉ. सुरेश पाटील लिखित तीन पुस्तके व गौरवग्रंथाचे मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन संपन्न

शनिवार दि. ७ डिसेंबर २०२४ रोजी प्राचार्य डॉ. सुरेश पाटील लिखित आत्मकथनात्मक 'हिवर', 'हेंकळ' आणि व्यक्तिचित्रणात्मक 'भवतालची माणसे' या तीन पुस्तकांचे व गौरवग्रंथाचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते महाविद्यालयाच्या सेमिनार हॉलमध्ये उत्साहात संपन्न झाले.

महाराष्ट्र शासनाने स्थापिलेल्या रिध्दपुर, अमरावती येथील 'मराठी भाषा विद्यापीठा'चे कुलगुरू डॉ. प्रा. अविनाश आवलगावकर आणि ८९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष प्रा. डॉ. श्रीपाल सबनीस प्रमुख व्याख्याते म्हणून उपस्थित होते. प्रमुख अतिथी म्हणून कार्यवाह श्री. संजय गुंजाळ, संचालक श्री. अमोल जोशी आणि मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे सरचिटणीस ॲड. नितीन ठाकरे उपस्थित होते.

याप्रसंगी प्रा. श्रीपाल सबनीस म्हणाले की 'प्राचार्य डॉ. सुरेश पाटील यांचे आत्मकथन हे माणसाचे माणूसपणाचे चरित्र आहे. आत्मचरित्र आणि चरित्र यांची येथे सरमिसळ झालेली दिसते. परिस्थितीचा दुष्काळ आणि सर्वच गोष्टींचा दुष्काळ असताना गरिबीचे प्रतिनिधित्व करणारी कथाच जणू काही येथे मांडलेली आहे. या ठिकाणी कुटुंब, नातेसंबंध, समाज, गाव, शिक्षण या सर्वच क्षेत्राला व्यापणारी ही कथा आहे, असेही त्यांनी सांगितले.

माणसाचे जीवन हे अत्यंत चिवट असून जीवनात प्रतिकूल परिस्थिती आल्यास व मनात जिद्द निर्माण झाल्यावर कोणत्याही संकटांवर मात करीत यश मिळवता येते. प्राचार्य डॉ. सुरेश पाटील यांनी देखील जीवनातील प्रतिकूल परिस्थितीवर मात करीत स्वतःचा आत्मशोध घेतला, त्याचबरोबर मानवी मनाचाही शोध घेतला आहे, असे त्यांच्या लिखाणातून दिसून येते. तसेच स्वतःवर बोलणे सोपे असते, परंतु लिहिणे कठीण असते. मात्र अत्यंत प्रामाणिकपणे त्यांनी हा प्रयत्न केला आहे, असे प्रतिपादन रिध्दपूर येथील मराठी भाषा विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. अविनाश अवलगावकर यांनी केले. प्राचार्य डॉ. सुरेश पाटील यांनी तटस्थपणे लिखाण करून जीवनातील घटनांची प्रांजळपणे कबुली दिली आहे. तसेच जीवनाचे मूल्य त्यांना कळले असून आपले म्हणणे लिखाणातून मांडले तर दुःख हलके व्हायला लागते असेही प्रा. अवलगावकर यांनी सांगितले.

यावेळी प्रा. गिरीश जोशी आणि प्रा. तुषार चांदवडकर यांनीही प्राचार्य डॉ. सुरेश पाटील यांच्या लिखाणाविषयी मनोगत व्यक्त केले. ॲड. नितीन ठाकरे यांनी आपल्या भाषणातून पाटील यांना शुभेच्छा

दिल्या. कार्यवाह श्री. संजय गुंजाळ आणि संचालक श्री. अमोल जोशी यांनीही प्राचार्य डॉ. सुरेश पाटील यांच्या पुस्तकांचे कौतुक करून आनंद व्यक्त केला. यावेळी पुस्तकाचे लेखक प्राचार्य डॉ. सुरेश पाटील यांनीही मनोगत व्यक्त केले. या प्रसंगी मान्यवरांच्या हस्ते चारही पुस्तकांचे प्रकाशन करण्यात आले. तसेच प्रमुख पाहुण्यांचा यावेळी स्मृतिचिन्ह व ग्रंथ देऊन सत्कार करण्यात आला. गौरव ग्रंथाच्या लेखकांचाही यावेळी सत्कार करण्यात आला. पाहुण्यांचा परिचय प्रा. दिलीप अहिरे यांनी करून दिला. सूत्रसंचालन श्री. रविंद्र मालुंजकर यांनी केले. कार्यक्रमास शैक्षणिक आणि सामाजिक क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

**छात्र शिक्षक यांचा 'आंतरवासीता वर्ग उत्साहात'**

दि. २५ डिसेंबर २०२४ रोजी महविद्यालयाच्या प्रशिक्षणार्थी विद्यार्थ्यांच्या आंतरवासीता वर्गाचा समारोप समारंभ श्रीराम माध्यमिक आणि उच्च माध्यमिक विद्यालयात संपन्न झाला. यावेळी प्रमुख अतिथि म्हणून तरुण ऐक्य मंडळाचे अध्यक्ष बी. के. मुखेडकर उपस्थित होते. यावेळी त्यांनी मार्गदर्शन केले. जीवनात उत्तम प्रकारचे यश प्राप्त करायचे असेल तर परिश्रम करणे महत्त्वाचे असते. परिश्रम केल्यास उत्तम यश प्राप्त करता येते. 'परिश्रम हीच यशाची गुरुकिल्ली आहे', असे प्रतिपादन तरुण ऐक्य मंडळाचे अध्यक्ष बी. के. मुखेडकर यांनी केले. अध्यक्षस्थानी महविद्यालयाचे प्राचार्य सुधीर नवसारे होते. प्राचार्य डॉ. सुरेश पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली आंतरवासीता वर्गाचे दोन गटातील जवळ जवळ २० विद्यार्थी सहभागी झाले होते. दहा दिवसाच्या आंतरवासीता वर्गात विविध उपक्रम व अध्यापनाचे कार्य करण्यात आले. यावेळी प्रा. दिलीप अहिरे, आंतवासीता वर्गाचे प्रमुख प्रा. अरविन्द जिंजर, प्रा. रोहिणी भालेराव, उपमुख्याध्यापक उमेश आटवणे, पर्यवेक्षक कारभारी जोंधळे, जितेंद्र सिसोदे आदी उपस्थित होते. याप्रसंगी प्रशिक्षणार्थी विद्यार्थी यांनी घेतलेल्या विविध स्पर्धेतील यशवंत विद्यार्थ्यांना बक्षिसे देऊन गौरव करण्यात आला. कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक प्रा. अरविन्द जिंजर यांनी केले. पाहुण्यांचा परिचय नेहा महाजन यांनी करून दिला. यावेळी प्रा. दिलीप अहिरे, सुधीर नवसारे, रघुनाथ सुरसे आणि प्रशिक्षणार्थी रितेश भामरे यांनी मनोगत व्यक्त केले. प्रा. रोहिणी भालेराव यांनी आभार मानले. यावेळी शाळेतील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, प्रशिक्षणार्थी विद्यार्थी उपस्थित होते.

**छात्र शिक्षक यांचा 'आंतरवासीता वर्ग' उत्साहात संपन्न**

दि. २८ डिसेंबर २०२४ रोजी प्रशिक्षणार्थी विद्यार्थ्यांच्या आंतरवासीता वर्गाचा समारोप समारंभ उन्नती माध्यमिक आणि उच्च माध्यमिक विद्यालयात संपन्न झाला. यावेळी प्रमुख अतिथि म्हणून प्राचार्य आर. बी. राणे उपस्थित होते. यावेळी त्यांनी मार्गदर्शन केले. जीवनात उत्तम यश मिळविण्यासाठी प्रत्येकाने अभ्यासात सातत्य ठेवले पाहिजे आणि शिक्षकांनी सतत नवनवीन तंत्रज्ञानाचा अभ्यास केला पाहिजे. आंतरवासीता वर्गातून सर्व उपक्रमांची माहिती मिळते असेही त्यांनी सांगितले. प्राचार्य डॉ. सुरेश पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली आंतरवासीता वर्गाचे दोन गटातील जवळ जवळ ३० विद्यार्थी सहभागी झाले होते. दहा दिवसाच्या आंतरवासीता वर्गात विविध उपक्रम व अध्यापनाचे कार्य करण्यात आले. यावेळी प्रा. दिलीप अहिरे, प्रा. मनीषा पाटील आणि प्रा. अनिता बोडके, पर्यवेक्षक गावीत आदी उपस्थित होते. याप्रसंगी प्रशिक्षणार्थी विद्यार्थी यांनी घेतलेल्या विविध स्पर्धेतील यशवंत विद्यार्थ्यांना बक्षिसे देऊन गौरव करण्यात आला. स्वागत प्रास्ताविक प्रा. मनीषा पाटील यांनी केले. पाहुण्यांचा परिचय सुनंदा चौधरी यांनी करून दिला. यावेळी प्रा. दिलीप अहिरे, प्रा. अनिता बोडके आणि प्रशिक्षणार्थी सेजल गुजराथी यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, प्रशिक्षणार्थी विद्यार्थी उपस्थित होते.

## वाचन संकल्प महाराष्ट्राचा अभिनव उपक्रम

शनिवार दि. २८ डिसेंबर २०२४ रोजी महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अधिपत्याखाली 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' या अभिनव उपक्रमाच्या अंतर्गत महाविद्यालयात कार्यवाह श्री. संजय गुंजाळ आणि प्राचार्य डॉ. सुरेश पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रंथालयात विविध ग्रंथांचे प्रदर्शन भरविण्यात आले होते. या प्रदर्शनाचे उद्‌घाटन प्राचार्य डॉ. सुरेश पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी डॉ. सुरेश पाटील यांनी वाचनाचे महत्त्व सांगितले. वाचन हा माणसाच्या जीवनाचा महत्त्वाचा भाग आहे. वाचनामुळे ज्ञान, विचारशक्ती, संवेदनशीलता आणि व्यक्तिमत्त्व विकास घडतो. वाचन हे केवळ करमणुकीचे साधन नसून ते बौद्धिक, सामाजिक, भावनिक आणि मानसिक प्रगतीसाठी आवश्यक आहे असेही त्यांनी सांगितले.

यावेळी विभाग प्रमुख प्रा. दिलीप अहिरे यांनी वाचनाचे महत्त्व सांगितले. वाचनामुळे नवीन विषयांबद्दल माहिती मिळते. वाचनामुळे माणसाचे विचार प्रगल्भ होतात. भाषा सुधारते. वाचनाने शब्दसंग्रह वाढतो, व्याकरण सुधारते, आणि लिखाण कौशल्य विकसित होते असेही सांगितले. छात्र अध्यापिका सेजल गुजराथी हिने महान व्यक्तींची आत्मचरित्रे वाचून प्रेरणा मिळते. संघर्षातून उभारी कशी घेतली जाते, हे समजते असे सांगितले तर, छात्र शिक्षक श्याम रिठे यांनी वाचन मन शांत करते. साहित्य, काव्य, कथा वाचून तणाव कमी होतो आणि करमणूकही होते. यावेळी वाचन व्यक्तीला जीवनभर शिकण्याची सवय लावते. हे सतत प्रगती साधण्यासाठी उपयुक्त ठरते असे सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नेहा महाजन यांनी केले. मेघागौरी घोडके यांनी आभार मानले.

शनिवार दि. २८ डिसेंबर रोजी नाशिक येथील सार्वजनिक वाचनालयास आपल्या संस्थेच्या बी. एड. महविद्यालयातील छात्र शिक्षक आणि प्रशिक्षक प्राध्यापक यांनी प्राचार्य डॉ. सुरेश पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली भेट दिली. वाचनालयाचे अध्यक्ष प्रा. दिलीप फडके आणि प्रमुख सचिव देवदत्त जोशी यांनी सर्वांचे स्वागत करून माहिती दिली. यावेळी सर्वांनी वाचनालयातील सर्व विभागांची माहिती घेतली. वाचनालायतील १८४ वर्षाचे अतिशय दुर्मिळ वस्तूंचे निरीक्षण करून माहिती घेतली. ग्रंथपाल दिलीप बोरसे आणि योगिनी जोशी यांनी सर्व विभागांची काळजीपूर्वक माहिती दिली. वाचनालयातील पोथी विभाग, देवघेव विभाग, बालवाचनालय आणि अभ्यासिका यांच्या व्यवस्थापनाबद्दल माहिती करून घेतली यावेळी महाविद्यालयातील सर्व प्रशिक्षक प्राध्यापक उपस्थित होते.

## क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी

दि. ३ जानेवारी २०२५ रोजी महाविद्यालयात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. सुरेश पाटील हे होते. यावेळी देवधर इंग्लिश मीडियम स्कूल माध्यमिक विभागाच्या मुख्याध्यापिका श्रीमती भारती पाटील, प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका सौ. प्रतिमा वैद्य तसेच मेरी हायस्कूलचे मुख्याध्यापक श्री. मधुकर पगारे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. विभाग प्रमुख प्रा. दिलीप अहिरे यांनी स्वागत करून प्रास्ताविक केले. याप्रसंगी प्रा. मनीषा पाटील आणि प्रा. रबाब भगत यांनी सावित्रीबाई फुले यांच्या कार्याबद्दल माहिती सांगितली. यावेळी प्रा. अरविंद जिंजर, प्रा. रोहिणी भालेराव, सौ. चंद्रात्रे, सौ. महाले तसेच महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक उपस्थित होते. अजय पाखले यांनी उपस्थितांचे आभार मानले.

***

## ※ शिक्षणशास्त्र व संशोधन महाविद्यालय, म्हसरूळ, नाशिक ※



शनिवार दि. ७ डिसेंबर २०२४ रोजी प्राचार्य डॉ. सुरेश पाटील लिखित आत्मकथनात्मक 'हिवर', 'हेंकळ' आणि 'भवतालची माणसे' या तीन पुस्तकांचे व गौरवग्रंथाचे प्रकाशन करताना डावीकडून कार्यवाह श्री. संजय गुंजाळ, रिध्दपुर, अमरावती येथील 'मराठी भाषा विद्यापीठा'चे कुलगुरू डॉ. प्रा. अविनाश आवलगावकर, सौ. मीरा सुरेश पाटील, प्राचार्य डॉ. सुरेश पाटील, ८९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष प्रा. डॉ. श्रीपाल सबनीस मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे सरचिटणीस ॲड. नितीन ठाकरे आणि संचालक श्री. अमोल जोशी



शनिवार दि. २८ डिसेंबर रोजी नाशिक येथील सार्वजनिक वाचनालयास भेट प्रसंगी उपस्थित छात्र शिक्षक आणि प्रशिक्षक प्राध्यापक



श्रीराम विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, नाशिक आतंरवासीता वर्गाच्या समारोप समारंभ प्रसंगी तरुण ऐक्य मंडळाचे अध्यक्ष श्री. बी. के. मुखेडकर यांचा गौरव करताना महाविद्यालयातील प्राध्यापक



उन्नती माध्यमिक आणि उच्च माध्यमिक विद्यालयात, नाशिक आतंरवासीता वर्गाच्या समारोप समारंभ प्रसंगी प्राचार्य आर. बी. राणे यांच्या समवेत महाविद्यालयातील प्राध्यापक आणि प्रशिक्षणार्थी विद्यार्थी

# कॉलेज ऑफ सायन्स ॲण्ड कॉमर्स, पुणे

**संचालक : डॉ. राजेंद्र सं. कांबळे**
**प्राचार्य : डॉ. संजयकुमार गायकवाड**

### वृक्षारोपण

वारजे येथील वनविभागाच्या स्मृतिवन टेकडीवर २१८ स्वयंसेवी संस्थांबरोबर महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी ५६५ देशी झाडांची लागवड केली. भांबुर्डी रेंज, वनविभाग, अप्रोच हेल्पिंग हॅन्ड फाउंडेशन, लायन्स क्लब, महा एनजीओ फाउंडेशन आणि महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित वृक्षारोपण कार्यक्रम स्मृतिवन टेकडीवर संपन्न झाला. या वृक्षारोपण कार्यक्रमात चिंच, पळस, अर्जुन, कांचन, पुतरंजीव, रोहितक, पिंपळ, मोह, रिठा अशा देशी वृक्षांचा समावेश होता. या वृक्षारोपणामध्ये महाविद्यालयातील १२ विद्यार्थी आणि ३ शिक्षकांचा सहभाग होता. कार्यक्रमानंतर सर्व संस्थांनी एकत्र येऊन वृक्ष लागवड करून न थांबता, त्याची काळजी घ्यायला हवी व पर्यावरणाचा समतोल राखण्यास मदत करण्याचे आवाहन आयोजकांतर्फे करण्यात आले. या कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी सहाय्यक प्राध्यापिका सौ. उर्मिला पाटील यांनी विशेष प्रयत्न केले.

### वर्धापन दिन उत्साहात संपन्न

दि. १६ जुलै २०२४ रोजी महाविद्यालयाचा २३ वा वर्धापन दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरूवात उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सरस्वती पूजन व दीप प्रज्वलनाने करण्यात आली. याप्रसंगी कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे, कार्यवाह श्री. संजय गुंजाळ, कोषाध्यक्ष श्री. कृष्णाजी कुलकर्णी, संचालक श्री. सुनील रेडेकर, प्रा. राजेंद्र कडुसकर, डॉ. राजेंद्र कांबळे उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ. संजयकुमार गायकवाड यांनी केले. प्रास्ताविकामध्ये त्यांनी आजचा दिवस आपल्या सर्वांसाठी अभिमानाचा आहे, कारण महाविद्यालयाने गेल्या काही वर्षांमध्ये केलेली प्रगती आणि यश आपणा सर्वांना प्रेरणा देणारे आहे असे सांगितले. कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे यांनी महाविद्यालयाच्या वर्धापन दिनानिमित्त उपस्थित राहण्याचा सन्मान मिळाल्याबद्दल मनापासून आनंद व्यक्त करत विद्यार्थ्यांनी आपल्या उद्दिष्टांवर, ध्येयांवर अटळ राहून शिक्षण, संस्कार, विकासाच्या मूलभूत मूल्यांची रुजवात करत आपला विकास केला पाहिजे असे मार्मिक भाष्य केले. कुलसचिव श्री. संजय गुंजाळ यांनी महाविद्यालयाचा वर्धापन दिन म्हणजे एका प्रवासाचा पुनरावलोकन करणारा आणि नवीन उद्दिष्टांसाठी प्रेरणा देणारा महत्त्वाचा दिवस असतो, हा दिवस स्थापनेच्या दिवसाचे स्मरण करून देतो असे सांगत त्यांनी संस्थेशी असलेले अतूट नाते त्यांच्या अनुभवांमधून व जुन्या आठवणींना उजाळा देत स्पष्ट केले. महाविद्यालयाचे प्रमुख संचालक प्रा. डॉ. राजेंद्र कांबळे यांनी व्यवसायाभिमुख होऊन आपण स्वतःची प्रगती करण्याबरोबर इतरांनाही रोजगार प्राप्त करून दिला पाहिजे, असा गुरूमंत्र विद्यार्थ्यांना दिला. वर्धापन दिनानिमित्त उपस्थित मान्यवरांच्या हस्ते महाविद्यालयाच्या सर्वच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना मानचिन्ह देऊन प्रोत्साहित केले. या कार्यक्रमास महाविद्यालयाचा सर्व कर्मचारी वृंद आणि विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन महाविद्यालयाच्या सहाय्यक प्राध्यापिका प्रियांका खुटवड यांनी केले. मान्यवरांनी सर्वांना शुभेच्छा दिल्या व कार्यक्रमाची सांगता झाली.

### अक्षर भारती प्रोजेक्ट अंतर्गत ड्रॉइंग मटेरियल (पेंटिंग बॉक्स) सह रेखाचित्र साहित्याचे वाटप

महाविद्यालय आणि सेवा इंटरनॅशनल (NGO) यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, मोहोळनगर, अंबडवेट, तालुका मुळशी या शाळेतील २७ आदिवासी विद्यार्थ्यांना पेंटिंग बॉक्स सह रेखाचित्र

साहित्याचे (२७ पेंटिंग किट) वाटप करण्यात आले. मुख्याध्यापक श्री. सुदाम पवार यांनी शाळेचे व आदिवासी पाड्यातील मुलांचे ऋणानुबंध अजून कसे घट्ट जोडता येतील याविषयी सखोल चर्चा केली. प्राचार्य डॉ. संजयकुमार गायकवाड व अक्षर भारती प्रोजेक्टचे हेड श्री. गणेश वागस्कर यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम राबविण्यात आला. या कार्यक्रमासाठी शाळेचे मुख्याध्यापक श्री. सुदाम पवार व शिक्षिका सौ. मंगल मारणे यांचे विशेष सहकार्य लाभले. प्राचार्य डॉ. संजयकुमार गायकवाड यांच्या मते आगामी काळात सेवा इंटरनॅशनल (NGO) यांच्या अक्षर भारती प्रोजेक्ट अंतर्गत आदिवासी पाड्यातील विद्यार्थ्यांची वाचनाच्या गोडीतून शैक्षणिक पातळी वाढविण्यासाठी व त्यांचे भवितव्य उज्ज्वल घडविण्यासाठी मोलाचा हातभार लागेल. महाविद्यालयाच्या सहाय्यक प्राध्यापिका सौ. उर्मिला पाटील आणि सौ. पूजा पवार यांनी महाविद्यालयाचे प्रतिनिधित्व करत कार्यक्रम उत्तम रित्या पार पाडला.

**अविष्कार स्पर्धेचे आयोजन**

दि. २८ सप्टेंबर २०२४ रोजी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ अंतर्गत महाविद्यालय स्तरावरील अविष्कार स्पर्धा २०२४ चे आयोजन महाविद्यालयात करण्यात आले होते. वरील विषयाला अनुसरून Research Project Competition संकल्पनेने विद्यार्थ्यांमध्ये सर्जनशीलता व कल्पनाशक्ती वाढावी, वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित व्हावा, तांत्रिक ज्ञानाचा उपयोग करून स्पर्धात्मकता व आत्मविश्वास वाढावा या हेतूने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेसाठी प्रमुख अतिथी म्हणून सौ. शीतल जाधव (सिंहगड कॉलेज, आंबेगाव) व सौ. तेजश्री अहिरे (गरवारे कॉलेज, कर्वे रोड) उपस्थित होत्या. या स्पर्धेमध्ये महाविद्यालयाचे १० संघांच्या ३० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. या कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालयाच्या स्टॅटिस्टिक विभागाच्या सहाय्यक प्राध्यापिका सौ. वनिता म्हस्के व सहाय्यक प्राध्यापिका सौ. प्रांजल तरटे यांनी केले.

**ग्रीन क्लब अंतर्गत वृक्षारोपणाचे आयोजन**

वृक्षारोपण ही आजच्या काळाची गरज लक्षात घेता महाविद्यालयाने ग्रीन क्लब ची स्थापना केली असून या ग्रीन क्लब अंतर्गत पर्यावरण संवर्धनसाठी व संरक्षणासाठी विद्यार्थ्यांना एकत्र आणणारे व्यासपीठ उपलब्ध व्हावे, तसेच विद्यार्थ्यांमध्ये निसर्गाबद्दलची जाणीव आणि संवेदनशीलता निर्माण व्हावी या उद्देशाने महाविद्यालयामध्ये वृक्षारोपणाचे आयोजन केले होते. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने जारी केलेल्या ''एक पेड मा के नाम''या उपक्रमांतर्गत पंधरा वृक्षांची लागवड करण्यात आली. हा कार्यक्रम प्राचार्य डॉ. संजयकुमार गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली पार पडला. महाविद्यालयाच्या सहाय्यक प्राध्यापिका सौ. ज्योती पाटील, सहाय्यक प्राध्यापिका सौ. प्रियांका खुटवड यांनी मोलाचा हातभार लावला. सर्व शिक्षक व शिक्षकेतर वृंदाबरोबरच विद्यार्थ्यांनीही या कार्यक्रमांमध्ये सहभाग घेतला. महाविद्यालयाच्या प्राचार्यांच्या मते ग्रीन क्लब द्वारे वृक्षारोपण करणे म्हणजे निसर्गाशी असलेले आपले नाते दृढ करणे होय. पर्यावरणाच्या रक्षणासाठी, शाश्वत विकासासाठी, भावी पिढ्यांना स्वच्छ व सुंदर पर्यावरण देण्यासाठी हा उपक्रम अतिशय गरजेचा आहे.

**अभिनंदनीय**



सौ. प्राजक्ता लोकूर

महाविद्यालयाच्या ग्रंथालय प्रमुख सौ. प्राजक्ता लोकूर यांचा ''डिजिटल लायब्ररी'' या विषयावरील रिसर्च पेपर ''आंतरराष्ट्रीय जर्नल'' मध्ये प्रकाशित झाला.

**सौ. प्राजक्ता लोकूर यांचे संस्थेच्या वतीने हार्दिक अभिनंदन आणि पुढील वाटचालीस शुभेच्छा !** ***

## ❊ कॉलेज ऑफ सायन्स अ‍ॅण्ड कॉमर्स, पुणे ❊



महाविद्यालयाच्या २३ व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमप्रसंगी कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे यांचे स्वागत करताना प्राचार्य डॉ. संजयकुमार गायकवाड, समवेत डावीकडून संचालक डॉ. राजेंद्र कांबळे आणि कार्यवाह श्री. संजय गुंजाळ

वारजे येथील वनविभागाच्या स्मृतिवन टेकडीवर २१८ स्वयंसेवी संस्थांबरोबर ५६५ देशी झाडांची लागवड करणारे महाविद्यालयातील विद्यार्थी आणि कर्मचारी





↑ अक्षर भारती प्रोजेक्ट अंतर्गत महविद्यालय आणि सेवा इंटरनॅशनल (**NGO**) यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, मोहोळनगर, अंबडवेट, तालुका मुळशी येथील २७ आदिवासी विद्यार्थ्यांना पेंटिंग बॉक्ससह रेखाचित्र साहित्याचे वाटप करण्यातआले

डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त वाचन प्रेरणा दिन साजरा करण्यात आला ↓



# नेरूळ शाखा, नवी मुंबई

## विद्याभवन प्राथमिक इंग्रजी शाळा

### नेरूळ शाखा, नवी मुंबई

**कुलसचिव : श्री. दिनेश मिसाळ**

**प्र. मुख्याध्यापिका : सौ. मनीषा मुळीक**

### वार्षिक शालेय क्रीडास्पर्धा

दि. १२ ते १७ डिसेंबर २०२४ या कालावधीत शालेय क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धांच्या उद्‌घाटनासाठी प्रमुख अतिथी म्हणून श्री. मोहनराव पाटील (निवृत्त क्रीडा शिक्षक, सर्वोदय विद्यालय, घाटकोपर) व विशेष अतिथी म्हणून श्री. पद्मराज हेगडे तसेच कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ, मुख्याध्यापिका श्रीमती सुवर्णा मिसाळ, श्रीमती मनीषा मुळीक, मुख्याध्यापक श्री. गोरख कदम, शिक्षकवृंद आणि विद्यार्थी उपस्थित होते. अतिथींच्या स्वागत सत्कारानंतर प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते क्रीडा ज्योत प्रज्वलित करून क्रीडा स्पर्धांचे उद्‌घाटन करण्यात आले. बाळ जन्माला आल्यानंतर ते थोडी थोडी हालचाल करत असते. हालचालीमुळे त्या बाळाचा व्यायामही होतो आणि खेळही होतो. मुलांना बालपणापासून शिक्षणाची आवड असते व ती आवड जपायची असते. खेळाने मन आणि तन व्यवस्थित राहते अशा शब्दात श्री. मोहनराव पाटील यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले व स्पर्धांसाठी शुभेच्छा दिल्या. आज विद्याभवन मधील हे छोटे खेळाडू आणि त्यांच्यातील उत्साह पाहून मला खूप आनंद होत आहे. शाळेने तुम्हाला दिलेली ही संधी आहे, तिचे सोने करा. खेळाबरोबर अभ्यासही महत्त्वाचा असतो असे प्रेरणादायी मार्गदर्शन श्री. पद्मराज हेगडे यांनी विद्यार्थ्यांना केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन श्रीमती फरहाना चौगुले यांनी केले.

### नेल्टास स्पर्धा

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये नेल्टास तर्फे घेण्यात आलेल्या प्राथमिक फेरीमध्ये विभागाच्या पुढील विद्यार्थ्यांनी यश संपादित केले. या विद्यार्थ्यांची पुढील फेरीसाठी निवड करण्यात आली आहे.

| विद्यार्थ्यांचे नाव | विद्यार्थ्यांचे नाव |
|---|---|
| कु. प्रत्युष बाबाजी पडवळ | कु. श्लोक संदीप जाधव |
| कु. स्पृहा संजय नलावडे | कु. प्रार्थना प्रवीण जाधव |
| कु. सना मकदूम खान | |

### बुद्धिबळ स्पर्धा

दि. १९ डिसेंबर २०२४ रोजी कै. मारुती लक्ष्मण मराठे स्मृती प्रीत्यर्थ पु. वि. गृह माजी विद्यार्थी मंडळातर्फे घाटकोपर येथे आयोजित करण्यात आलेल्या बुद्धिबळ स्पर्धेमध्ये विद्यार्थिनी कु. प्रार्थना प्रवीण पाटील हिने सब-ज्युनिअर गटामध्ये द्वितीय क्रमांक संपादित केला.

### वार्षिक शालेय क्रीडा स्पर्धा बक्षीस वितरण समारंभ

दि. २३ डिसेंबर २०२४ रोजी वार्षिक शालेय क्रीडा स्पर्धांचा बक्षीस वितरण समारंभ शाळेच्या सभागृहामध्ये संपन्न झाला. या कार्यक्रमास अतिथी म्हणून पालक प्रतिनिधींना बोलावण्यात आले होते. शालेय क्रीडा स्पर्धामधील बक्षीसपात्र विद्यार्थ्यांना पालक प्रतिनिधींच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले. याप्रसंगी मुख्याध्यापिका श्रीमती मनीषा मुळीक, शिक्षकवृंद आणि विद्यार्थी उपस्थित होते. श्रीमती मनीषा मुळीक यांनी ज्या हाऊसच्या विद्यार्थ्यांनी सर्वात जास्त पदके प्राप्त केली, त्यांचे व इतर बक्षिसपात्र विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती राखी लोणकर व आभार श्रीमती स्मिता राऊत यांनी करून कार्यक्रमाचा समारोप केला.

### कराटे स्पर्धा

* ओम समर्थ भारत व्यायाम मंदिर, माहिम यांच्यातर्फे खुल्या राज्यस्तरीय काता कराटे स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत विद्यार्थी कु. सोहम संतोष चौधरी यांने काता या कराटे प्रकारात १० वर्षे वयोगटात सुवर्णपदक पटकावले.

* दि. २९ डिसेंबर २०२४ रोजी एनपीओ जपान कराटे डू कैबुकाई इंडिया फेडरेशन यांच्यातर्फे आयोजित

करण्यात आलेल्या खुल्या कैबुकाई कप कराटे चॅम्पियनशिप स्पर्धेमध्ये कु. नेहा अशोक शिरसाट या विद्यार्थिनीने काता व कुमिते या कराटे प्रकारात ९ वर्षे वयोगटात रौप्यपदक प्राप्त केले. कु. स्वरा नितीन घुले या विद्यार्थिनीने कांस्यपदक पटकावले.

## विद्याभवन माध्यमिक इंग्रजी

**संचालक : श्री. दिनेश मिसाळ**

**पर्यवेक्षक : श्रीमती श्रीजा नायर**

### सेवापूर्ती समारंभ

दि. २९ नोव्हेंबर २०२४ रोजी सहशिक्षिका श्रीमती सायराबानू टोले यांचा सेवापूर्ती समारंभ संपन्न झाला. याप्रसंगी कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे, अनुसंधान समिती सदस्य श्री. कृ. ना. शिरकांडे, कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ, श्रीमती सायराबानू टोले व त्यांचे आप्तेष्ट, सर्व विभागांचे मुख्याध्यापक, मुख्याध्यापिका, पर्यवेक्षक, समन्वयक आणि शिक्षकवृंद उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरूवात सरस्वती व गणेश पूजनाने करण्यात आली. संस्थेच्या वतीने श्रीमती सायराबानू टोले यांना शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ, पुस्तक, सन्मानचिन्ह व भेटवस्तू देऊन सत्कार करण्यात आला. तसेच प्रत्येक विभागाकडून श्रीमती सायरा टोले यांना भेटवस्तू देऊन शुभेच्छा देण्यात आल्या. याप्रसंगी बोलताना कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे व कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ यांनी श्रीमती सायराबानू टोले यांचे उत्तम नियोजन, वक्तशीरपणा, कर्तव्यतत्परता या गुणांचे कौतुक केले. तसेच त्यांना उत्तम आरोग्य व दीर्घायुष्याबद्दल शुभेच्छा दिल्या.

### वार्षिक सहल

दि. ११ डिसेंबर २०२४ रोजी वार्षिक सहल मोंटेरिया व्हिलेज येथे आयोजित केली होती. या सहलीत एकूण २५७ विद्यार्थी, शिक्षकवृंद व शिक्षकेतर कर्मचारी यांनी सहभाग घेतला होता. याठिकाणी विद्यार्थ्यांनी लगोरी, विटीदांडू, भोवरा फिरविणे यासारखे खेळ खेळले, ग्रामीण भागाची ओळख करून देणारे कुंभारकाम, सुतारकाम, लोहारकाम पाहिले, तसेच मातीपासून माठ बनविणे, विहिरीतून पाणी काढणे यासारखी प्रात्यक्षिके केली. बायोगॅस निर्मिती व गांडूळखत प्रकल्प याचे जवळून निरीक्षण केले. माहिती समजून घेतली. विद्यार्थ्यांनी पाण्यात पोहण्याचा मनमुराद आस्वाद घेतला तसेच विविध झोके व राईड्सचा मनसोक्त आनंद लुटला.

### वार्षिक क्रीडा स्पर्धा बक्षीस वितरण समारंभ

दि. १७ डिसेंबर २०२४ रोजी वार्षिक क्रीडा स्पर्धा बक्षीस वितरण समारंभ मोठ्या उत्साहात संपन्न झाला. प्रमुख अतिथी आंतरराष्ट्रीय जलतरणपटू श्री. शुभम वनमाळी व विशेष अतिथी नवी मुंबई महानगरपालिका क्रीडा अधिकारी श्री. रेवप्पा गुरव यांच्या शुभहस्ते दीप प्रज्वलन करण्यात आले. याप्रसंगी बोलताना श्री. शुभम वनमाळी यांनी विद्यार्थ्यांना त्यांच्या जीवनातील काही अनुभव, प्रसंग सांगितले. खेळामुळे व्यक्तिमत्त्व विकास होतो. मेहनतीने, प्रयत्नाने यश नक्कीच संपादन करता येते असे मार्गदर्शन केले. श्री. रेवप्पा गुरव यांनी 'खेळात सातत्य ठेवा, संघर्ष करा, लढत रहा तरच जीवनात यशस्वी व्हाल', असे सांगितले. कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ यांनी 'विद्यार्थ्यांनी अपयश आले तरी न डगमगता प्रयत्नाने ध्येय गाठावे' असे मोलाचे मार्गदर्शन केले. मान्यवरांच्या हस्ते अनमोल क्रीडा रत्न पुरस्कार २०२४-२५ देऊन विजेत्यांना गौरविण्यात आले. तसेच वार्षिक क्रीडा स्पर्धेतील यशस्वी विद्यार्थ्यांना मेडल व प्रशस्तिपत्रक देऊन सन्मानित करण्यात आले. मुख्याध्यापिका श्रीमती श्रीजा नायर, मुख्याध्यापक श्री. जी. आर. कदम, समन्वयक श्री. पांडुरंग मुळीक, शिक्षकवृंद व विद्यार्थी याप्रसंगी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन श्री. मनोज मयेकर यांनी केले.

### आंतरशालेय बुद्धिबळ स्पर्धेतील सुयश

दि. १९ डिसेंबर २०२४ रोजी पुणे विद्यार्थी गृह माजी विद्यार्थी मंडळ, मुंबई विभाग आयोजित कै. मारुती लक्ष्मण मराठे स्मृति आंतरशालेय बुद्धिबळ

स्पर्धा विद्याभवन, घाटकोपर येथे घेण्यात आली होती. सदर स्पर्धेत विविध शाळांचे १५५ विद्यार्थी सहभागी झाले होते. यामध्ये माध्यमिक इंग्रजी विभागाच्या पुढील विद्यार्थ्यांनी यश संपादन केले.

| विद्यार्थ्यांची नावे | गट | इयत्ता | क्रमांक |
|---|---|---|---|
| कु. गार्गी गोळे | ज्युनिअर | ७ वी | द्वितीय |
| कु. प्रणाली कांबळे | ज्युनिअर | ७ वी | तृतीय |

### होमी भाभा बाल वैज्ञानिक स्पर्धा

ग्रेटर बॉम्बे सायन्स टीचर्स असोसिएशन तर्फे आयोजित होमी भाभा बालवैज्ञानिक परीक्षा, २०२४ मध्ये घेण्यात आली. सदर परीक्षेमध्ये ४ विद्यार्थ्यांची प्रात्यक्षिक परीक्षेसाठी निवड झाली. निवड झालेल्या विद्यार्थ्यांची नावे पुढीलप्रमाणे

| विद्यार्थ्यांची नावे | इयत्ता |
|---|---|
| कु. श्रिया धांद्रुत | ६ वी |
| कु. मिहीर मिरजे | ६ वी |
| कु. आर्या नाक्ती | ९ वी |
| कु. तन्मय लकुम | ९ वी |

### क्रीडा स्पर्धेतील सुयश

नवी मुंबई महानगरपालिका जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय यांच्या मार्फत विविध क्रीडा स्पर्धाचे आयोजन केले होते. सदर स्पर्धांमध्ये माध्यमिक इंग्रजी विभागातील पुढील विद्यार्थ्यांनी सुयश संपादन केले.

| विद्यार्थ्यांची नावे | इयत्ता | स्पर्धा | प्राप्त पदक / क्रमांक |
|---|---|---|---|
| कु. सर्वेश भेके | १० वी | कॅरम | पाचवा |
| कु. साक्षी पात्रा | ९ वी | कॅरम | प्रथम |
| कु. मयुरेश मांजरेकर | १० वी | वेटलिफ्टिंग | सुवर्ण |
| कु. आर्या सिंग | १० वी | वेटलिफ्टिंग | सुवर्ण |
| कु. ऋतिका कदम | ९ वी | वेटलिफ्टिंग | सुवर्ण |
| कु. श्रेया मांदाडकर | १० वी | वेटलिफ्टिंग | सुवर्ण |
| कु. सुमन ठाकूर | ९ वी | वेटलिफ्टिंग | सुवर्ण |
| कु. रिया चौरसिया | ९ वी | वेटलिफ्टिंग | सुवर्ण |
| कु. विधी चाळके | ९ वी | वेटलिफ्टिंग | सुवर्ण |
| कु. यशकुमार सिंग | ९ वी | वेटलिफ्टिंग | सुवर्ण |

### सांघिक स्पर्धा

| स्पर्धेचे नाव | वयोगट | मुले/ मुली | पदक |
|---|---|---|---|
| सेपक टक्रॉ | १९ वर्षाखालील | मुली | उपविजेते |
| डॉजबॉल | १७ वर्षाखालील | मुले | विजेते |
| डॉजबॉल | १९ वर्षाखालील | मुले | उपविजेते |
| व्हॉलीबॉल | १७ वर्षाखालील | मुले | विजेते |
| शुटिंगबॉल | १७ वर्षाखालील | मुली | विजेते |
| बॅडमिंटन | १७ वर्षाखालील | मुले | विजेते |
| बॅडमिंटन | १७ वर्षाखालील | मुली | उपविजेते |
| बॅडमिंटन | १४ वर्षाखालील | मुली | उपविजेते |
| बॅडमिंटन | १४ वर्षाखालील | मुले | उपविजेते |
| आट्यापाट्या | १४ वर्षाखालील | मुली | विजेते |
| आट्यापाट्या | १४ वर्षाखालील | मुले | उपविजेते |
| आट्यापाट्या | १७ वर्षाखालील | मुले | उपविजेते |
| आट्यापाट्या | १७ वर्षाखालील | मुली | उपविजेते |

### क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती

दि. ३ जानेवारी २०२४ रोजी विद्याभवन संकुलामध्ये क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमास मुख्याध्यापक श्री. गोरख कदम, मुख्याध्यापिका श्रीमती श्रीजा नायर, शिक्षकवृंद व विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरूवात मुख्याध्यापक श्री. गोरख कदम यांच्या हस्ते सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. सहा. शिक्षिका श्रीमती मनीषा मुळे यांनी सावित्रीबाई फुले यांचा जीवनपट सांगितला. त्याचबरोबर विद्यार्थ्यांनीही त्यांच्या भाषणातून सावित्रीबाईंविषयी माहिती सांगितली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती कल्पना सोनार तर आभार प्रदर्शन श्री. जगन्नाथ कोळी यांनी केले.

# विद्याभवन प्राथमिक मराठी शाळा

## नेरूळ शाखा, नवी मुंबई

**कुलसचिव : श्री. दिनेश मिसाळ**
**मुख्याध्यापिका : सौ. सुवर्णा दिनेश मिसाळ**

### अभिनंदनीय

* रामकृष्ण मठ आयोजित विवेकोत्सव या कार्यक्रमांतर्गत स्वामी विवेकानंद यांच्या जीवनावर आधारित आंतरशालेय वक्तृत्व स्पर्धा दि. ७ डिसेंबर २०२४ रोजी लो. टिळक इंजिनियरींग कॉलेज, कोपरखैरणे येथे संपन्न झाली. या स्पर्धेत कु. उल्का राजेश झगडे, इ. ६वी या विद्यार्थिनीने प्रथम क्रमांक प्राप्त केला. या स्पर्धेची अंतिम फेरी दि. २१ डिसेंबर २०२४ रोजी रामकृष्ण मठ, खार येथे घेण्यात आली. कु. उल्का झगडे या विद्यार्थिनीने 'नरेंद्रचे अनौपचारिक शिक्षण' या विषयावर भाषण सादर केले. या स्पर्धेत मुंबई, नवी मुंबई या विभागातील निवडलेल्या सर्वोत्कृष्ट ३० विद्यार्थ्यांमधून कु. उल्का हिने प्रथम क्रमांक मिळवून चॅम्पियन्स् ट्रॉफी पटकावली.

* विद्यार्थ्यांच्या जिज्ञासा व संशोधक वृत्तीला चालना देण्यासाठी ग्रेटर बॉम्बे सायन्स टीचर्स असोसिएशनद्वारे घेण्यात आलेल्या होमी भाभा बालवैज्ञानिक स्पर्धेत (२०२४) इ. सहावीतील विद्यार्थी कु. श्रेया विकास नरवडे, कु. नंदिनी अजित शिंदे, कु. ओंकार दिलिप शिंदे उत्तीर्ण झाले.

### आरोग्यविषयक व्याख्यान

दि. १६.१२.२०२४ रोजी रोट्रॅक्ट क्लब ऑफ मेडिक्रू यांच्यातर्फे विद्याभवन शालेय सभागृहात शरीरात लोहाची कमतरता या मार्गदर्शनपर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. वैद्यकीय महाविद्यालयातून आलेल्या या भावी डॉक्टरांनी समतोल आहाराविषयी मार्गदर्शन केले. शरीरात लोहाची कमतरता म्हणजे रक्ताची कमतरता होऊ नये म्हणून सकस व पौष्टिक आहार घेतला पाहिजे. यासाठी पालेभाज्या, फळे व मांसाहारी पदार्थांचा समावेश आहारात करावा. लोहाची कमतरता कशी ओळखावी? याबद्दल तसेच त्याची लक्षणे सविस्तर सांगितली. सर्व प्रकारच्या जीवनसत्वांविषयी माहिती सांगितली. जीवनसत्त्वांचे आहारातील महत्त्व पटवून देत लोहयुक्त गोळ्यांचे वाटप करण्यात आले. श्रीमती नूतन गवांदे यांनी वैद्यकीय टीमचे आभार मानले.

सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे आणि त्यांच्या मार्गदर्शक शिक्षकांचे संस्थेच्या वतीने हार्दिक अभिनंदन आणि पुढील वाटचालीस शुभेच्छा !

### स्काऊट गाईड शिबिर

दि. २१ डिसेंबर २०२४ रोजी इ. ७ वीच्या विद्यार्थ्यांचे स्काऊट गाईड एक दिवसीय शिबिर शाळेतच भरविण्यात आले. मुख्याध्यपिका श्रीमती सुवर्णा मिसाळ, स्काऊट आणि गाईडचे कॅप्टन श्रीमती सुलेखा खराडे, श्रीमती नूतन गवांदे यांच्या हस्ते ध्वजारोहण करून शिबिराचा शुभारंभ झाला. विद्यार्थ्यांनी सर्वधर्म प्रार्थना गायल्यानंतर परिपाठ सादर केला. विद्यार्थ्यांना तंबू उभारण्यासाठी वेळ देण्यात आला. विद्यार्थ्यांच्या प्रत्येक गटाने तंबू बांधणीचे, तंबू सजावटीचे कार्य उत्तम केले. नैसर्गिक साहित्य वापरुन पर्यावरणपूरक तंबू विद्यार्थ्यांनी उभारले. अल्पोपहारानंतर विद्यार्थ्यांचे विविध क्रीडाप्रकार घेण्यात आले. शाळेची माजी विद्यार्थिनी कु. अश्विनी हुंडारे हिने विद्यार्थ्यांना स्वसंरक्षणाचे, कराटेचे धडे दिले. प्रात्यक्षिकांसह स्वसंरक्षण कसे करावे याविषयी उत्तम मार्गदर्शन केले. शेकोटीचा कार्यक्रम घेण्यात आला. शेकोटी भोवती फेर धरत विद्यार्थ्यांनी नाचगाण्याचा मनसोक्त आनंद लुटला. विद्यार्थ्यांच्या विविध गटांचे नृत्याविष्कार सादर करण्यात आले. विद्यार्थ्यांनी सहभोजनाचा आस्वाद घेतला. शिबिरातील विविध स्पर्धांमधील विजेत्या गटांना व विद्यार्थ्यांना पारितोषिके देऊन गौरविण्यात आले. दुसऱ्या दिवशी सकाळी विद्यार्थ्यांनी शारीरिक व मानसिक आरोग्यासाठी झुंबा, योगासने, खेळ इ.

प्रात्यक्षिके सादर केली. या शिबिरास प्राथमिक इंग्रजी विभागाचे शिक्षक व मुख्याध्यापिका श्रीमती मनीषा मुळीक उपस्थित होत्या. घाटकोपर विद्याभवन शाखेतील शिक्षक श्री. दीपक निचित यांनीही शिबिराला भेट दिली. विद्यार्थ्यांशी संवाद साधताना मुलांनी प्रसार माध्यमांपासून दूर राहा. अभ्यास करा. कोणत्याही कामात सातत्य ठेवा. परिश्रम करा. शारीरिक व मानसिक आरोग्य जपा असे सांगून विद्यार्थ्यांच्या उपक्रमांचे कौतुक केले. विद्यार्थ्यांना अल्पोपहार देऊन शिबिराची सांगता झाली.

**शिष्यवृत्ती परीक्षेसाठी मार्गदर्शन व्याख्याने**

पूर्व-उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेच्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी तज्ज्ञ मार्गदर्शकांची व्याख्याने शाळेत आयोजित करण्यात आली. दि. १६ डिसेंबर २०२४ रोजी बुद्धिमत्ता विषय तज्ज्ञ श्री. राजाराम पवार यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले. तसेच विद्यार्थ्यांच्या शंकांचे निरसन करण्यात आले. उदाहरणे सोप्या पद्धतीने कशी सोडवावी, त्यावरच्या युक्त्या, सूत्रे, उदाहरणे सोडविताना करण्यात येणारे रफ काम हे सर्व सोप्या शब्दात विद्यार्थ्यांना समजावून सांगितले. दि. १९ डिसेंबर २०२४ रोजी गणित विषय तज्ज्ञ श्री. शरद दळवी यांचे मार्गदर्शनपर व्याख्यान झाले. गणितातील विविध सूत्रे शैक्षणिक साधनांद्वारे समजावून दिली. वर्ग, वर्गमूळ, घन, क्षेत्रफळ यांची सूत्रे व उदाहरणे सोप्या शब्दात स्पष्ट केली. पेपर सोडविताना वेळेचे नियोजन कसे करावे, याविषयी मार्गदर्शन केले. उदाहरणे सोडविण्याच्या खास टिप्स विद्यार्थ्यांना सांगितल्या. दि. २० डिसेंबर २०२४ रोजी घाटकोपर शाखेचे माजी शिक्षक श्री. सुरेश हातणकर यांनी गणित या विषयाचे मार्गदर्शन केले. उदाहरणे अचूक व योग्य पद्धतीने कशी सोडवावी, पेपर कसा सोडवावा, उदाहरणे सोडविण्याच्या सोप्या युक्त्या व वेळेचे नियोजन याविषयी मार्गदर्शन केले. त्यांनी विद्यार्थ्यांच्या शंकांचे निरसन केले व परीक्षेसाठी शुभेच्छा दिल्या.

## विद्याभवन पूर्व प्राथमिक इंग्रजी व सेमी इंग्रजी शाळा
## नेरूळ शाखा, नवी मुंबई

**कुलसचिव : श्री. दिनेश मिसाळ**
**पर्यवेक्षिका : सौ. अस्मिता सलगर**

**चित्रकला स्पर्धा**

दि. १ डिसेंबर २०२४ रोजी नवनीत तर्फे आयोजित करण्यात आलेल्या मास्टर स्ट्रोक चित्रकला स्पर्धेत विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. सुयश प्राप्त विद्यार्थ्यांची नावे पुढील प्रमाणे आहेत.

| विद्यार्थ्यांचे नाव | इयत्ता | क्रमांक |
|---|---|---|
| कु. आराध्या संतोष लवटे | ज्यु. के. जी/अ | प्रथम |
| कु. युवेन अमोल पाटील | सि. के. जी/अ | द्वितीय |
| कु. रचना उमेश गौडा | ज्यु. के. जी/ब | तृतीय |

**वार्षिक सहल**

दि. २० डिसेंबर २०२४ रोजी शैक्षणिक सहल नेरुळ येथील वंडर्स पार्क यथे आयोजित करण्यात आली होती. विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरचा आनंद अवर्णनीय होता. सर्व विद्यार्थी व शिक्षिका गाणे गात गात पार्क मध्ये पोहचले. विद्यार्थ्यांना सर्व पार्क दाखविण्यात आला, तसेच तिथे असलेल्या वंडर्स बद्दल माहिती देण्यात आली. त्यानंतर घसरगुंडी व झोक्यांवर बसून विद्यार्थ्यांनी खूप मौजमजा केली. टॉयट्रेन मध्ये बसल्यावर तर त्यांच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहत होता. शिक्षिकांसोबतच मुख्याध्यापिका, पर्यवेक्षिका, शिक्षकेतर कर्मचारी सहलीमध्ये सहभागी झाले होते. अतिशय आनंदी वातावरणात विद्यार्थ्यांना घेऊन बसेस शाळेत परतल्या. त्यानंतर सर्व विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप करण्यात आले.

**आंतरशालेय नृत्य स्पर्धा**

दि. २८ डिसेंबर २०२४ रोजी सांस्कृतिक कलादर्पण, ठाणे यांच्यावतीने शिक्षकांसाठी आंतरशालेय नाट्य व लोकनृत्य स्पर्धेचे आयोजन

करण्यात आले होते. या स्पर्धेत ठाणे, नवी मुंबई, दादर, डोंबिवली, मुलुंड, चारकोप, बांद्रा, माहीम इ. शाळेतील शिक्षकांनी सहभाग नोंदविला होता. विद्याभवन पूर्व-प्राथमिक इंग्रजी विभागाच्या शिक्षिका या स्पर्धेत सहभागी झाल्या होत्या. अतिशय सुंदर असे लोकनृत्य सादर करून त्यांनी द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक पटकाविले. पारितोषिक प्राप्त सर्व शिक्षकांचे संस्थेतर्फे हार्दिक अभिनंदन!

**क्रीडा पारितोषिक वितरण सोहळा**

दि. ३ जानेवारी २०२५ रोजी वार्षिक क्रीडा पारितोषिक वितरण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ, मुख्याध्यापिका श्रीमती श्रीजा नायर, मुख्याध्यापक गोरख कदम, पर्यवेक्षिका श्रीमती अस्मिता सलगर, समन्वयक श्री. पांडुरंग मुळीक उपस्थित होते. दीप प्रज्वलन व गणेशपूजनाने कार्यक्रमाची सुरूवात झाली. दि. ३ जानेवारी २०२५ ही क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती. यानिमित्ताने कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ यांनी सावित्रीबाईंच्या स्मृतीला उजाळा देत शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही, सर्वांनी शिक्षण घेतलेच पाहिजे असा मोलाचा सल्लाही यावेळी दिला. त्यानंतर पारितोषिक प्राप्त विद्यार्थ्यांचा पदक व प्रशस्तीपत्र देऊन गुणगौरव करण्यात आला. या कार्यक्रमासाठी सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, पालक व विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती साधना उंडे यांनी केले. वंदेमातरम्ने कार्यक्रमाची सांगता झाली.

**वार्षिक सहल**

दि. १४.१२.२०२४ रोजी पूर्व-प्राथमिक सेमी इंग्रजी विभागाची वार्षिक सहल वंडर्स पार्क, नेरुळ येथे नेण्यात आली होती. सहलीच्या ठिकाणी विद्यार्थ्यांनी तेथील राईड्सवर खेळण्याचा मनमुराद आनंद घेतला. बाह्य परीसरातील विविध वस्तू व ठिकाणे दाखवून मुलांना त्यांची माहिती सांगण्यात आली.

***


## संस्थेस देणगी पाठविण्यासंबंधीची माहिती

**या देणगीवर आयकर खात्याच्या कलम ८० जी नुसार आयकरात ५०% सवलत मिळते.**

**The details of our bank account are as follows :**

| | | |
|---|---|---|
| Bank A/c Name | : | **Pune Vidyarthi Griha** |
| Bank Name | : | **Bank of Baroda** |
| Branch | : | **Sadashiv Peth, Pune 411030** |
| Saving A/c No. | : | **04500100009842** |
| RTGS/NEFT/ IFSC CODE | : | **BARB0SADASH**<br>**The fifth character is numeric 'zero'.** |
| Swift Code | : | **BARBIN BBPCB** |
| MICR Code | : | **411012009** |

**बँकेमध्ये देणगी पाठविल्यानंतर रकमेव्यतिरिक्त नाव, पत्ता असा कोणताही संदर्भ संस्थेस प्राप्त होत नाही त्यामुळे कृपया आपण वरील खात्यावर देणगी पाठविल्यानंतर खालील फोन नं. वर किंवा ई मेलवर सविस्तर माहितीसाठी संपर्क करून कळवावे. फोन नं. - ०२० २४४७०९२७, २४४७०५७३ ई मेल :** pvgheadoffice@gmail.com

## ※ विद्याभवन हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, नेरूळ शाखा, नवी मुंबई ※



वार्षिक क्रीडा महोत्सव बक्षीस वितरण समारंभ प्रसंगी बक्षिसांचे वितरण करताना विशेष अतिथी नवी मुंबई महानगरपालिकचे क्रीडा अधिकारी श्री. रेवप्पा गुरव, प्रमुख अतिथी आंतरराष्ट्रीय जलतरणपटू श्री. शुभम वनमाळी, कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ व समन्वयक श्री. पांडुरंग मुळीक



ग्रेटर बॉम्बे सायन्स टिचर्स असोसिएशन तर्फे आयोजित डॉ. होमी भाभा बालवैज्ञानिक स्पर्धा २०२४ मध्ये प्रात्यक्षिक परीक्षेसाठी निवड झालेल्या विद्यार्थ्यांसमवेत कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ, मुख्याध्यापिका श्रीमती श्रीजा नायर, मुख्याध्यापक श्री. गोरख कदम व मार्गदर्शक शिक्षकवृंद



नवनीत चित्रकला स्पर्धेतील पूर्व-प्राथमिक विभागातील यशस्वी विद्यार्थ्यांसमवेत कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ, मुख्याध्यापिका श्रीमती श्रीजा नायर व शिक्षिका



चिन्मय मिशन गीतापठण स्पर्धेतील विजेते विद्यार्थ्यांसमवेत कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ, श्रीमती श्रीजा नायर व श्रीमती मनीषा मुळीक

## * विद्याभवन हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, नेरूळ शाखा, नवी मुंबई *



नेल्टास स्पर्धेतील यशस्वी विद्यार्थ्यांसमवेत कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ, मुख्याध्यापिका श्रीमती मनीषा मुळीक व मुख्याध्यापक श्री. गोरख कदम



कराटे स्पर्धेतील यशस्वी विद्यार्थ्यांसमवेत कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ, मुख्याध्यापिका श्रीमती मनीषा मुळीक मुख्याध्यापक श्री. गोरख कदम व शिक्षक श्री. अविनाश कुलकर्णी



सेवा पूर्ती समारंभात श्रीमती सायराबानू टोले यांचा सत्कार करताना कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे, समवेत कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ, मुख्याध्यापक श्री. गोरख कदम, समन्वयक श्री. पांडुरंग मुळीक व मुख्याध्यापिका श्रीमती मनीषा मुळीक

# हितचिंतक व आश्रयदाते यांच्या मदतीचे वृत्त, पुणे विभाग

**कोषाध्यक्ष – श्री. कृष्णाजी कुलकर्णी**

**दि. १.१२.२०२४ ते ३१.१२.२०२४**

**पुढील देणगीदारांनी संस्थेला देणगी देऊन सक्रिय सहाय्य केलेले आहे.**
**संस्थेविषयी दर्शवित असलेल्या आत्मीयतेबद्दल आम्ही सर्वांचे आभारी आहोत.**
**(देणगी व्याजाचा विनियोग देणगी प्राप्त झाल्यानंतर पुढील वर्षापासून १५ वर्षांपर्यंत केला जातो.)**

देणगी रु. १०,००१/- वरील सर्व

●**नाव** - **श्री. आनंद अशोक धर्माधिकारी, द्वारा श्री. अशोक विश्वनाथ धर्माधिकारी नाशिक**


चंद्रकांत कुलकर्णी

**देणगी** - रु. १,००,०००/-
**दिनांक** - २५.१२.२०२४
**निमित्त** - कै. चंद्रकांत शंकर कुलकर्णी यांचे स्मृतिदिनानिमित्त (१२ जानेवारी)
**विनियोग** - देणगी व्याजाचा विनियोग (३६५ दिवस भोजन व्यवस्था निधी) अन्नदान

●**नाव** - **श्री. केतन पावा, पुणे**
**देणगी** - रु. ४२,०००/-
**दिनांक** - ३१.१२.२०२४
**निमित्त** - अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालय मेकॅनिकल इंजिनिअरिंग टीम प्रोजेक्ट
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग शैक्षणिक मदत

●**नाव** - **राष्ट्रतेज मंच, पुणे**
**देणगी** - रु. २५,०००/-
**दिनांक** - ९.१२.२०२४
**निमित्त** - सदिच्छा देणगी
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग शैक्षणिक मदत

●**नाव** - **श्री. संजीव भास्कर दाते, भोपाळ**


सुनंदा भास्कर दाते


भास्कर मुरलीधर दाते


सौरभ संजीव दाते

**देणगी** - रु. २५,०००/-
**दिनांक** - ५.१२.२०२४
**निमित्त** - कै. सुनंदा भास्कर दाते (रु.१०,०००/-) कै. भास्कर मुरलीधर दाते (रु.१०,०००-) आणि कै. सौरभ संजीव दाते (रु. ५,०००) यांचे स्मृतिदिनानिमित्त
**विनियोग** - पूर्वीच्या देणगीमध्ये समाविष्ट करून येणाऱ्या व्याजाचा विनियोग शिष्यवृत्ती पारितोषिक


भास्कर यादव

●**नाव** - **श्री. अर्णव वज्रदेही यादव, पुणे**
**देणगी** - रु. १५,०००/-
**दिनांक** - ५.१२.२०२४
**निमित्त** - कै. भास्कर एकनाथ यादव (मा. वि.) यांचे स्मृतिदिनानिमित्त (१२ डिसेंबर)
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान

**●नाव - श्री. आनंद वसंत देशपांडे, पुणे**
**देणगी** - रु. १५,०००/-
**दिनांक** - २०.१२.२०२४
**निमित्त** - सदिच्छा देणगी
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग संस्थावाढीसाठी

**●नाव - श्री. सतिश वसंत ठोंबरे, पुणे**
**देणगी** - रु. १३,५००/-
**दिनांक** - २.१२.२०२४
**निमित्त** - साईबाबांच्या पूजेनिमित्त
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग मिष्टान्नासह संपूर्ण भोजन

**●नाव - श्री. यशवंत एस. कुलकर्णी, पुणे**
**देणगी** - रु. १२,०००/-
**दिनांक** - १५.१२.२०२४
**निमित्त** - श्री दत्तजयंतीनिमित्त
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग मिष्टान्नासह संपूर्ण भोजन देण्यासाठी

**●नाव - सौ. मयुरी नवरे, पुणे**
**देणगी** - रु. १२,०००/-
**दिनांक** - १९.१२.२०२४
**निमित्त** - सदिच्छा देणगी
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग मिष्टान्नासह संपूर्ण भोजन

**●नाव - डॉ. संजय पांडुरंग भार्गवे, पुणे**
**देणगी** - रु. ११,०००/-
**दिनांक** - २१.१२.२०२४
**निमित्त** - कै. रामचंद्र गोविंद भार्गवे व कै. मंगला रामचंद्र भार्गवे यांचे स्मृतिदिनानिमित्त (मार्गशीर्ष वद्य १२)
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग मिष्टान्नासह संपूर्ण भोजन देण्यासाठी

**●नाव - श्री. मिलिंद एम. अमृतकर, युएसए**
**देणगी** - रु. ११,०००/-
**दिनांक** - २४.१२.२०२४



मधुकर अमृतकर व सुलभा अमृतकर

**निमित्त** - कै. मधुकर शंकर अमृतकर (फाल्गुन वद्य २) कै. सुलभा मधुकर अमृतकर (माघ शुध्द १०) यांचे स्मृतिदिनानिमित्त
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान

**देणगी रु. ५,००१/- ते रु. १०,०००/-**

**●नाव - श्री. जयंत नारायण अंबीकर, गोवा**
**देणगी** - रु. ५,१२५/-
**दिनांक** - ४.१२.२०२४
**निमित्त** - कै. नारायण रामचंद्र अंबीकर यांचे स्मृतिदिनानिमित्त
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग संस्थावाढीसाठी



गजानन रंगनाथ संत

**●नाव - ॲड. ज्ञानराज गजानन संत, पुणे**
**देणगी** - रु. ७,००१/-
**दिनांक** - १०.१२.२०२४
**निमित्त** - कै. गजानन रंगनाथ संत यांचे जयंतीनिमित्त (११ डिसेंबर)
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग दोन्हीवेळेस मिष्टान्न भोजन

●नाव - श्री. हर्षद हेमंत जोशी, पुणे
देणगी - रु. १०,०००/-
दिनांक - १३.१२.२०२४
निमित्त - कै. हेमंत श्रीधर जोशी यांचे स्मृतिदिनानिमित्त (२० एप्रिल)
विनियोग - देणगी व्याजाचा विनियोग अन्नदान


संजय कुलकर्णी

●नाव - श्रीमती जयश्री संजय कुलकर्णी, पुणे
देणगी - रु. १०,०००/-
दिनांक - १३.१२.२०२४
निमित्त - कै. संजय सीताराम कुलकर्णी यांचे स्मृतिदिनानिमित्त (मार्गशीर्ष शुध्द १०)
विनियोग - देणगी व्याजाचा विनियोग अन्नदान

●नाव - सौ. रजनी रमेश गाडगीळ, पुणे
देणगी - रु. १०,०००/-
दिनांक - १४.१२.२०२४
निमित्त - कै. कु. पिंकी रमेश गाडगीळ यांचे जयंतीनिमित्त (मार्गशीर्ष शुध्द १४)
विनियोग - देणगी व्याजाचा विनियोग अन्नदान


अनिकेत जाधव

●नाव - श्रीमती हेमा हनुमंत जाधव, पुणे
देणगी - रु. १०,०००/-
दिनांक - १७.१२.२०२४
निमित्त - कै. अनिकेत हनुमंत जाधव यांचे स्मृतिदिनानिमित्त (१६ डिसेंबर)
विनियोग - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान


गोंदवलेकर महाराज

● नाव - सौ. सुवर्णा प्रकाश जोशी, पुणे
देणगी - रु. ५,००१/-
दिनांक - २४.१२.२०२४
निमित्त - ब्रह्मचैतन्य श्री गोंदवलेकर महाराज पुण्यस्मरणार्थ (मार्गशिर्ष वद्य १०)
विनियोग - देणगी पूर्वीच्या देणगीमध्ये समाविष्ट करून येणाऱ्या व्याजाचा विनियोग मिष्टान्न भोजन

●नाव - श्री. मंदार देशपांडे, पुणे
देणगी - रु. १०,०००/-
दिनांक - ३१.१२.२०२४
निमित्त - सदिच्छा देणगी
विनियोग - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालय मेकॅनिकल इंजिनिअरिंग टीम प्रोजेक्ट

**देणगी रु. ४,००१/- ते रु. ५,०००/-**

●नाव - मा. विश्वस्त हरी मालिनी जोशी ट्रस्ट, सातारा
देणगी - रु. ५,०००/-
दिनांक - ७.१२.२०२४
निमित्त - कै.हरी केशव जोशी यांचे जयंतीनिमित्त
विनियोग - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान


मधुकर दामले

●नाव - श्रीमती माधुरी मधुकर दामले पुणे
देणगी - रु. ५,०००/-
दिनांक - ९.१२.२०२४
निमित्त - कै. मधुकर नारायण दामले यांचे स्मृतिदिनानिमित्त (मार्गशीर्ष शुध्द ११)
विनियोग - देणगी व्याजाचा विनियोग अन्नदान

●नाव - श्रीमती रोहिणी रघुनाथ उमराणी, पुणे
देणगी - रु. ५,०००/-
दिनांक - १३.१२.२०२४
निमित्त - कै. रघुनाथ गजानन उमराणी यांचे स्मृतिदिनानिमित्त (२२ डिसेंबर)
विनियोग - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान


नारायण ओक

●नाव - श्री. सुरेश नारायण ओक, पुणे
देणगी - रु. ५,०००/-
दिनांक - १७.१२.२०२४
निमित्त - कै. नारायण व्यंकटेश ओक यांचे स्मृतिदिनानिमित्त (१९ डिसेंबर)
विनियोग - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान

●नाव - श्री. चंद्रशेखर नारायण सोवनी, पुणे
देणगी - रु. ५,०००/-
दिनांक - २०.१२.२०२४
निमित्त - कै. श्रीमती सुमती नारायण सोवनी यांचे स्मृतिदिनानिमित्त (१७ डिसेंबर)
विनियोग - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान


भालचंद्र गुरूजी

●नाव - श्री. अभिजित भालचंद्र गुरूजी, पुणे
देणगी - रु. ५,०००/-
दिनांक - २८.१२.२०२४
निमित्त - कै. भालचंद्र गोविंद गुरूजी यांचे स्मृतिदिनानिमित्त (माघ वद्य १)
विनियोग - देणगी व्याजाचा विनियोग अन्नदान

●नाव - श्री. श्रीपाद कुलकर्णी, पुणे
देणगी - रु. ५,०००/-
दिनांक - ३१.१२.२०२४
निमित्त - अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालय, मेकॅनिकल इंजिनिअरिंग टीम प्रोजेक्ट
विनियोग - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग शैक्षणिक मदत

**देणगी रु. २,००१/- ते रु. ३,०००/-**

●नाव - श्रीमती कल्पना भानुदास नवरे, मुंबई
देणगी - रु. ३,०००/-
दिनांक - २.१२.२०२४
निमित्त - कै. भानुदास नवरे व कै. नलिनी नवरे यांचे स्मृतिदिनानिमित्त
विनियोग - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान

●नाव - श्री. प्रशांत रत्नाकर मानकीकर, मुंबई
देणगी - रु. २,७५१/-
दिनांक - ७.१२.२०२४
निमित्त - सदिच्छा देणगी
विनियोग - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान

●नाव - श्री. सुनिल मधुकर परळीकर, ठाणे
देणगी - रु. ३,०००/-
दिनांक - १०.१२.२०२४
निमित्त - कै. मदन मधुकर परळीकर यांचे स्मृतिदिनानिमित्त (११ डिसेंबर)
विनियोग - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान

●नाव - श्री. शरदचंद्र विश्वनाथ राजर्षी, पुणे
देणगी - रु. ३,०००/-
दिनांक - १९.१२.२०२४
निमित्त - कै. विश्वनाथ त्र्यंबक राजर्षी यांचे स्मृतिदिनानिमित्त (७ जानेवारी)
विनियोग - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान

●**नाव** - **श्री. संजय पांडुरंग क्षीरसागर, पुणे**
**देणगी** - रु. २,१००/-
**दिनांक** - २१.१२.२०२४
**निमित्त** - कै. श्रीमती विमल पांडुरंग क्षीरसागर यांचे स्मृतिदिनानिमित्त (मार्गशीर्ष वद्य ६)
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान


गणेश हरी दंडगे

●**नाव** - **सौ. दीपा दिलीप गुमास्ते, पुणे**
**देणगी** - रु. ३,०००/-
**दिनांक** - २८.१२.२०२४
**निमित्त** - कै. गणेश हरी दंडगे (मा. वि.) यांचे स्मृतिदिनानिमित्त (२८ डिसेंबर)
**विनियोग** - देणगी पूर्वीच्या देणगीमध्ये समाविष्ट करून येणाऱ्या व्याजाचा विनियोग अन्नदान

●**नाव** - **श्री. संकेत जोशी, पुणे**
**देणगी** - रु. ३,०००/-
**दिनांक** - ३१.१२.२०२४
**निमित्त** - सदिच्छा देणगी
**विनियोग** - अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालय मेकॅनिकल इंजिनिअरिंग टीम प्रोजेक्टसाठी

**देणगी रु. १,००१/- ते रु. २,०००/-**

●**नाव** - **श्री. शैलेंद्र वसंत गोखले, पुणे**
**देणगी** - रु. २,०००/-
**दिनांक** - ७.१२.२०२४
**निमित्त** - कै. वसुधा वसंत गोखले यांचे स्मृतिदिनानिमित्त (मार्गशीर्ष शुध्द १४)
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग मिष्टान्न

●**नाव** - **श्री. तानाजी रंगनाथ दौंडकर, (मा. वि.), मुंबई**
**देणगी** - रु. १,५०१/-
**दिनांक** - ९.१२.२०२४
**निमित्त** - सदिच्छा देणगी
**विनियोग** - देणगी संपूर्ण विनियोग मिष्टान्न


जयश्री पळसुले

●**नाव** - **कु. शुभा श्रीकृष्ण पळसुले, पुणे**
**देणगी** - रु. १,५०१/-
**दिनांक** - ९.१२.२०२४
**निमित्त** - कै. सौ. जयश्री श्रीकृष्ण पळसुले यांचे स्मृतिदिनानिमित्त (मार्गशीर्ष शुध्द १०)
**विनियोग** - देणगी संपूर्ण विनियोग अन्नदान


विष्णु नाना पन्हाळे

●**नाव** - **श्री. धर्मेंद्र विष्णु पन्हाळे, पुणे**
**देणगी** - रु. २,०००/-
**दिनांक** - ३०.१२.२०२४
**निमित्त** - कै. विष्णु नाना पन्हाळे यांचे स्मृतिदिनानिमित्त (१ जानेवारी)
**विनियोग** - देणगी संपूर्ण विनियोग अन्नदान

**देणगी रु. ५०१/- ते रु. १,०००/-**

●**नाव** - **श्री. माधव नारायणराव रानडे, पुणे**
**देणगी** - रु. १,०००/-
**दिनांक** - ३.१२.२०२४
**निमित्त** - कै. नारायणराव सदाशिव रानडे व कै. लक्ष्मीबाई नारायण रानडे यांचे स्मृतिदिनानिमित्त (७ डिसेंबर)
**विनियोग** - देणगी संपूर्ण विनियोग अन्नदान

●**नाव** - **सौ. अंजली अरूण बोकिल, पुणे**
**देणगी** - रु. १,०००/-
**दिनांक** - ५.१२.२०२४
**निमित्त** - कै. चिंतामण बाळकृष्ण वाळिंबे यांचे स्मृतिदिनानिमित्त (७ डिसेंबर)
**विनियोग** - देणगी संपूर्ण विनियोग अन्नदान


मारूती कुलकर्णी

●**नाव** - **श्री. कृष्णाजी मारूती कुलकर्णी, (मा. वि.), पुणे**
**देणगी** - रु. १,०००/-
**दिनांक** - ५.१२.२०२४
**निमित्त** - कै. मारूती दत्तात्रय कुलकर्णी यांचे स्मृतिदिनानिमित्त (मार्गशिर्ष शुध्द ५)
**विनियोग** - देणगी पूर्वीच्या देणगीमध्ये समाविष्ट करून येणाऱ्या व्याजाचा विनियोग अन्नदान

●**नाव** - **श्री. प्रणव रमेश करमरकर, पुणे**
**देणगी** - रु. ५०१/-
**दिनांक** - ७.१२.२०२४
**निमित्त** - कै. रमेश शंकर करमरकर यांचे स्मृतिदिनानिमित्त
**विनियोग** - देणगी संपूर्ण विनियोग अन्नदान

●**नाव** - **श्री. विजयकुमार प्रल्हादराव कुलकर्णी, (मा. वि.), लातूर**
**देणगी** - रु. ५०५/-
**दिनांक** - ७.१२.२०२४
**निमित्त** - माजीविद्यार्थी ऋणविमोचनार्थ (७ डिसेंबर)
**विनियोग** - देणगी संपूर्ण विनियोग शैक्षणिक मदत

●**नाव** - **श्री. रविंद्र सुरेश सप्तर्षी, मुंबई**
**देणगी** - रु. १,०००/-
**दिनांक** - १८.१२.२०२४
**निमित्त** - कै. वत्सला सुरेश सप्तर्षी (१९ डिसेंबर)
**विनियोग** - देणगी संपूर्ण विनियोग अन्नदान

●**नाव** - **श्री. विष्णु वामन कुलकर्णी, पुणे**
**देणगी** - रु. ५०१/-
**दिनांक** - २७.१२.२०२४
**निमित्त** - कै. भगवान वामन कुलकर्णी (मा. वि.) यांचे जन्मशताब्दीनिमित्त
**विनियोग** - देणगी संपूर्ण विनियोग संस्थावाढीसाठी

**देणगी रु. ५००/- खालील सर्व**

●**नाव** - **श्रीमती मंगला शंकर पित्रे, पुणे**
**देणगी** - रु. ५००/-
**दिनांक** - २.१२.२०२४
**निमित्त** - कै. शंकर जनार्दन पित्रे यांचे स्मृतिदिनानिमित्त
**विनियोग** - देणगी संपूर्ण विनियोग अन्नदान

●**नाव** - **श्रीमती माधुरी मधुकर दामले, पुणे**
**देणगी** - रु. २५०/-
**दिनांक** - ११.१२.२०२४
**निमित्त** - कै. मधुकर नारायण दामले यांचे स्मृतिदिनानिमित्त (मार्गशीर्ष शुध्द ११)
**विनियोग** - देणगी संपूर्ण विनियोग अन्नदान

●**नाव** - **श्री. प्रमोद गोपाळ नातू, पनवेल**
**देणगी** - रु. ५००/-
**दिनांक** - १६.१२.२०२४
**निमित्त** - कै. शोभना गोपाळ नातू यांचे स्मृतिदिनानिमित्त (१५ डिसेंबर)
**विनियोग** - देणगी संपूर्ण विनियोग अन्नदान

●नाव - श्रीमती रेखा विश्वनाथ ठकार, पुणे
देणगी - रु. १५१/-
दिनांक - २१.१२.२०२४
निमित्त - कै. विश्वनाथ गोविंद ठकार यांचे स्मृतिदिनानिमित्त (१४ डिसेंबर)
विनियोग - देणगी संपूर्ण विनियोग अन्नदान

●नाव - श्री. प्रकाश एन. कुलकर्णी
देणगी - रु. ५००/-
दिनांक - २७.१२.२०२४
निमित्त - वडिलांचे पुण्यस्मरणार्थ
विनियोग - देणगी संपूर्ण विनियोग संस्थावाढीसाठी

## वाढदिवसानिमित्त देण्यात आलेल्या देणग्या

●नाव - श्री. माधव नारायण डोळे, पुणे
देणगी - रु. १०,०००/-
दिनांक - २५.१२.२०२४
निमित्त - ७५ व्या वाढदिवसानिमित्त (२२ डिसेंबर)
विनियोग - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग संस्थावाढीसाठी


श्री. हणमंत भोसले

●नाव - श्री. हणमंत गणपती भोसले, (मा. वि.), पुणे
देणगी - रु. ५,००१/-
दिनांक - ४.१२.२०२४
निमित्त - वाढदिवसानिमित्त (४ डिसेंबर)
विनियोग - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग संस्थावाढीसाठी

●नाव - श्रीमती श्रीलथा आर. नायर, ठाणे
देणगी - रु. ५,०००/-
दिनांक - ११.१२.२०२४
निमित्त - चि. अनिश नायर यांचे वाढदिवसानिमित्त (१४ डिसेंबर)
विनियोग - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग मिष्टान्न भोजन


श्री. श्रीकृष्ण नातू

●नाव - श्री. श्रीकृष्ण गदाधर नातू, पुणे
देणगी - रु. ३,५००/-
दिनांक - १३.१२.२०२४
निमित्त - वाढदिवसानिमित्त (२९ डिसेंबर)
विनियोग - देणगी संपूर्ण विनियोग अन्नदान

●नाव - श्री. अभिजीत अरूण पाठक, (मा. वि.), पुणे
देणगी - रु. २,१००/-
दिनांक - १६.१२.२०२४
निमित्त - वाढदिवसानिमित्त (१६ डिसेंबर)
विनियोग - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग मिष्टान्न

●नाव - श्री. अरूण विष्णुपंत देशपांडे, कोल्हापूर
देणगी - रु. १,०००/-
दिनांक - १८.१२.२०२४
निमित्त - वाढदिवसानिमित्त (१७ डिसेंबर)
विनियोग - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान

●नाव - श्री. गोविंद भालचंद्र खर्डेकर, पुणे
देणगी - रु. ५०१/-
दिनांक - २४.१२.२०२४
निमित्त - चि. संकेत गोविंद खर्डेकर यांचे वाढदिवसानिमित्त (२४ डिसेंबर)
विनियोग - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान

●**नाव** - **सौ. शारदा मारूती घडशी, पुणे**
**देणगी** - रु. ५००/- **दिनांक**-३१.१२.२०२५
**निमित्त** - वाढदिवसानिमित्त (१ जानेवारी)
**विनियोग** - देणगी पूर्वीच्या देणगी रकमेत समविष्ट करून येणाऱ्या व्याजाचा विनियोग अन्नदान

●**नाव** - **श्री. गणेश साहेबराव चांदगुडे, (मा. वि.), पुणे**
**देणगी** - रु. १०१/- **दिनांक**- १०.१२.२०२४
**निमित्त** - कु. काव्या गणेश चांदगुडे हिचे वाढदिवसानिमित्त (२ जानेवारी)
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान

## हितचिंतक व आश्रयदाते यांच्या मदतीचे वृत्त, तळेगाव (अं) शाखा

**कोषाध्यक्ष : श्री. कृष्णाजी कुलकर्णी**
**संचालक : श्री. अमोल जोशी**
**जानेवारी २०२५**

**पुढील देणगीदारांनी संस्थेला देणगी देऊन सक्रिय सहाय्य केलेले आहे. संस्थेविषयी असलेल्या आत्मीयतेबद्दल आम्ही सर्वांचे आभारी आहोत.**

**नाव** - **श्रीमती प्रीती रूपसिंग राजपूत, नाशिक**
**देणगी** - रु. २०,०००/-
**दिनांक** - २.१.२०२५
**निमित्त** - सदिच्छा देणगी
**विनियोग** - तळेगाव अंजनेरी शाखावाढीसाठी

**नाव** - **सौ. स्वाती महेश भावसार, नाशिक**
**देणगी** - रु. २०,०००/-
**दिनांक** - ३.१.२०२४
**निमित्त** - सदिच्छा देणगी
**विनियोग** - तळेगाव अंजनेरी शाखावाढीसाठी

**वस्तुरूप देणगी अंदाजे मूल्य रु.**

- **डॉ. सुनिल काळे, पुणे**
  वाढदिवसानिमित्त, गहू ७८० कि., रु.३१,०००/-
- **श्री. नितिन देवधर, पुणे**
  चंपासष्ठीनिमित्त, गुलाबजाम ७ कि., रु.३,०००/-
- **कु. उज्वला रामचंद्र देशपांडे, पुणे**
  कै. श्रीमती कमल रामचंद्र देशपांडे स्मृतिप्रित्यर्थ, २०० पानी फुल साईज वह्या ५ डझन, रु. २,३००/-
- **श्री. हेमंत बिहाणी, पुणे**
  पोहे ५ कि., रवा ५ कि., साखर ५ कि., बासमती तांदूळ ५ कि., आटा ५ कि., शेंगदाणे १ कि., रु. १,३०५/-
- **श्री. रमेश किसन झंवर, पुणे**
  साखर २ कि., गहू १० कि., रवा २ कि., चणाडाळ १ कि., तेल १ लीटर, रु. १,००१/-
- **मा. अध्यक्ष भारतीय विचार साधना, पुणे**
  भारतीय व्यवहार कोश १ पुस्तक, श्री. विश्वास दिनकर नरवणे, पुणे रु. १,०००/-
- **सौ. गिरिजा जाधव, पुणे**
  बिस्कीट पुडे ७० नग, रु. ७००/-
- **श्री. प्रणव रमेश करमरकर, पुणे**
  रवा ५ कि., साखर ५ कि, रु. ४५०/- ✻✻✻

**नाव** - **सौ. वीणा अतुल लोहिते, नाशिक**
**देणगी** - रु. १०,०००/-
**दिनांक** - ४.१.२०२५
**निमित्त** - सदिच्छा देणगी
**विनियोग** - तळेगाव अंजनेरी शाखावाढीसाठी

**नाव** - **श्री. संजय मदन जोशी, नाशिक**
**देणगी** - रु. ७,५००/-
**दिनांक** - २०.१.२०२५
**निमित्त** - सदिच्छा देणगी
**विनियोग** - तळेगाव अंजनेरी शाखावाढीसाठी ✻

## हितचिंतक व आश्रयदाते यांच्या मदतीचे वृत्त, पंचवटी – नाशिक शाखा

**कोषाध्यक्ष – श्री. कृष्णाजी कुलकर्णी** **संचालक : श्री. अमोल जोशी**

## माहे डिसेंबर २०२४

**पुढील देणगीदारांनी संस्थेला देणगी देऊन सक्रिय सहाय्य केलेले आहे. संस्थेविषयी असलेल्या आत्मीयतेबद्दल सर्वांचे आभारी आहोत.**

• **नाव - श्री. जितेंद्र सोमनाथ कामत, नाशिक**
**देणगी** - रु. १,१०,०००/-
**दिनांक** - ३०.१२.२०२४
**निमित्त** - सदिच्छा देणगी
**विनियोग** - देणगी रु. १,००,०००/- च्या व्याजाचा विनियोग प्रतिवर्षी आश्रमस्थ विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत देण्यासाठी आणि अन्नखर्चासाठी करण्यात येईल. उर्वरित देणगी रु. १०,०००/- च्या व्याजाचा विनियोग कै. सौ. विद्याताई साक्रीकर व कै. जनार्दन विष्णू कामत यांच्या पुण्यस्मरणार्थ इ. ५ वी मधील अनुक्रमे गणित व इंग्लिश विषयात प्रथम येणाऱ्या आणि श्री. विश्वास साक्रीकर यांच्या सौजन्याने इ. ८ वी मध्ये विज्ञान विषयात प्रथम येणाऱ्या आश्रमस्थ विद्यार्थ्यास पारितोषिक देण्यासाठी करण्यात येईल.

• **नाव - सौ. सुनिता अजय शेठी, नाशिक**
**देणगी** - रु. २०,०००/-**दिनांक**-१८.१२.२०२४
**निमित्त** - सदिच्छा देणगी
**विनियोग** - देणगी संपूर्ण रकमेचा विनियोग आश्रमस्थ विद्यार्थ्यांच्या अन्नखर्चासाठी करण्यात आला.

• **नाव - सौ. रेवा गिरीश जोशी, मुंबई**
**देणगी** - रु. १५,०००/-
**दिनांक** - ६.१२.२०२४
**निमित्त** - कै. बा. ना. आपटे यांच्या पुण्यस्मरणार्थ
**विनियोग** - देणगी संपूर्ण रकमेचा विनियोग आश्रमस्थ विद्यार्थ्यांच्या अन्नखर्चासाठी करण्यात आला.

• **नाव - कु. वर्षा अनिलकुमार शर्मा, नाशिक**
**देणगी** - रु. १२,०००/- **दिनांक**-३१.१२.२०२४
**निमित्त** - श्री. गजानन तुकाराम पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त
**विनियोग** - देणगी संपूर्ण रकमेचा विनियोग आश्रमस्थ विद्यार्थ्यांना मिष्टान्न भोजन देण्यासाठी करण्यात आला.

• **नाव - श्री. मुकुंद अजय राठे, नाशिक**
**देणगी** - रु. १०,०००/- **दिनांक**-१८.१२.२०२४
**निमित्त** - सदिच्छा देणगी
**विनियोग** - देणगी संपूर्ण रकमेचा विनियोग आश्रमस्थ विद्यार्थ्यांच्या अन्नखर्चासाठी करण्यात आला.

• **नाव - श्री. एस. के. लिमये, पुणे**
**देणगी** - रु. ६,०७०/- **दिनांक**-२०.१२.२०२४
**निमित्त** - चि. चिंटू यांच्या वाढदिवसानिमित्त
**विनियोग** - देणगी संपूर्ण रकमेचा विनियोग आश्रमस्थ विद्यार्थ्यांना अल्पोपहार देण्यासाठी करण्यात आला.

• **नाव - सौ. अमृता हिप्पलगावकर, पुणे**
**देणगी** - रु. ५,०००/- **दिनांक** - २९.१२.२०२४
**निमित्त** - कु. देवयानी हिप्पलगावकर हिचे वाढदिवसानिमित्त
**विनियोग** - देणगी संपूर्ण रकमेचा विनियोग आश्रमस्थ विद्यार्थ्यांना अल्पोपहार देण्यासाठी करण्यात आला.

• **नाव - सौ. सुनिता अजय शेठी, नाशिक**
**देणगी** - रु. ४,०००/-
**दिनांक** - १८.१२.२०२४
**निमित्त** - कै. इंदिराबाई रामचंद्र वर्मा व कै. कांतीलाल रामचंद्र वर्मा यांच्या पुण्यस्मरणार्थ
**विनियोग** - देणगी संपूर्ण रकमेचा विनियोग आश्रमस्थ विद्यार्थ्यांच्या अन्नखर्चासाठी करण्यात आला.

• **नाव - श्री. श्रीपाद मंगलमूर्ती उपसनी, नाशिक**
**देणगी** - रु. ३,६४०/-
**दिनांक** - १०.१२.२०२४
**निमित्त** - कै. सौ. सोनाली श्रीपाद उपासनी यांच्या जयंतीनिमित्त
**विनियोग** - देणगी संपूर्ण रकमेचा विनियोग आश्रमस्थ विद्यार्थ्यांना मिष्टान्न (जिलेबी) देण्यासाठी करण्यात आला.

• **नाव - श्री. विशाल नरेंद्र उपाध्याय, ठाणे**
**देणगी** - रु. २,०००/-
**दिनांक** - १.१२.२०२४
**निमित्त** - सदिच्छा देणगी
**विनियोग** - देणगी संपूर्ण रकमेचा विनियोग आश्रमस्थ विद्यार्थ्यांच्या अन्नखर्चासाठी करण्यात आला.

• **नाव - सौ. वैशाली जितेंद्र मुंढानकर, नाशिक**
**देणगी** - रु. १,५००/-
**दिनांक** - २५.१२.२०२४
**निमित्त** - कै. विमल बाबुराव चांगटे यांच्या पुण्यस्मरणार्थ (दि. २६ डिसेंबर)
**विनियोग** - देणगी संपूर्ण रकमेचा विनियोग आश्रमस्थ विद्यार्थ्यांना अल्पोपहार देण्यासाठी करण्यात आला.

***

**कै. माधवराव बळवंत उर्फ काकासाहेब देशमुख विद्यालय, पंचवटी शाखा, नाशिक येथील मुख्याध्यापक आणि शिक्षकांनी आश्रमस्थ विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत देण्यासाठी खालील प्रमाणे देणग्या दिलेल्या आहेत.**


श्री. ज्ञानेश्वर निंबेकर


श्री. तुकाराम मंडले


श्री. गौरव झुरडे

**नाव** - **श्री. ज्ञानेश्वर तुकाराम निंबेकर, मुख्याध्यापक, काकासाहेब देशमुख विद्यालय, पंचवटी, नाशिक**
**देणगी** - रु. १५,०००/-
**दिनांक** - १.१२.२०२४

**नाव** - **श्री. तुकाराम दत्तू मंडले, नाशिक**
**देणगी** - रु. १५,०००/-
**दिनांक** - १०.१२.२०२४

**नाव** - **श्री. गौरव अशोक झुरडे, नाशिक**
**देणगी** - रु. १५,०००/-
**दिनांक** - १२.१२.२०२४

***

## ✼ माजी विद्यार्थी मंडळ हीरक महोत्सव सांगता समारंभ क्षणचित्रे ✼







दि. १९ जानेवारी २०२५ रोजी माजी विद्यार्थी मंडळ हीरक महोत्सव सांगता समारंभ प्रसंगी स्मरणिकेचे आणि श्री. रमेशचंद्र गोविंद कुलकर्णी लिखित 'कुलकर्णी कुलवृत्तान्त आणि वंशावळ' या पुस्तकाचे प्रकाशन करताना नियामक मंडळाचे अध्यक्ष श्री. श्री. अ. पाटणकर समवेत डावीकडून श्री. मधुकर जोशी, माजी विद्यार्थी मंडळाचे अध्यक्ष डॉ. बा. गो. कुलकर्णी, श्री. हणमंत भोसले, श्री. शिवाजीराव पाटील, श्री. रमेशचंद्र कुलकर्णी, श्री. के. एन. शिरकांडे, आणि कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे पाठीमागे कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ

## ✼ दि. २६ जानेवारी २०२५ क्षणचित्रे ✼





७६व्या प्रजासत्ताकदिनी ४४, विद्यानगरी, पुणे आवारामध्ये राष्ट्रध्वजास सलामी देताना ब्रिगेडियर डॉ. सुनील बोधे (रिटायर्ड), तसेच संस्थेच्या नेरूळ शाखेमध्ये राष्ट्रध्वजास सलामी देताना सेवानिवृत्त वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. किसनराव गायकवाड, विशेष अतिथी डॉ. पल्लवी अग्रवाल यांच्या समवेत समवेत संस्था पदाधिकारी, संचालक आदी मान्यवर

Postal Reg. No. PCW / 168 / 2023-2025, Office of Posting *Pune PSO *GPO 411 001*
[Publication Date 13.2.2025 Posting Date 15.2.2025]
SAMACHAR - Registered RNI No. 14546 / 1957. Decl. No. SDO / PUNE / SR / 74 / 2016
**License No. WPP - 56/2023-2025**



संस्थेचे ज्येष्ठ माजी विद्यार्थी श्री. अशोक धर्माधिकारी, नाशिक यांनी दि. २७ डिसेंबर २०२४ रोजी आपल्या वाढदिवसानिमित्त संस्थेस भेट देऊन त्यांचे मामा कै. चंद्रकांत शंकर कुलकर्णी यांच्या पुण्यस्मरणार्थ आश्रमस्थ विद्यार्थ्यांच्या अन्नदानासाठी (३६५ दिवस भोजन व्यवस्था निधीसाठी) रु. एक लाखाची देणगी दिली.
श्री. अशोक धर्माधिकारी यांचे वाढदिवसानिमित्त अभिष्टचिंतन आणि देणगी दिल्याबद्दल पुष्पगुच्छ देऊन आभार मानताना उपकार्याध्यक्ष श्री. एस. एम. जिर्गे, समवेत डावीकडून संस्था कर्मचारी श्री. नंदकिशोर ब्रह्मे, सौ. कुमुद अशोक धर्माधिकारी आणि श्री. आनंद अशोक धर्माधिकारी

♦ पुणे विद्यार्थी गृह ♦
▣ पुणे शाखा - (०२०) २४४७०९२७, २४४७०५७३, २४४७९०५८
▣ मुंबई शाखा : (०२२) २५०६२३२२ फॅक्स : (०२२) २५०६४९३५ ▣ नवी मुंबई (नेरुळ) (०२२) २७७२३४१८
▣ नाशिक शाखा : (०२५३) २५११३०६ ▣ म्हसरुळ: (०२५३) २५३४२९१ ▣ तळेगाव अंजनेरी शाखा: (०२५९४)२२२२२७
कृपया आपल्या प्रतिक्रिया pvgsamachar@gmail.com या ई मेल वर नोंदवाव्यात.

**This monthly Samachar is printed on behalf of Pune Vidyarthi Griha by Printer and Publisher Mr. Subhash Mallappa Jirge at Maharashtra Mudranshala Chhapkhana, 1786, Sadashiv Peth, Pune 411030 and Published at Pune Vidyarthi Griha, 1786, Sadashiv Peth, Pune 411030.**
**Editor : Mr. Rajendra Vitthal Borhade**
समाचार हे मासिक पुणे विद्यार्थी गृह संस्थेकरिता मुद्रक, प्रकाशक श्री. सुभाष मल्लाप्पा जिर्गे यांनी महाराष्ट्र मुद्रणशाळा छापखाना, १७८६ सदाशिव पेठ, पुणे ४११०३० येथे छापून पुणे विद्यार्थी गृह, १७८६ सदाशिव पेठ, पुणे ४११०३० येथे प्रसिद्ध केले.
संपादक श्री. राजेंद्र विठ्ठल बोऱ्हाडे